



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार ७ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा कहर

## मुंबईत ‘रेड अलर्ट’, खासगी कंपन्यांना ‘वर्क फ्राम होम’चे निर्देश



**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या तीन दिवसांपासून महाराष्ट्राच्या विविध भागांत सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्रात पावसाचा जोर कायम असून अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले आहे. हवामान विभागाने मुंबईसह ठाणे आणि रायगड जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क झाल्या असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

राज्यातील पावसाची गंभीर परिस्थिती लक्षात घेउन राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी विविध खबरदारीच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मुंबईतील खासगी आस्थापनांना शक्य असल्यास आपल्या कर्मचा-यांना वर्क फ्राम होम ची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुसळधार पावसाच्या काळात अनावश्यक प्रवास कमी करणे आणि वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी करणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे.

अत्यावश्यक सेवा वगळता इतर सरकारी आणि निम-सरकारी कार्यालयांबाबतही खबरदारीचे निर्देश देण्यात आले आहेत. कर्मचा-यांच्या सुरक्षिततेचा विचार करून दुपारनंतर अर्ध्या दिवसाची सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मुंबई, ठाणे आणि लगतच्या परिसरातील शाळा आणि महाविद्यालयांना खबरदारीचा उपाय म्हणून सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**मुंबई, ठाणे आणि रायगडला रेड अलर्ट-**हवामान विभागाने मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांसाठी अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असून जोरदार वारे वाहण्याचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. वा-याचा वेग ताशी ८० ते ९० किलोमीटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याने नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुसळधार पावसामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याचे चित्र आहे. त्यामुळे रस्ते वाहतुकीचा वेग मंदावला असून काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

**रेल्वे आणि रस्तो वाहतुकीला पावसाचा फटका-**सततच्या पावसाचा परिणाम रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरही झाला आहे. रेल्वे मार्गांवर काही ठिकाणी पाणी साचल्याने मुंबईतील लोकल सेवा सुमारे १५ ते २० मिनिटे उशिराने धावत आहेत. त्यामुळे सकाळपासूनच प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, कर्जत-खोपोली मार्गावरील रेल्वे सेवा तांत्रिक कारणामुळे (पान २ वर)

# मानखुर्दमध्ये तीन मजली चाळ कोसळून 6 जणांचा मृत्यू

## ■ पाच चिमुकल्यांचा समावेश ■



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील मानखुर्द परिसरात मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर रविवारी रात्री भीषण दुर्घटना घडली. जनता नगर भागातील तीन मजली कच्च्या चाळीचा काही भाग अचानक कोसळल्याने पाच निष्पाप चिमुकल्यांसह एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत एक तरुण जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून संपूर्ण मुंबई हादरली आहे.

रविवारी रात्री सुमारे साडेआठ वाजण्याच्या सुमारास जनता नगरमधील हनुमान मंदिराजवळ असलेल्या चाळ क्रमांक पाचमधील तळमजला आणि त्यावरील तीन मजल्यांचा काही भाग अचानक कोसळला. ही चाळ धोकादायक घोषित करण्यात आली होती. रहिवासी घर रिकामे करण्यासाठी आणि घरातील सामान बाहेर काढण्याचे काम करत असतानाच अचानक इमारतीचा भाग कोसळला. त्यामुळे अनेक जण ढिगा-याखाली अडकले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, पोलीस, महानगरपालिका प्रशासन आणि रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. बचाव पथकांनी युद्धपातळीवर ढिगारा हटवून अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढले आणि त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले. गोवंडी येथील (पान २ वर)

# आज त्र्यंबकेश्वरमध्ये ढगफुटी?

**मुंबई /प्रतिनिधी-**नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरासाठी अत्यंत चिंतेची आणि मोठी बातमी समोर येत आहे. उद्या या भागात तीव्र ढगफुटी होण्याची दाट शक्यता असून, एकाच दिवसात तब्बल ३०० मिमी इतका विक्रमी पाउस कोसळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः याबाबतची माहिती देत नाशिक जिल्ह्याला सर्वात महत्त्वाचा इशारा दिला आहे. या



पार्श्वभूमीवर नाशिकचे जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पूर्णपणे ॲक्शन मोडवर आली आहे. नाशिकमधील संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना महत्त्वाची माहिती दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्या ७ जुलै रोजी सर्वात महत्त्वाचा अलर्ट नाशिकला आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर दरम्यानच्या भागात उद्या ढगफुटी संभावित आहे. त्या प्रकारचे निर्देश आपल्याला प्राप्त झालेले आहेत. ही मोठी ढगफुटी असू शकते, जवळपास ३०० मिमी पाउस ढगफुटीमुळे या भागात होउ शकतो. नाशिकच्या ब-याच मोठ्या भागात ढगफुटी होउ शकते, त्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने तयारी केलेली (पान २ वर)

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा स्थगित

**मुंबई / प्रतिनिधी-**मुंबईसह राज्यातील अतिवृष्टी, वेगवान वारे आणि निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सर्व नागरिक आणि लोकप्रतिनिधींना सतर्क राहण्याचे आवाहन केले. शासन आणि प्रशासनाला योग्य ते सहकार्य करून ही परिस्थिती हाताळण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राज्यातील एकूण परिस्थितीची गंभीरता लक्षात घेउन अध्यक्षांनी त्या दिवसाचे विधानसभेचे कामकाज स्थगित करण्याची घोषणा केली. तसेच विधानसभेची पुढील नियमित बैठक उद्या सकाळी ११ वाजता होईल, असे त्यांनी सभागृहात जाहीर केले. सभागृहाचे कामकाज सुरू होताच विजय वडेट्टीवार, अजय चौधरी आणि अमित पटेल सदस्यांनी सांगितले की, मुंबईत अनेक ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. अनेक झाडांची वेळेत छाटणी न झाल्यामुळे नागरिकांचा जीव जात आहे, वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.



त्यामुळे मुंबई महानगरपालिकेला तातडीने झाडांची छाटणी करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. याचबरोबर मुंबईत मोठ्या खर्चातून उभारण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यांवर अनेक ठिकाणी तडे गेल्याचा मुद्दाही सभागृहात उपस्थित करण्यात आला. या कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि ज्या ठिकाणी रस्ते खराब झाले आहेत, ते तातडीने दुरुस्त करावेत, अशी मागणी विरोधी पक्षाने केली.

मुख्यमंत्री उत्तर देताना म्हणाले की, राज्यासमोर अभूतपूर्व नैसर्गिक परिस्थिती निर्माण झाली आहे. विरोधकांनी उपस्थित केलेले मुद्दे गंभीर असले तरी यावेळी निसर्गाचा प्रकोपही तितकाच मोठा आहे. रविवारी मुंबईत सुमारे ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहत होते. दरवर्षी पावसाळ्यात सरासरी ८०० झाडे कोसळतात; मात्र यावेळी एका दिवसातच सुमारे ३५० झाडे पडली आहेत. आजची परिस्थिती त्याहीपेक्षा गंभीर असून दुपारनंतर ७० ते ९० किलोमीटर प्रतितास (पान २ वर)

# दरड कोसळून 3 जण ठार

**मावळ/प्रतिनिधी-** मावळ तालुक्यात सोमवारी पहाटेपासून सुरू असलेल्या संततधार मुसळधार पावसाने भीषण रूप धारण केले असून, पाटण गावात घडलेल्या दरड कोसळण्याच्या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेनंतर मावळ तालुक्यातील सर्व दरडप्रवण गावांचे तातडीने भूगर्भीय सर्वेक्षण करून धोकादायक ठिकाणी राहणा-या कुटुंबांचे सुरक्षितस्थळी पुनर्वसन करावे, तसेच अशा भागांमध्ये कायमस्वरूपी संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाटण गावातील शेतकरी नंदकुमार दत्तू तिकोणे, त्यांची पत्नी अनिता नंदकुमार तिकोणे आणि मुलगा ज्ञानेश्वर उर्फ माउली तिकोणे हे घरात झोपलेले असताना पहाटे साडेचारच्या सुमारास डोंगराचा मोठा भाग त्यांच्या घरावर कोसळला.



संततधार पावसामुळे डोंगराची माती खचून संपूर्ण घर माती व दगडांच्या ढिगा-याखाली गाडले गेले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. मात्र, मातीचा प्रचंड ढिगारा असल्याने स्थानिकांचे प्रयत्न अपुरे पडले. त्यानंतर पोलिस, महसूल प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दल, एनडीआरएफ तसेच स्थानिक स्वयंसेवक घटनास्थळी दाखल झाले. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर तिघांचेही मृतदेह ढिगा-याखालून बाहेर काढण्यात आले

# एकाच पावसाने महाराष्ट्र पॅरालाइज झाला!

**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीवरून खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. मुंबई-पुणे दळणवळण पूर्णपणे विस्कळीत झाले असून, मिसिंग लिंक प्रकल्प, दरडी कोसळण्याच्या घटना, मानखुर्द दुर्घटना घडल्या आहेत.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मुसळधार पावसामुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि मिसिंग लिंकसह अनेक महत्त्वाचे मार्ग बंद झाले आहेत. आळंदीमध्ये पूरस्थिती आहे, रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे, अनेक ठिकाणी दरडी कोसळत आहेत आणि रस्ते खचल्याच्या घटना समोर येत आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकारने संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेउन महाराष्ट्रातील वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी.



मिसिंग लिंक प्रकल्पाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, या प्रकल्पाचे मोठ्या थाटामाटात उद्घाटन करण्यात आले होते आणि सर्वांनी त्याचे स्वागतही केले होते. मात्र, आता या प्रकल्पाशी संबंधित समोर येणारे व्हिडिओ अत्यंत धक्कादायक आहेत.या प्रकल्पावर मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाला, पण त्यातून अपेक्षित परिणाम दिसत नाहीत. या प्रकल्पाचे सेफ्टी ऑडिट झाले होते का? नैसर्गिक आपत्तीचा विचार करून नियोजन करण्यात आले होते का? याची माहिती सरकारने द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांची पारदर्शक चौकशी करा-**राज्यात सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, वसई-विरार, भांडूप, मुंबई आणि इतर भागांत अनेक प्रकल्प सुरू आहेत. मात्र, सुरक्षितता आणि पर्यावरणाचा पुरेसा विचार झालेला दिसत नाही. या सर्व प्रकल्पांवर किती खर्च झाला, सुरक्षा तपासणी झाली का आणि नियोजनात नैसर्गिक आपत्तींचा विचार करण्यात आला होता का, याची पारदर्शक चौकशी व्हावी, अशी त्यांनी मागणी केली. सुळे म्हणाल्या की, राज्यातील अनेक महत्त्वाचे मार्ग बंद आहेत. ताम्हिणी घाट, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि मिसिंग लिंक या तिन्ही मार्गांवर वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यामुळे मुंबई आणि पुण्यासारख्या दोन प्रमुख शहरांतील संपर्क तुटल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या म्हणाल्या, एकाच पावसाने संपूर्ण महाराष्ट्र पॅरालाइज झाल्याचे चित्र दिसत आहे. अशा परिस्थितीत एखादा रुग्ण, डाक्टर, विद्यार्थी किंवा अत्यावश्यक कामासाठी प्रवास करणा-या नागरिकांचे काय, याचाही विचार सरकारने करायला हवा.


# कशेडी घाटात दरड कोसळली; मुंबई-गोवा महामार्ग ठप्प

**मुंबई / रायगड / प्रतिनिधी-** कोकणात पावसाचे थैमान सुरू आहे. सलग सहा दिवस कोसळत



असलेल्या पावसामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील खेड-पोलादपूर दरम्यान असलेल्या कशेडी घाटात दरड कोसळली आहे. त्यामुळे आज (६ जुलै) पहाटे चार वाजल्यापासून या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. दरड जेसीबीने हटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नव्या महामार्गावर दरडीसह मोठ्या प्रमाणात माती आणि दगड रस्त्यावर आल्याने महामार्गावरील वाहतूक तात्पुरती पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. त्याचवेळी महामार्गावरील वाहतूक महाड-विन्हेरी मार्गावरून वळवण्यात आली आहे. मात्र, खवटी येथे दरड कोसळल्यामुळे दुपारी १२ वाजेपर्यंत म्हणजे ९ तास वाहतूक ठप्प आहे. त्यामुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत असून त्यांचा संताप अनावर झाला आहे. आज पहाटे चार वाजण्याच्या सुमारास कशेडी घाटात दरड कोसळली. (पान २ वर)

# मुंबई-पुणे संपर्क तुटला; लोकलसह 16 गाड्या रद्द



**मुंबई /प्रतिनिधी-**मुंबई आणि पुणे परिसरात सुरू असलेल्या जोरदार पावसाचा मोठा फटका रेल्वे वाहतुकीला बसला आहे. गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील सेवा विस्कळीत झाली असून हजारो प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिस्थिती गंभीर बनल्याने रेल्वे प्रशासनाने अनेक गाड्या रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई आणि पुणे दरम्यान धावणा-या तब्बल १६ रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रवाशांची मोठी गर्दी असणा-या इंद्रायणी एक्सप्रेस, सिंहगड एक्सप्रेस, प्रगती एक्सप्रेस आणि इंटरसिटी एक्सप्रेस या गाड्यांचाही समावेश आहे. त्यामुळे दररोज प्रवास करणा-या प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. याशिवाय सोलापूरहून मुंबईकडे जाणारी सिद्धेश्वर एक्सप्रेस पुणे स्थानकावरच थांबवण्यात आली आहे. तसेच मुंबईच्या दिशेने धावणा-या ६ (पान २ वर)




# मिसिंग लिंक महामार्गासाठी हजारो कोटींचा चुराडा!

**मुंबई / प्रतिनिधी-**हजारो कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या मिसिंग लिंकला अवघ्या काही दिवसांतच खड्डे पडल्याचे व्हीडिओ व्हायरल झाल्यानंतर आता थेट एन्ट्री पाईंटचा स्लॅब कोसळून हायवेवर पूर्णपणे राडारोडा येउन पडल्याची भयावह घटना सोमवारी पहाटे घडली. त्यामुळे आता मिसिंग लिंकच्या गुणवत्तेवरून आणि त्याच्या दीर्घकालीन सुरक्षेवरून प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मिसिंग लिंकचा भयावह व्हिडिओ समोर आल्यानंतर महायुती सरकारवर कडाडून प्रहार केला आहे. इतकेच नव्हे तर, इन्फ्रा मॅनचा फुगा फुटल्याचं म्हणत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर प्रहार केला आहे.



मुंबई-पुण्यासाठी सोयीचा आणि कुठल्याही अडथळ्याविना वाहतुकीचा दावा करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मिसिंग लिंक महामार्गाचे मोठ्या थाटामाटात उद्घाटन केले. हा महामार्ग सुरू होउन अजून ३ महिनेही झाले नाहीत, तोच पावसाळ्याच्या सुरुवातीलाच हा नवाकोरा महामार्ग बंद करण्याची नामुष्की सरकारवर आली. यावरून विरोधकांनी टीकेची झोड उठवली असतानाच मुख्यमंत्र्यांनी ही टीका संयमाने घेउन काही चुका झाल्याचे मान्य करण्याऐवजी यावरून विरोधकांनाच लक्ष्य करण्याचे काम करीत आपल्या चुकांवर पांघरून घालण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. यावरून शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी तर या (पान २ वर)

# आषाढी वारीवर पावसाचे संकट

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून कोकण, मुंबई, पुणे, ठाणे, रायगड आणि घाटमाथा भागात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. आळंदीमध्ये इंद्रायणी



नदीने धोक्याची पातळी ओलांडत महापुराचे रूप धारण केले आहे. नदीवरील चारही बाजूने पुराने घेरले आहे. इंद्रायणी नदीच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे नदीने रौद्ररूप धारण केले आहे. आळंदी शहरात प्रवेश करणारे चारही पूल पाण्याखाली गेल्याने शहरात ये-जा पूर्णपणे बंद झाली आहे. नदीकाठचे घाट, मंदिर परिसर, धर्मशाळा, दुकाने आणि अनेक (पान २ वर)

## *वारकरी आणि भाविकांना आळंदीत न येण्याचे आवाहन*

***पूरस्थिती गंभीर होत असल्याने प्रशासनाने अत्यंत महत्त्वाचे सार्वजनिक आवाहन जारी केले आहे. आळंदीच्या दिशेने प्रवास करणा-या सर्व वारकरी, भाविक आणि नागरिकांनी ज्या ठिकाणी आहेत तेथेच सुरक्षित थांबावे आणि परिस्थिती सुरळीत होईपर्यंत आळंदीत येण्याचा प्रयत्न करू नये, असे स्पष्ट सांगण्यात आले आहे. नदीपात्र, घाट, पूल किंवा पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांवर जाणे टाळावे, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि केवळ प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.***



पान १ व १० वरून

# महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा

तात्पुरती प्रभावित झाली आहे. प्रशासनाकडून सेवा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरही पावसाचा परिणाम झाला. घाट परिसरात दरड कोसळल्यामुळे काही काळ वाहतूक प्रभावित झाली होती. प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून मार्गावरील अडथळे दूर करण्याचे काम हाती घेतले.

**नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा-** आपत्ती व्यवस्थापन विभागाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. मुसळधार पाउस आणि जोरदार वा-याच्या पार्श्वभूमीवर समुद्रकिनारे, नदीकाठ, धबधबे आणि इतर धोकादायक पर्यटनस्थळांवर जाणे टाळावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.तसेच मोठ्या झाडांखाली, जीर्ण इमारतींजवळ आणि मोठ्या होर्डिंगच्या परिसरात थांबू नये. पाणी साचलेल्या रस्त्यांवरू न वाहन चालवताना विशेष खबरदारी घ्यावी. विजेच्या खांबांपासून आणि उघड्या विद्युत तारांपासून सुरक्षित अंतर ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

# मानखुर्दमध्ये तीन मजली

पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रु ग्णालयात एका महिलेसह तीन लहान मुली आणि एका लहान मुलाला मृतावस्थेत आणण्यात आले. तर घाटकोपर येथील राजावाडी रु ग्णालयात आणखी एका लहान मुलाचा मृत्यू झाल्याचे डाक्टरांनी स्पष्ट केले. जखमी झालेल्या एका तरु णावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधिका-यांनी दिली.कोसळणारे तळ मजला अधिक तीन मजली घर रिकामे होते, अशी माहिती स्थानिक नगरसेवक नवनाथ बन यांनी दिली आहे. आलिया (७), मुस्कान (१४), निहाल(६ ), नाबिया (२), सोनी(३२), मुनाफ ( ७) अशी मृतांची नावे आहे. तर, रेहान अली (२४) यांच्यावर राजावाडी रु ग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. सर्व मृत एकाच कुटुंबातील आहेत.

# आज त्र्यंबकेश्वरमध्ये

आहे. नाशिक शहर किंवा नाशिक जिल्हा या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे ढगफुटीमुळे जी परिस्थिती निर्माण होउ शकते, त्याची पडताळणी करून ब-याचशा उपायोजना करण्यात आलेल्या आहेत. यावर आपल्याला अतिशय करडी नजर ठेवावी लागणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.दरम्यान, नाशिक जिल्हा परिषद आणि स्थानिक यंत्रणा सतर्क झाली आहे. नाशिकच्या घाटमाथा परिसरात पावसाचा रेड अलर्ट असल्याने काही तातडीचे निर्णय घेण्यात आले आहेत. नाशिकच्या ग्रामीण भागात मुसळधार पाउस पडत असल्याने शाळांना सुटी देण्याचा निर्णय स्थानिक परिस्थिती पाहून घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी दिल्या आहेत.

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा

वेगाने वारे वाहण्याचा अंदाज असल्याने नागरिकांनी विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.वर्क फ्राम होमचे आवाहन करण्यात आले असून शाळा आणि महाविद्यालयांनाही आवश्यक सूचना देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री यांनी दिली. काल घडलेली इमारत दुर्घटना ही पूर्णपणे बेकायदेशीर इमारतीशी संबंधित होती. त्या इमारतीतील रहिवाशांऐवजी शेजारील झोपड्यांवर इमारत कोसळल्याने तेथील नागरिकांचा मृत्यू झाला, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंबई-पुणे मार्गावरील दरड कोसळल्यानंतर तातडीने वाहतूक बंद करू न पर्यायी व्यवस्था करण्यात आली. नागरिकांना सतत सूचना देण्यात आल्या असून अडकलेल्या वाहनांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे.

# कशेडी घाटात दरड कोसळली;

ही माहिती मिळताच महामार्ग पोलिस प्रशासन, खेड पोलीस, महसूल विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी यांनी समन्वय साधून तातडीने घटनास्थळी धाव घेतील आणि दरड हटवण्यासाठी जेसीबी यंत्रणा कार्यान्वित केली. सुरक्षेच्या दृष्टीने दोन्ही बाजूंची वाहतूक थांबवण्यात आली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. पावसाची संततधार सुरू असल्याने डोंगरकड्यांवरू न दरड कोसळण्याचा धोका वाढला आहे.

# मुंबई-पुणे संपर्क तुटला;

गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. त्यामुळे रेल्वे प्रवासाचे संपूर्ण वेळापत्रक बिघडले असून अनेक प्रवाशांना पर्यायी मार्गांचा शोध घ्यावा लागत आहे. गाड्या रद्द झाल्याने पुणे रेल्वे स्थानकावर मोठी गर्दी झाली आहे. अनेक प्रवासी सकाळीच स्टेशनवर पोहोचले होते, मात्र गाड्या रद्द झाल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांचा खोळंबा झाला. काही प्रवासी कामानिमित्त तर काही वैयक्तिक कारणांसाठी मुंबईकडे निघाले होते. मात्र अचानक बदललेल्या परिस्थितीमुळे त्यांना तासन्तास स्टेशनवर थांबावे लागत आहे.मुंबईत हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला असून काही भागांमध्ये अतिवृष्टीमुळे रेल्वे मार्गांवर धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटनाही समोर आल्याने सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून गाड्या रद्द केल्या आहेत.

# मिसिंग लिंक महामार्गासाठी

प्रकल्पाचे गणित मांडत फडणवीस सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. त्या म्हणाल्या की, जागतिक स्तरावर गौरवण्यात आलेला रस्ता १ मे २०२६ सुरू झाला. महाराष्ट्र दिनी मोठ्या थाटामाटात याचे उद्घाटन केले. पण हा महामार्ग सुरू होउन अवघे ६६ दिवस झाले. मात्र, एवढ्या दिवसांतच दरड कोसळल्याच्या कारणावरू न हा महामार्ग बंद ठेवण्याची वेळ सरकारवर आली. १३.३ किमी रस्त्यासाठी ७,१८१ कोटींचा चुराडा करण्यात आला. एकूण रस्त्याचा हिशेब घातल्यास प्रतिदिन १०० कोटी रु पये प्रमाणे किमान ७० दिवस तरी काढायचे होते, असेही अंधारे म्हणाल्या.

Shri Shivaji Education Society, Amravati's
**DR.PANJABRAO DESHMUKH COLLEGE OF LAW, AMRAVATI**
MORSHI ROAD (Maharashtra) Pin Code-444602
Reaccredited by NAAC 'A' with CGPA 3.19 (Third Cycle)

**WALK-IN-INTERVIEW**

Following post are to be filled immediately on Clock hour basis & Consolidated pay basis.

| Sr. No. | Name of the Post | Subject | No. of Post | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1. | Assistant Professor for Law Five Year Degree Course (UG) On Clock Hour Basis & Full Time | Law | Full Time-05 | LL.M with 55% NET/SET/Ph.D. |
| 2. | Assistant Professor for Pre-Law 1st & 2nd Year of Five-Year Degree Course (UG) on Full Time (Non Granted) Preference with LL.B/LL.M. | English | 01 | MA (Eng) with 55% NET/SET/Ph.D. |
| | | Political Science | 01 | MA (Pol.Sci) with 55% NET/SET/Ph.D. |
| | | Economics | 01 | MA (Eco) with 55% NET/SET/Ph.D. |
| | | History | 01 | MA (His) with 55% NET/SET/Ph.D. |
| 3. | Assistant Professor for Pre Law On Five Year Degree Course (UG) on CHB Basis | Marathi<br>Sociology<br>Env.Studies<br>Computer | 01<br>01<br>01<br>01 | MA (Mar) with 55% NET/SET/Ph.D.<br>MA (Sociology) with 55% NET/SET/Ph.D.<br>MCA/M.Sc Computer |
| 4. | Full Time Assistant Professor Exclusive for Law Post Graduate (LL.M.)(Non granted) | Law | 02-CHB (as per requirement) | LL.M with 55% NET/SET/Ph.D. |

**All eligible candidates are required to attend Interviews on Sunday 12.07.2026 at 10.00 AM to 1.00 PM**

Notice :
1) Preference with be given NET SET Ph.D. qualified candidates.
2) Candidate must remain present with original document along with two xerox sets on Same day after 1 Hour before the interview.
3) No T.A. & D.A. will be paid to candidates who are attending walk in interview.
4) In case of non-availability of qualified candidates for Full time (Consolidate Pay) CHB teachers will be appoint.

**Dr.Varsha N.Deshmukh**
Principal
Dr.Panjabrao Deshmukh College of Law, Amravati

**Shri Harshavardhan P.Deshmukh**
President
Shri Shivaji Education Society Amravati

# आषाढी वारीवर पावसाचे

भाग पुराच्या पाण्याखाली गेले आहेत.आषाढी वारीसाठी देशभरातून आलेल्या शेकडो वारक-यांना याचा मोठा फटका बसला आहे. प्रशासनाने विविध धर्मशाळा आणि दर्शन मंडपांमध्ये अडकलेल्या सुमारे २५० वारक-यांना सुरक्षितस्थळी हलवले आहे. नदीकाठी उभारण्यात आलेले चेंजिंग रू म आणि तात्पुरत्या सुविधा पुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयानेही वारकरी, दिंडी प्रमुख आणि भाविकांसाठी स्वतंत्र सूचना जारी केल्या आहेत. आळंदी आणि देहू येथील मंदिर परिसर तसेच धर्मशाळांमध्ये पुराचे पाणी शिरल्यामुळे पुढील प्रवास करू नये, सुरक्षित ठिकाणीच थांबावे आणि पोलीस व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ट्रान्सपोर्ट नगर मिनी कंपोस्ट

'येथून हटवला जाईपर्यंत आमचे आंदोलन सुरू राहील' असेही त्यांनी सांगितले. आंदोलनाची माहिती मिळताच मनपाचे अधिकारी लगेच घटनास्थळी पोहोचले आणि लवकरात लवकर डेपो हटवून तेथे सबस्टेशन सुरू करू, असे आश्वासन दिले. त्यानंतर एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी काही दिवसांसाठी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. आंदोलन करणाऱ्यांमध्ये हाजी इरफान खान, मो. इकबाल, अब्दुल हमीद, सैय्यद राशिद अली, अहमद शाह, आसिया अंजुम, डॉ. मरियम बानो, नुजहात परवीन, शाकिर हुसेन आदींचा समावेश होता.

## 'मिसिंग लिंक'च्या दुरावस्थेवरून

त्याचे क्रेडिट घेण्यासाठी सरकार पुढे असते. पण या कामांमध्ये जी टक्केवारी चालते, त्याचे क्रेडिट कोण घेणार? सध्याच्या सरकारमध्ये जे काही सुरू आहे, ते महाराष्ट्रातील जनतेसाठी अत्यंत असहनीय आहे.

**हे '४० टक्के टक्केवारीचे' सरकार-** यशोमती ठाकूर यांनी महायुती सरकारचा निषेध करत, '४० टक्के टक्केवारीचे सरकार' अशी जोरदार टीका देखील केली आहे. 'हे सरकार महाराष्ट्राचा विकास करत नसून केवळ टक्केवारीचे गणित सांभाळत आहे. विकासाच्या नावाखाली आणल्या जाणाऱ्या प्रकल्पांमागे सरकारचे दुसरेच काहीतरी छुपे नियोजन असते,' असा थेट आरोप करत, 'महाराष्ट्रातील जनतेला हा प्रकार अजिबात आवडलेला नाही आणि जनता या सरकारला कधीही माफ करणार नाही. मायबाप जनतेने हे टक्केवारीचे सरकार नीट लक्षात ठेवावे,' असे आवाहन यशोमती ठाकूर यांनी जनतेला केले आहे.

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचार

वर्षांची सक्तमजुरी व १० हजार रुपयांचा दंड ठोठावला असून दंड न भरल्यास तीन महिन्यांची साधी कैद भोगावी लागणार आहे. तसेच पोक्सो कायद्यातील तरतुदींनुसारही आरोपी दोषी आढळला असला, तरी पोक्सो कायद्याच्या कलम ४२ नुसार एकाच प्रकरणात स्वतंत्र शिक्षा न देता वरील शिक्षा सुनावण्यात आली. याशिवाय, पीडितेला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७-अ अंतर्गत योग्य नुकसानभरपाई देण्याबाबत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांना न्यायालयाने निर्देश दिले आहेत. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. सोनाली क्षीरसागर यांनी कामकाज पाहिले, तर न्यायालयीन कामकाजात पोलीस हवालदार रोशन दुधे यांनी सहकार्य केले.

## अमरावतींतील रेल्वे स्थानकांबाबत

जबाबदारी असून, चुकीच्या माहितीमुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होतो तसेच संबंधित भागाच्या विकासावरही विपरीत परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी बैठकीत नमूद केले.यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने बुकलेटमधील त्रुटी दुरुस्त करून अमरावती लोकसभा मतदारसंघातील सर्व रेल्वे स्थानकांची अचूक माहिती समाविष्ट करण्याच्या सूचना देण्यात आल्या. भविष्यात अशा प्रकारच्या चुका पुन्हा होणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

## परतवाडा आगाराच्या व्यवस्थापकपदी

पत्रकारांनी परतवाडा आगारातील विविध प्रशासकीय बाबी, कर्मचारी व प्रवाशांच्या समस्या तसेच विद्यार्थ्यांना बस पास मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि प्रवासादरम्यान त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे नव्या आगार व्यवस्थापकांचे लक्ष वेधले. यावर आशा वासनिक यांनी सर्व विषय गांभीर्याने ऐकून घेत लवकरच चालक, वाहक व संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन प्रवासी सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. विद्यार्थ्यांच्या बस पाससंदर्भातही त्यांनी सकारात्मक भूमिका घेत, शाळांकडून विद्यार्थ्यांची यादी वेळेत उपलब्ध झाल्यास आवश्यक नियोजन करून विद्यार्थ्यांना घरपोच बस पास उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले. त्यांच्या या भूमिकेचे उपस्थितांनी स्वागत केले.यावेळी सहाय्यक वाहतूक अधीक्षक लीना देशमुख, वाहतूक निरीक्षक प्रमोद दिपटे आणि सूरज थेटे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत समारंभानंतर आगार परिसरात आशा वासनिक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार सुनील देशपांडे, आशिष गवई, सतीश अकोलकर, पंकज साबू, शैलेंद्रसिंग राठोड, धनराज जवंजाळ, अमोल माहोरे यांच्यासह पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या माहेर फाउंडेशनच्या दीपा अमोल तायडे, संस्थाध्यक्षा शारदा उईके तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. नवीन आगार व्यवस्थापकांनी प्रवासी सेवा अधिक लोकाभिमुख करण्याबरोबरच विद्यार्थी, कर्मचारी आणि सर्वसामान्य प्रवाशांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याची भूमिका मांडल्याने त्यांच्या नियुक्तीबद्दल समाधान व्यक्त होत असून, परतवाडा आगाराच्या सेवेत सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## डिक्की फोडून भरदिवसा ३ लाखांची

थोड्याच वेळाने शनि मंदिर परिसरात मोबाईल काढण्यासाठी डिकी उघडली असता रोकड आणि कागदपत्रांनी भरलेली बॅग गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ परिसरात शोध घेतला; मात्र बॅग मिळून आली नाही. या प्रकरणी त्यांनी पुसद शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, बँकेतून मोठी रक्कम काढल्यानंतर संबंधित महिलेवर बँकेपासूनच पाळत ठेवण्यात आली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या चोरीमागे सराईत टोळी सक्रिय असल्याची शक्यता नाकारता येत नाही.सीसीटीव्ही फुटेज, संशयितांची हालचाल आणि बँकेपासूनच्या मार्गावरील तपास यावर या गुन्ह्याचा उलगडा अवलंबून आहे. भरदिवसा एवढी मोठी चोरी घडल्याने शहरातील नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. पोलिसांनी केवळ गुन्हा दाखल करण्यापुरते न थांबता, आरोपींना तातडीने जेरबंद करून अशा घटनांवर प्रभावी प्रतिबंध घालण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## धारणी-चिखलदरा येथील

चर्चा आहे. परिणामी येथे मुक्काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे बोलले जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दोन वर्षांपूर्वी या विश्रामगृहांमध्ये असलेली चैतन्यपूर्ण व्यवस्था, नियमित देखभाल आणि शासकीय शिस्त आता पूर्वीसारखी दिसून येत नाही. काही ठिकाणी आवश्यक मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे विश्रामगृहांच्या देखभालीवर परिणाम होत असल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे शासनाच्या विश्रामगृहांची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. विश्रामगृह ही केवळ मुक्कामाची ठिकाणे नसून ती शासनाच्या प्रशासकीय व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. जिल्हा तसेच राज्यस्तरीय अधिकारी, विविध विभागांचे कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि इतर शासकीय पाहुणे या विश्रामगृहांचा नियमित वापर करतात. त्यामुळे येथे दर्जेदार सुविधा, पुरेसे कर्मचारी आणि प्रभावी देखभाल असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांचे म्हणणे आहे की, शासकीय विश्रामगृहांचा कारभार पुन्हा विभागीय कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून चालविण्यात यावा. त्यामुळे सेवांची गुणवत्ता वाढेल, जबाबदारी निश्चित होईल आणि विश्रामगृहांची पूर्वीची ओळख व प्रतिष्ठा पुन्हा निर्माण होण्यास मदत होईल. आता सर्वांचे लक्ष राज्य शासनाच्या भूमिकेकडे लागले आहे. शासकीय विश्रामगृहांमधील सद्यस्थितीची दखल घेत शासन या व्यवस्थेचा फेरविचार करणार का? विभागीय कर्मचाऱ्यांची पुन्हा नियुक्ती करून विश्रामगृहांना पूर्वीचे वैभव मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार का? या प्रश्नांची उत्तरे आता शासनाच्या निर्णयातूनच स्पष्ट होणार आहेत.

## पात्रीकर कॉलनीतील नागरिकांना

मात्र नगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच या प्रभागाचे नगरसेवक पप्पू भालेराव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क सादर टेकडीवरून येणाऱ्या पाणी काढण्याकरिता नाली बांधकाम करण्याचे काम हाती घेतले व हे पाणी पादरीच्या नाल्यात वळवण्यात आल्याने या परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. परिसरात राहणाऱ्या अनेक नागरिकांनी यावेळी नगरपालिका प्रशासन व नगरसेवक पप्पू भालेराव यांचे आभार मानले आहे.

## परतवाडा शहर काँग्रेसमध्ये नव्या

मो. राजीक यांची महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच गोपी पांजनकर आणि अब्दुल सलीम अ. सादिक यांच्यावर सचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर शहरातील काँग्रेस संघटना अधिक मजबूत करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. संघटन विस्तारासाठी समर्पितपणे कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले तसेच सर्व पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमाला राहुल गवई परतवाडा शहराध्यक्ष, राहुल गाठे तालुका काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष, विशाल खानझोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित

यांनी केले आहे. या विशेष लोकअदालतीत पक्षकारांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबरोबरच, आभासी (व्हर्च्युअल) पद्धतीने ऑनलाइन सहभागी होण्याची विशेष सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे पक्षकार घरबसल्या किंवा आपल्या सोयीनुसार या प्रक्रियेत सामील होऊ शकतात. या संधीचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी व पक्षकारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचीही विहित मुदतीत परतफेड करणे अनिवार्य राहील. या योजनेचा लाभ वैयक्तिक शेतकरी या निकषावर दिला जाईल आणि कर्जमुक्तीचा लाभ घेतलेल्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळणार नाही. ही योजना राष्ट्रीयीकृत, खासगी, प्रादेशिक ग्रामीण, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसह प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या कर्जाला लागू राहील. योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण आणि 'ॲग्रीस्टॅक' मंचावर नोंदणी करणे बंधनकारक आहे.या योजनेतून काही विशिष्ट गटांना अपात्र ठरवण्यात आले आहे, ज्यामध्ये राज्यातील विद्यमान व भूतपूर्व मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य आणि नागरी स्थानिक संस्थांच्या नगरसेवकांचा समावेश आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, महावितरण, एमआयडीसी, एसटी महामंडळ आणि अनुदानित संस्थांचे कर्मचारी (ज्यांचे एकत्रित मासिक वेतन २५ हजार रुपयांपेक्षा जास्त आहे) या योजनेसाठी अपात्र राहतील. शेतीबाह्य उत्पन्नातून आयकर भरणारे, माजी सैनिक वगळता २५ हजारांपेक्षा जास्त मासिक पेन्शन घेणारे निवृत्तीवेतनधारक आणि कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, नागरी व जिल्हा सहकारी बँकांचे पदाधिकारी आणि २५ हजारांपेक्षा जास्त वेतन असलेले कर्मचारी या योजनेचा लाभ घेऊ शकणार नाहीत; मात्र साखर कारखान्यांचे हंगामी कामगार या योजनेसाठी पात्र राहतील, असे सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार यांनी कळविले आहे.

## आपल्या कार्यक्षेत्रात नंबर

व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेश गोंधळेकर, स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रूग्णालय नागपूरचे अधिष्ठाता डॉ. आशिष लांजेकर यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. संदेश मयेकर यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सोबतच अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी यांचा देखील सत्कार मान्यवराच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ मयेकर यांनी आपल्या आयुष्यातील अनेक अनुभवांवरून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, शिक्षण पूर्ण झाल्यावर उच्च पातळीवर जाण्यासाठी तुम्हाला अनेक टप्पे गाठावे लागतील. शॉर्टकट न स्विकारता टप्प्याटप्प्याने आयुष्यात पुढे जाण्याची योजना तयार करा. केवळ पैसा मिळवणे हे उद्दिष्ट न ठेवता समाजाचे हित देखील जपता यायला हवे. नितीमत्तेने मिळविलेल्या पैश्याची मजा वेगळी असते. भारतात दंतविज्ञान क्षेत्रात संशोधन करण्यास मोठा वाव असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी देखील उपलब्ध आहे. आपणही करू शकतो हे जगाला दाखवून देण्यासाठी नव्या पिढीने काम करायला हवे. आयुष्यात यश मिळवायचे असेल तर तुम्हाला स्वत:ची ब्रँडिंग करावी लागेल;ही ब्रँडिग म्हणजे मार्केटिंग नसून तुमचे सातत्यपूर्ण काम तुम्हाला ब्रँड बनवेल असेही त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले. यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी यांनी डॉ.मयेकर यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच अध्यक्षीय भाषणातून शरद काळमेघ यांनी एक दंतरूग्ण म्हणून डॉ. मयेकर यांच्या भाषणातून प्रेरित झाल्याची भावना विशद केली. आज दंतविज्ञान क्षेत्रात संशोधनाला मोठ्या प्रमाणावर वाव आहे. विद्यार्थ्यांनी प्रॅक्टिस सोबतच संशोधनाकडे वळून मोठी झेप घेणे गरजेचे आहे. डॉ . मयेकर यांनी सांगितलेला संदेश हाच उपदेश समजून नव्या पिढीने आयुष्यात यशस्वी होण्याचा सल्ला देखील त्यांनी दिला. हा कार्यक्रम म्हणजे केवळ सत्कार नसून उद्याच्या पिढीत नव्या आदर्शाची बीजे रोवण्याची धडपड आहे अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश गोंधळेकर यांनी तर कार्यक्रम आयोजनामागची भुमिका हेमंत काळमेघ यांनी मांडली. या कार्यक्रमाला अमरावती तसेच नागपूर येथील अनेक दंततज्ञ, दंतविज्ञान क्षेत्रातील विद्यार्थी, शिव परिवारातील अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळी,प्राध्यापक, कर्मचारी तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०३७/२०२६**
प्रकाश व ईतर -वि- निरंक
**पुढील ता.२५.०८.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. **Prakash Pundalikrao Chaudhari, Aged about 69 Yrs.Occu.: Nil**
2. **Aditya Prakash Chaudhari, Aged about 36 Yrs.Occu.: Household**
3. **Swati Chetan Akotkar, Aged about 39 Yrs.Occu.: Household**
**All R/o Rathi Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati.**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत** सुषमा प्रकाश चौधरी **हे दिनांक 21.11.2025 रोजी Amravati येथे मयत झाले. अर्जदार** प्रकाश व ईतर विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**त्यापेक्षा** प्रकाश व ईतर विरुध्द निरंक **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दिनांक** ०२.०७.२०२६ **रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

## पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रियेसाठी

फेरीअंतर्गत तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन गुंडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. या ८१ व्या फेरीमध्ये 'अखिल भारतीय कर्ज व गुंतवणूक सर्वेक्षण' (घ्उघ्ए) आणि 'कृषी कुटुंबांच्या परिस्थिती मूल्यांकन सर्वेक्षण' (ऐंए) ही दोन अत्यंत महत्त्वाची सर्वेक्षणे राबविण्यात येत आहेत. यावेळी मंचावर अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार, राष्ट्रीय सांख्यिंकी संस्था, नागपूरचे संचालक एल.एम. जडेजा, विशेष आयुक्त कृष्णा फिरके, अतिरिक्त आयुक्त दिनेश वाघ, अमोल खंडारे, सहाय्यक आयुक्त तथा प्रबोधिनीचे प्रबंधक श्यामकांत मस्के आदी उपस्थित होते.

दोन्ही सर्वेक्षणांचे महत्त्व अधोरेखित करताना विभागीय आयुक्त नयना गुंडे म्हणाल्या की, या सर्वेक्षणांमधून कुटुंबांचे उत्पन्न, ऋणस्थिती, गुंतवणूक तसेच कृषी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती याविषयी अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. ही माहिती ग्रामीण भागाचा विकास अधिक सक्षम करण्यासाठी, कुटुंबांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देणारी प्रभावी धोरणे तयार करण्यासाठी उपयुक्त ठरेल. हे सर्वेक्षण जरी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत करण्यात येत असले, तरी याचा संबंध प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सर्वच विभागांशी येतो.प्रशासकीय अधिकारी म्हणून जिल्ह्याच्या कामगिरीचा आढावा घेणे, विकासातील तफावत दूर करणे आणि भविष्यातील कामांचे नियोजन करण्यासाठी आम्ही सांख्यिकी अहवालांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो. त्यामुळे सांख्यिकी यंत्रणेचे कार्य केवळ अहवाल प्रकाशित करण्यापुरते मर्यादित नसून ते सुशासन अधिक प्रभावी बनविण्यास थेट हातभार लावते. अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय नेहमीप्रमाणेच गुणवत्ता, अचूकता आणि व्यावसायिकतेची उच्च मानके कायम ठेवत हे राष्ट्रीय सर्वेक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करेल, असा विश्वास विभागीय आयुक्तङ्कगुंडे यांनी व्यक्त करुन प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. जडेजा म्हणाले की, कर्ज आणि गुंतवणूक सर्वेक्षणातून ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांची वित्तीय स्थिती समजते. लोकांना बँकांकडून सहज कर्ज मिळते की ते अजूनही खाजगी सावकारांच्या पाशात अडकले आहेत, हे यातून स्पष्ट होते. यामुळे बँकिंग सेवांचा विस्तार करणे आणि गरजूंपर्यंत अधिकृत वित्तीय साहाय्य पोहोचवणे सरकारला सोपे जाते. तसेच शेतकरी कुटुंबाच्या परिस्थिती मुल्यांकन सर्वेक्षणातून शेतकरी बांधवांच्या नेमक्या अडचणी काय आहेत याबाबत माहिती मिळते. क्षेत्र स्तरावर प्रामाणिकपणे घेतलेली प्रत्येक मुलाखत आणि नोंदवलेले प्रत्येक उत्तर हे देशाच्या विकासाचा नकाशा तयार करत असते. म्हणूनच, हे प्रशिक्षण केवळ एका सर्वेक्षणापुरते मर्यादित नसून 'राष्ट्र निर्मितीला मदत करणारे' आणि 'जनकल्याणाचा पाया रचणारे' एक अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय कार्य आहे, असे जडेजा यांनी सांगितले.या सर्वेक्षणांचे यश हे प्रामुख्याने क्षेत्रीय स्तरावरील कामाच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे. प्रामाणिकपणे घेतलेली प्रत्येक मुलाखत, अचूकपणे नोंदविलेले प्रत्येक उत्तर आणि काळजीपूर्वक भरलेले प्रत्येक अनुसूची हे आपल्या अधिकृत सांख्यिकीची विश्वासार्हता वाढविणारे घटक आहेत. त्यामुळे या प्रशिक्षणाचा प्रत्येक प्रशिक्षणार्थींनी पूर्ण लाभ घ्यावा, सर्व संकल्पना नीट समजून घ्याव्यात आणि सर्वेक्षणाचे काम लक्षपूर्वक अभ्यासपूर्वक, प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने पार पाडावे, असे आवाहन अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आयुक्त डॉ. पडियार यांनी केले. तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि प्रशिक्षणार्थींचे आभार त्यांनी मानले. या तीन दिवसीय प्रशिक्षण सत्राला राज्यातील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे सर्व अधिकारी-कर्मचारी उपस्थित झाले आहे. याप्रसंगी विभागीय आयुक्त गुंडे यांच्या हस्ते प्रबोधिनीच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**
**२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती**

**चौकशीची जाहीर नोटीस**

**(नमुना क्र.०२)**

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.** **84/2026**
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक** श्री कृष्ण अवधुत महाराज संस्थान सार्सी, ता.नांदगांव खंडेश्वर जि.अमरावती
**बाबत अर्जदार -** श्री.सुभाष बापुरावजी गावंडे

**सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--**
**(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?**
**(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?**

(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - **मौजा सार्सी, मालमत्ता क.२६९ दगड विटा मातीचे बांधकाम एकुण क्षेत्रफळ २५ X २५ = २५०० चौ.फुट याची चतुःसिमा- पुर्वेस - खाली जागा, पश्चिमेस - खाली जागा, उत्तरेस - पांडुरंग भोपळे यांचे घर, दक्षिणेस - सरकारी रोड**

स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत रु.१,८०,०००/- (एक लाख ऐंशी हजार रुपये)

**सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.**

**ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक** २९.०६.२०२६ **रोजी दिली.**

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**
**२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती**

**चौकशीची जाहीर नोटीस**

**(नमुना क्र.०२)**

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.** **106/2026**
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक** विठ्ठल मंदिर सावंगा गुरव ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती जि.अमरावती
**बाबत अर्जदार -** श्री.दिलीप श्रीधरराव चव्हाण

**सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--**
**(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?**
**(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?**

(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - **मौजा सावंगा गुरव मालमत्ता क.१२८ दगड-विठा मातीचे बांधकाम एकुण क्षेत्रफळ ४० X ३०= १२०० चौ.फुट याची चतुःसिमा- पुर्वेस-श्री.चव्हाण यांचे घर, पश्चिमेस- रस्ता, उत्तरेस - खाली जागा, दक्षिणेस - खाली जागा**

स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत रु.१९,१६,४०४/- (एकोणीस लाख सोळा हजार चारशे चार रुपये)

**सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.**

**ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक** २९.०६.२०२६ **रोजी दिली.**

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ मंगळवार, ७ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# बायोमायनिंगचा 'बॉम्ब' फुटताच पालिकेत धावपळ?

## मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात 'हाय अलर्ट'; प्रकल्पाची फाईल तातडीने ताब्यात, दीड तास बंदद्वार बैठक

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या २ कोटी ७ लाख रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पातील कथित अनियमिततेवर प्रकाश टाकणारे वृत्त प्रसिद्ध होताच सोमवारी नगर परिषदेत मोठी प्रशासकीय खळबळ उडाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर आली आहे. सकाळच्या पहिल्याच सत्रात मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित प्रकल्पाची संपूर्ण फाईल तातडीने आपल्या दालनात मागवून घेतल्याची माहिती मिळाली. त्यानंतर संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत तब्बल एक ते दीड तास बंदद्वार बैठक झाल्याचे सांगितले जात आहे.


संग्रहित छायाचित्र

### २.०७ कोटींच्या प्रकल्पावरील प्रश्नांनंतर प्रशासनाची धावपळ; सत्ताधाऱ्यांची चुप्पी कायम, दस्तऐवज जाहीर करण्याची नागरिकांची मागणी तीव्र

या बैठकीत कोणत्या कागदपत्रांची पडताळणी झाली, कोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली, संबंधित अधिकाऱ्यांना कोणत्या सूचना देण्यात आल्या किंवा प्रकल्पातील नोंदींचा आढावा घेण्यात आला का, याबाबत प्रशासनाने कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण दिलेले नाही. मात्र, वृत्त प्रसिद्ध होताच प्रशासनाची झालेली ही धावपळ अनेक प्रश्नांना जन्म देणारी ठरली आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या वृत्तामध्ये डम्पिंग ग्राऊंडवर प्रत्यक्षात लेगसी वेस्ट उपलब्ध होता का, कचऱ्याचे मेट्रिक टन मोजमाप कोणत्या तांत्रिक सर्वेक्षणावर आधारित होते, बायो-कल्चरचा वापर झाला का, आरडीएफची निर्मिती व विल्हेवाट कशी लावण्यात आली, त्यासंबंधी ई-वे बिल, जीएसटी चलने, स्वीकार प्रमाणपत्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानग्या, प्रयोगशाळा अहवाल, तृतीय पक्ष तपासणी, ड्रोन सर्व्हे आणि देयक मंजुरीची प्रक्रिया यासंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. या प्रश्नांपैकी एकाही प्रश्नाचे अधिकृत उत्तर अद्याप समोर आलेले नाही.

#### प्रशासनाची धावपळ नेमकी कशासाठी?

नगर परिषदेत झालेल्या कथित बैठकीमुळे एक महत्त्वाचा प्रश्न पुढे आला आहे. जर प्रकल्पातील सर्व प्रक्रिया नियमबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने पार पडल्या असतील, तर बातमी प्रसिद्ध झाल्यानंतरच तातडीने फाईल मागविण्याची आवश्यकता का निर्माण झाली? ही नियमित प्रशासकीय प्रक्रिया होती की वृत्तात उपस्थित झालेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाकडून अपेक्षित आहेत.

#### सत्ताधाऱ्यांची चुप्पी अधिकच बोलकी?

या प्रकरणात नगराध्यक्ष, आरोग्य सभापती तसेच सत्ताधारी गटातील एकाही लोकप्रतिनिधीने अद्याप अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही. सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पावर गंभीर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर लोकप्रतिनिधींनी नागरिकांसमोर वस्तुस्थिती मांडणे अपेक्षित असताना त्यांची कायम असलेली चुप्पी नव्या चर्चांना खतपाणी घालत असल्याचे बोलले जात आहे. यापूर्वी घनकचरा संकलनाच्या कंत्राटात सत्ताधारी गटाशी संबंधित व्यक्तींच्या भागीदारीबाबतही प्रश्न उपस्थित झाले होते. त्या पार्श्वभूमीवर आता बायोमायनिंग प्रकल्पातील कथित त्रुटींवर निर्माण झालेला वाद सत्ताधाऱ्यांसाठी अधिकच अस्वस्थ करणारा ठरत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.


अकोटच्या बायोमायनिंगमध्ये 'कोट्यवधींचा खेळ'चा संशय?

#### 'मौन जितके वाढते, तितके प्रश्नही वाढतात!'

नगर परिषदेत दिवसभर एकाच विषयाची चर्चा होती. 'जर सर्व काही नियमानुसार झाले असेल, तर नागरिकांसमोर कागदपत्रे ठेवण्यास अडचण काय?' हा प्रश्न वारंवार उपस्थित होत होता. दुसरीकडे, सत्ताधाऱ्यांच्या मौनामुळे राजकीय वर्तुळातही विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, या प्रकरणात पुढील काही दिवसांत आणखी महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### 'सात टक्के' चर्चांचीही पालिकेत कुजबुज

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर नगर परिषद वर्तुळात आणखी एका चर्चेने जोर धरला आहे. एका प्रभावशाली पदाधिकाऱ्याने या प्रकरणात कथित 'सात टक्क्यांवर मांडवली' केल्याची चर्चा काही स्तरांवर रंगत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या चर्चेला कोणताही अधिकृत पुरावा उपलब्ध नाही. संबंधित व्यक्तींनीही याबाबत कोणतीही भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे या चर्चांची स्वतंत्र पुष्टी झालेली नसून, त्याबाबत अधिकृत तपास अथवा स्पष्टीकरण होणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे.

#### दस्तऐवज जाहीर करण्यास अडचण कोणती?

सार्वजनिक निधीचा वापर करून राबविण्यात आलेल्या कोणत्याही प्रकल्पात पारदर्शकता हा मूलभूत निकष मानला जातो. त्यामुळे संबंधित निविदा, कार्यादेश, मेट्रिक टन मोजणी अहवाल, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), आरडीएफ स्वीकार प्रमाणपत्र, ई-वे बिल, जीएसटी चलने, बायो-कल्चर खरेदीची कागदपत्रे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निरीक्षण अहवाल, तृतीय पक्ष तपासणी, प्रयोगशाळा अहवाल आणि देयक मंजुरीशी संबंधित सर्व कागदपत्रे नागरिकांसाठी खुली करण्यात यावीत, अशी मागणी आता अधिक तीव्र झाली आहे.

#### कायद्याच्या चौकटीत चौकशीची मागणी

घडामोडींवर लक्ष ठेवणाऱ्या नागरिकांचे म्हणणे आहे की, या प्रकरणातील सर्व शंका केवळ अधिकृत कागदपत्रे सार्वजनिक करूनच दूर होऊ शकतात. जर सर्व प्रक्रिया नियमांनुसार झाल्या असतील, तर प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता संबंधित दस्तऐवज जाहीर करावेत. अन्यथा स्वतंत्र तांत्रिक आणि प्रशासकीय चौकशीची मागणी अधिक जोर धरू शकते.

दरम्यान, या प्रकरणात उपस्थित करण्यात आलेले आरोप, संशय आणि चर्चा यांची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही. संबंधित प्रशासन, कंत्राटदार आणि लोकप्रतिनिधी यांची बाजू समोर येणे बाकी आहे. त्यामुळे या वृत्तातील सर्व मुद्दे उपलब्ध माहिती, सूत्रांकडून मिळालेली माहिती आणि नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर आधारित असून, संबंधितांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यास तेही प्रसिद्ध करण्यात येईल.

#### नागरिकांचे थेट प्रश्न

- ✔ बातमी प्रसिद्ध होताच फाईल तातडीने का मागविण्यात आली?
- ✔ बंदद्वार बैठकीत नेमकी कोणती कागदपत्रे तपासण्यात आली?
- ✔ लेगसी वेस्टचे अधिकृत मोजमाप नेमके किती होते?
- ✔ आरडीएफ, बायो-कल्चर आणि पर्यावरणीय अनुपालनाचे पुरावे सार्वजनिक का केले जात नाहीत?
- ✔ नगराध्यक्ष आणि सत्ताधारी लोकप्रतिनिधी अद्याप मौन का बाळगत आहेत?
- ✔ पारदर्शकतेचा दावा असेल, तर संपूर्ण प्रकल्पाची कागदपत्रे नागरिकांसमोर कधी येणार?

# बालविवाह प्रकरणात तपासाची चक्रे वेगाने फिरली?

## ग्रामपंचायत कार्यालय बंद; जन्मनोंदींची पडताळणी, मुलीच्या समुपदेशनाचीही शक्यता



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील कथित अल्पवयीन मुलीच्या विवाहप्रकरणी वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर पोलिस यंत्रणेने हालचाली वाढवल्याची माहिती समोर येत आहे. संबंधित गावात पोलिसांची तपास पथके जाऊन आल्याचे सांगितले जात असून, या भेटीदरम्यान ग्रामपंचायत कार्यालय बंद असल्याने संबंधित पदाधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष संपर्क होऊ शकला नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या घडामोडींमुळे आता तपास केवळ प्राथमिक चौकशीपुरता न राहता दस्तऐवजांच्या पडताळणीच्या टप्प्यात पोहोचल्याची चर्चा सुरू झाली आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणात संबंधित ग्रामपंचायतीकडे पत्रव्यवहार करून मुलीच्या जन्मनोंदी, जन्मदाखला, वयाशी संबंधित अभिलेख आणि इतर शासकीय नोंदींची पडताळणी करण्याची प्रक्रिया हाती घेतली जाणार असल्याचे समजते. या माहितीची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नसली तरी, तपासाचा केंद्रबिंदू आता मुलीच्या वयाच्या अधिकृत पुराव्यांकडे वळल्याचे बोलले जात आहे.

बालविवाहासंदर्भातील कोणत्याही चौकशीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संबंधित व्यक्तीचे वास्तविक वय. अशा वेळी जन्मनोंद, जन्मदाखला, शालेय दाखले, आधारभूत शासकीय अभिलेख आणि इतर उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी ही तपासाची अत्यंत महत्त्वाची कडी मानली जाते. त्यामुळे या प्रकरणातही अधिकृत नोंदी काय सांगतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सूत्रांच्या दाव्यानुसार, तपासादरम्यान संबंधित अल्पवयीन मुलीचे समुपदेशन (कौन्सिलिंग) करण्याचाही विचार पोलिसांकडून केला जाऊ शकतो. अशा प्रकारचे समुपदेशन हे कायदेशीर चौकशीचा भाग म्हणून, मुलीला विश्वासात घेऊन तिच्याकडून कोणताही दबाव किंवा भीती न ठेवता वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी उपयुक्त मानले जाते. मात्र, यासंदर्भात पोलिस विभागाकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.कायदेतज्ज्ञांच्या मते, अल्पवयीन मुलीच्या कथित विवाहासंदर्भात केवळ कागदपत्रांची पडताळणी पुरेशी नसून, विवाह कोणाच्या पुढाकाराने झाला, त्यासाठी कोणाची भूमिका होती, विवाहाची माहिती स्थानिक प्रशासनाला होती का, आणि माहिती असूनही आवश्यक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली का, या सर्व बाबींचा निष्पक्ष तपास होणे आवश्यक आहे. तपासात समोर येणाऱ्या प्रत्येक बाबीची पडताळणी पुरावे, साक्षीदारांचे जबाब आणि अधिकृत नोंदींच्या आधारेच केली जाणे अपेक्षित असल्याचेही तज्ज्ञांचे मत आहे.

दरम्यान, संबंधित ग्रामपंचायतीतील जन्मनोंदी किंवा वयासंदर्भातील अभिलेखांमध्ये कोणतीही विसंगती आढळते का, याबाबतही उत्सुकता वाढली आहे. तथापि, कोणतीही अनियमितता झाल्याचा निष्कर्ष अद्याप अधिकृतरीत्या निघालेला नाही. त्यामुळे तपास पूर्ण होईपर्यंत कोणावरही दोषारोप करणे उचित ठरणार नाही.

#### कायदा काय सांगतो?

बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार बालविवाह रोखणे ही केवळ पोलिसांचीच नव्हे, तर स्थानिक प्रशासन, संबंधित अधिकारी आणि समाजाचीही सामूहिक जबाबदारी मानली जाते. अशा प्रकरणात विवाहास मदत करणे, प्रोत्साहन देणे किंवा माहिती असूनही आवश्यक ती कारवाई न करणे, या बाबींची चौकशी संबंधित पुराव्यांच्या आधारे केली जाऊ शकते. त्यामुळे या प्रकरणातील प्रत्येक टप्प्याचा तपास कायद्याच्या चौकटीत आणि निष्पक्षपणे होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**जन्मदाखला व इतर अभिलेखांची पडताळणी नेमकी काय सांगणार?**
**ग्रामपंचायतीने पोलिसांना अपेक्षित कागदपत्रे उपलब्ध करून दिली का?**
**संबंधित मुलीचे समुपदेशन होणार का, आणि त्यातून कोणती वस्तुस्थिती समोर येणार?**
**विवाहासंदर्भातील निर्णयप्रक्रियेत नेमके कोण सहभागी होते?**
**तपासाचा अंतिम अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कधी जाणार?**


या सर्व प्रश्नांची उत्तरे अधिकृत तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहेत. तोपर्यंत या प्रकरणातील सर्व दावे, आरोप आणि चर्चांची पडताळणी तपास यंत्रणांकडून होणे आवश्यक आहे. संबंधित ग्रामपंचायत, पोलिस विभाग आणि इतर संबंधित पक्षांची अधिकृत भूमिका समोर आल्यानंतरच या प्रकरणाचे संपूर्ण चित्र स्पष्ट होईल. बालविवाहासारख्या संवेदनशील विषयात संशयालाही वाव राहू नये, यासाठी पारदर्शक, निष्पक्ष आणि पुराव्यावर आधारित चौकशी हीच जनतेची प्रमुख अपेक्षा असल्याचे नागरिकांमधून व्यक्त होत आहे.


बालविवाहाची 'कुजबुज' की मोठे रॅकेट?
अल्पवयीन मुलीचा विवाह, पोलिस तपासावर प्रश्न; 'त्या' ग्रामपंचायतीच्या भूमिकेचीही चर्चा

# आज रंगणार 'शेतमाल बाजार व्यापार' आणि 'कृषी पायाभूत सुविधा निधी' विषयावर कार्यशाळा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना बाजारपेठेतील किमतीच्या चढ-उतारांपासून संरक्षण मिळवून देण्यासाठी आणि कृषी व्यवसायाला बळकटी देण्यासाठी एका विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, आत्मा कृषी विभाग, वाशिम आणि 'एनसीडीईएक्स इन्स्टिट्यूट ऑफ कमोडिटी मार्केट्स अँड रिसर्च' यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापित 'किंमत जोखीम व्यवस्थापन कक्ष'च्या माध्यमातून मंगळवार, दिनांक ७ जुलै २०२६ रोजी वाशिम येथील 'विदाता प्रशिक्षण केंद्र' येथे या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचा मुख्य विषय 'शेतमाल वायदा बाजाराद्वारे किंमत जोखीम व्यवस्थापन व कृषी पायाभूत सुविधा निधी' असा आहे.



#### आत्माच्या प्रकल्प संचालक अनिसा महाबळे यांचे उपस्थित राहण्याचे आवाहन

या एकदिवसीय प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञांद्वारे शेतमाल बाजाराचे महत्त्व, भविष्यातील व पर्यायी करारांची (फ्युचर्स आणि ऑप्शन्स) नेमकी कार्यपद्धती आणि शेतीमालाच्या किमती अचानक घसरल्यास होणारे नुकसान टाळण्यासाठी किंमत सुरक्षिततेचा (हेजिंग) प्रभावी वापर कसा करावा, यावर सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. यासोबतच, उपस्थित शेतकरी आणि संस्थांना आर्थिक साक्षरता, शेअर बाजार व व्यापाराची (ट्रेडिंग) प्राथमिक माहिती, 'नाबार्ड' मार्फत हळद वायद्यासाठी उपलब्ध असलेल्या विशेष अनुदानित योजना आणि कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत मिळणाऱ्या विविध शासकीय सवलतींची सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

वाशिम जिल्ह्यातील सर्व शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच वैयक्तिक शेतकऱ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. सर्व संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील, उत्साही आणि कृषी व्यवसायामध्ये रुची असणाऱ्या जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे आणि या कार्यशाळेला उपस्थित राहावे.

# शिबिरांद्वारे जात वैधता प्रमाणपत्राचे वाटप

**अकोल :** जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती राजर्षी शाहु महाराज जयंती पर्वअंतर्गत विशेष त्रुटी पुर्तता शिबीरे घेण्यात आली. त्यात ३०० जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आले आहे.

विशेष मोहिमेअंतर्गत ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदर वेबिनारमध्ये जात वैधता प्रमाणपत्रसाठी अर्ज करण्याची संपुर्ण प्रक्रिया आवश्यक कागदपत्रे, तसेच अर्ज करताना येणा-या अडचणी व शंकांचे तज्ज्ञांमार्फत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. उच्च शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम यांच्या नव्या प्रवेशितांसाठी विशेष खिडकीचे नियोजन करण्यात आले होते.

# अल्पसंख्यांक वस्तीगृह लिपीक पदभरतीची मुलाखत ८ जुलै रोजी; ११ उमेदवार पात्र

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अल्पसंख्यांक शासकीय वस्तीगृहाच्या व्यवस्थापकीय कामकाजासाठी कंत्राटी लिपीक पदभरतीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. जिल्हा सेतू समितीद्वारे या पदासाठी आलेल्या अर्जांची छाननी पूर्ण झाली असून, पात्र ठरलेल्या ११ उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत आगामी बुधवारी, दिनांक ८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृह? येथे घेतली जाणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सेतू समितीचे सदस्य सचिव विश्वनाथ घुगे यांनी दिली आहे.

या कंत्राटी लिपीक पदासाठी जिल्हा सेतू समितीकडे १ जुलै २०२६ रोजी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त अर्जांमधून मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांमध्ये निता मनोज खडसे (चिंचखेडा), पल्लवी संदीप ठाकरे (वाशिम), कु. नसीम राजु मांजरे (वाशिम), कु. दिपीका सदाशिव गवई (झोडगा बु.), राणी सतिश नकले (वाशिम), गायत्री सतिश नकले (वाशिम), निकीता श्रीकृष्ण भगत (जोगलदरी), आरती लक्ष्मण श्रृंगारे (मंगरूळपीर), स्नेहल रविंद्र शेंडे (अकोला), अनिता बंडु इंगोले (हिंगोली) आणि कोमल राम घाटेगावकर (वाशिम) यांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या सूचनेनुसार, या यादीतील सर्व उमेदवारांनी मुलाखतीसाठी येताना आपले शैक्षणिक व इतर सर्व मूळ कागदपत्रे सोबत आणणे अनिवार्य आहे.

# सावरगांव कान्होबा धरणाच्या गाळ उपशासाठी वन प्रशासनाने सर्वमान्य तोडगा काढावा; गोर सेनेची मागणी

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील गोरोली वन वर्तुळात येत असलेल्या सावरगांव कान्होबा या धरणाची निर्मिती सुमारे ३५ वर्षांपूर्वी झाली असून पंचक्रोशीतील हजारो एकर शेती ओलीत होईल या आशेने स्थानिक शेतकऱ्यांनी आपली शेती प्रकल्पासाठी त्यावेळी दिली होती मात्र वन प्रशासन या धरणावर आपले अधिकार दाखवीत असल्याने हे धरण निर्मिती झाल्यापासून आजतागायत गाळाने भरले आहे .

धरणात जमा झालेली ही गाळ काढण्यासंदर्भात वन प्रशासनाने योग्य तो तोडगा वा सर्वमान्य उपाययोजना करण्याच्या मागणीचे निवेदन गोरसेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने आज वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाला देण्यात आले.



राज्याचे महसूल व वन प्रशासन एकीकडे शेतकऱ्यांना कुठलीही अडकाठी न आणता धरणातील माती उपलब्ध करून दिल्या जाईल असे धडाधड आदेश काढत असताना सावरगांव कान्होबा धरणातील गाळ मात्र मागील तीन तपांपासून अधिक वर्षापासून तसिच जमा होत आहे ज्याला वन प्रशासनाचे आडमुठे धोरण जबाबदार असल्याचे बोलले जात आहे.

सावरगाव कान्होबा, खापरी कान्होबा साळंबी आणि चिखलागड पर्यंत या धरणाच्या कालव्याने एकेकाळी जवळपास हजार एकर शेती सिंचित होऊन हा परिसर सुजलाम सुफलाम झाला होता.

धरणामध्ये मागील अनेक वर्षांपासून सातत्याने गाळ जमा होत असल्याने या धरणाची साठवणूक क्षमता क्षीण झाली आहे ज्याचा फटका स्थानिक, साळंबी व चिखलागडच्या शेतकऱ्यांना सोसावा लागत असल्यामुळे गाळमुक्त धरण जलयुक्त शिवार या शासनाच्या धोरणानुसार उपरोक्त धरणातील माती (गाळ) उचलण्यासंदर्भात वन प्रशासनाने सकारात्मक धोरण अवलंबून सध्या हे धरण ज्या प्रशासकीय आस्थापनेच्या ताब्यात आहे त्यांच्यासोबत समन्वय साधत धरन गाळमुक्त कसे होईल या संदर्भात आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी गोरसेना ह्या संघटनेचे पदाधिकारी गोपाल चव्हाण आणि सुनील राठोड यांच्या वतीने करण्यात आली आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २२० ■ मंगळवार ७ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


## आपत्कालीन परिस्थितीत हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई जनमाध्यम :** राज्यात उद्भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला पूर्णपणे सतर्क राहण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकटसमयी जाहीर केलेल्या अधिकृत हेल्पलाईन क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.



राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधू शकतात. याशिवाय, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थानिक पातळीवर जलद गतीने मदत कार्य राबवण्यासाठी आणि परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षही सज्ज ठेवण्यात आले आहेत, ज्यांचा मुख्य संपर्क क्रमांक १०७७ असा आहे, असेही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या संवेदनशील क्षेत्रांतील नागरिकांच्या सुरक्षिततेची योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी नागरिकांनी अजिबात न घाबरता या जाहीर केलेल्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून प्रशासकीय यंत्रणेची मदत घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## बांधकाम कामगारांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

### सीमा शिंदे यांच्या निलंबनासह १७ मागण्यांचे निवेदन



**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवरून स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत मुख्यमंत्री यांच्या नावे चार पानी सविस्तर निवेदन सादर केले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात शेकडो महिला-पुरुष बांधकाम कामगार सहभागी झाले. यावेळी शासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

संघटनेने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या वर्धा जिल्ह्यातील कामकाजावर गंभीर आक्षेप नोंदवत नोंदणीकृत कामगारांचे हजारो अर्ज अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याचा आरोप केला. त्यामुळे पात्र कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत नसल्याने त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.निवेदनात शासकीय कामगार अधिकारी सीमा शिंदे यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्या कार्यकाळाची विभागीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या अधिकृत लॉगिनचा वापर कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आल्याचा संशय व्यक्त करत संपूर्ण प्रकरणाची सायबर फॉरेन्सिक चौकशी करण्याची मागणीही संघटनेने केली आहे. हे आरोप संघटनेने आपल्या निवेदनात केले असून, त्याबाबत अधिकृत चौकशी झालेली नाही.

ऑनलाइन प्रणालीतील त्रुटींमुळे अर्ज प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचा मुद्दाही संघटनेने उपस्थित केला. ओटीपी न मिळणे, पोर्टल बंद पडणे, अर्जाची स्थिती पाहता न येणे आणि लाभ मंजुरीस होणारा विलंब यामुळे कामगारांना मोठा मनस्ताप होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

संघटनेने मुख्यमंत्र्यांकडे एकूण १७ मागण्या मांडल्या असून, त्यात प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा, पात्र कामगारांना योजनांचा लाभ, ऑनलाइन प्रणालीत पारदर्शकता, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई आणि कामगारांच्या हक्कांचे संरक्षण यांचा समावेश आहे.

यावेळी उमेश अग्निहोत्री यांनी, मागण्यांवर तातडीने निर्णय न झाल्यास राज्यभर तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. निवेदन स्वीकारण्यात आले असून, मोठ्या संख्येने पदाधिकारी व बांधकाम कामगार उपस्थित होते.

## मंजुरी मिळाली; अनुदान मात्र रखडले

### शिलाई मशीन व सायकल लाभार्थी तीन महिन्यांपासून प्रतीक्षेत; महिला व बाल कल्याण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील महिला व बाल कल्याण विभागाच्या कारभारामुळे शिलाई मशीन व सायकल योजनेतील लाभार्थ्यांना मंजुरी मिळूनही गेल्या तीन महिन्यांपासून शासकीय अनुदानाची प्रतीक्षा करावी लागत आहे. वारंवार पंचायत समिती आणि संबंधित कार्यालयाच्या फेऱ्या मारूनही अनुदान न मिळाल्याने लाभार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.लहान आर्वी येथील लाभार्थी विशाखा दीपक सरदार यांनी शिलाई मशीनसाठी मंजुरी मिळाल्यानंतर पत्रातील सूचनेनुसार गळ्यातील दागिने गहाण ठेवून ६,२२५ रुपयांची मशीन खरेदी केली. आवश्यक कागदपत्रे आणि मशीनचे छायाचित्र पंचायत समितीमार्फत महिला व बाल कल्याण विभागाकडे सादर करण्यात आले. मात्र, अद्याप त्यांच्या खात्यात अनुदान जमा झालेले नाही.आष्टी तालुक्यात शिलाई मशीन योजनेचे सात तर सायकल योजनेचे तीन लाभार्थी आहेत. सर्वांनाच अनुदानासाठी प्रतीक्षा करावी लागत असून, रोज पंचायत समिती कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असल्याची तक्रार लाभार्थ्यांनी केली आहे. गरीब महिलांना स्वावलंबी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, महिला व बाल कल्याण विभागाचे कनिष्ठ सहाय्यक अभिषेक जगताप यांनी निधी उपलब्ध असून शासनाच्या ठरावानुसार पुढील आठवड्यात तो तालुका स्तरावर वितरित केला जाईल, असे सांगितले. तर पंचायत समितीचे कनिष्ठ सहाय्यक खुशाल ठाकरे यांनी सर्व प्रस्ताव तीन महिन्यांपूर्वीच वर्धा कार्यालयात पाठविल्याचे स्पष्ट करत निधी वितरणाचा निर्णय वरिष्ठ स्तरावर होणार असल्याचे सांगितले. लाभार्थ्यांनी प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करण्याची मागणी केली आहे.

## कोणाच्या आशीर्वादाने' उभी राहिली अतिरिक्त नाली : चार लाखांच्या कामाची चौकशी मागणी

### मंजुरीशिवाय ७० मीटर अतिरिक्त नालीचे बांधकाम; सार्वजनिक निधीच्या अपव्ययाचा आरोप, दोषींवर कारवाईची मागणा

**वर्धा जनमाध्यम :** सिंधी (मेघे) येथील वार्ड क्रमांक ४ मधील नाली बांधकामाच्या कामात मंजूर आराखड्याला हरताळ फासून सार्वजनिक रस्त्याच्या जागेवरच नाली उभारण्यात आल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. या कथित अनियमिततेमुळे सुमारे चार लाख रुपयांच्या सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचा आरोप स्थानिक नागरिक अनिल गावंडे यांनी करत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, नारायण महाकाळे यांच्या घरापासून पराते यांच्या घरापर्यंत नालीचे काम मंजूर आराखड्यानुसार पूर्ण झाले होते. मात्र, त्यानंतर कोणतीही प्रशासकीय मंजुरी नसताना नारायण महाकाळे ते दिलीप पावडे यांच्या घरापर्यंत सुमारे ७० मीटर



अतिरिक्त नाली बांधण्यात आली. या कामासाठी सुमारे चार लाख रुपये खर्च झाल्याचा दावा करण्यात आला असून, ग्रामपंचायतीच्या नोंदीत या कामाची कोणतीही मंजुरी नसल्याचा आरोप आहे.

यापूर्वी संबंधित ठिकाणच्या अतिक्रमणाबाबत ग्रामपंचायतीकडे तक्रारी दाखल असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. उलट मंजूर जागा बदलून सार्वजनिक रस्त्याच्या जागेवरच नाली बांधण्यात आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, नाली रस्त्यापेक्षा उंच बांधण्यात आल्यामुळे पावसाचे पाणी नालीत न जाता रस्त्यावर साचण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या नालीचा सार्वजनिक उपयोगच संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून, कामाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

संबंधित कंत्राटदाराने प्रत्यक्ष देखरेख न करता काम इतरांकडे सोपविल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणात निष्काळजीपणा की संगनमत, याची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. तक्रारदारांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे तातडीने स्थळ पाहणी करून अनधिकृत नाली हटविणे, झालेला खर्च संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करणे, कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकणे आणि दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता या गंभीर आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर येणार का, की प्रकरण दडपले जाणार, याकडे सिंधी (मेघे) परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सीएनजीसाठी ऑटोचालक रस्त्यावर; जिल्हाधिकारी कार्यालयात निदर्शने

### आम आदमी पार्टीचे आंदोलन; चौकशीचे आदेश

**वर्धा जनमाध्यम :** शहर व ग्रामीण भागातील सीएनजी ऑटोचालकांना मागील तीन महिन्यांपासून सीएनजीऐवजी सीबीजी (बायोगॅस) पुरविला जात असल्याचा आरोप करत आम आदमी पार्टीच्या नेतृत्वाखाली सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी करण्यात आली.

ऑटोचालकांनी सांगितले की, पेट्रोलच्या वाढत्या दरामुळे अनेक चालकांनी कर्ज काढून फायनान्सवर जवळपास ३०० सीएनजी ऑटो



खरेदी केले.

मात्र सावंगी व रमणा येथील सीएनजी पंपांवर मागील तीन महिन्यांपासून सीएनजीऐवजी सीबीजीचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे वाहनांचे मायलेज घटत असून, गाड्या वारंवार बंद पडणे, सुरू होण्यास अडचण येणे तसेच काही वाहनांच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्याचा दावा चालकांनी केला.

याप्रकरणी संबंधित पंपांची चौकशी करून चालकांना दर्जेदार सीएनजी उपलब्ध करून द्यावी तसेच वर्धा शहरात स्वतंत्र सीएनजी पंप सुरू करण्यात यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

निवासी जिल्हाधिकारी प्रताप वाघमारे आणि जिल्हा पुरवठा अधिकारी राजू रणवीर यांच्यासोबत झालेल्या चर्चेत संबंधित दोन्ही पंपांची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

या आंदोलनात आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय सदस्य मंगेश शेंडे, उपजिल्हाप्रमुख किरण पारिसे, ऑटो युनियनचे अध्यक्ष ईश्वर गायकवाड यांच्यासह एजाज शेख, कादर पठाण, प्रवीण दुधाने, बंडूजी डहाके, प्रमोद चौधरी, महेश वाडी, आकाश पाणबुडे, नितीन खडसे, पंकज पेटकर, सतीश सातपुते, अमोल खान, महेश गोरी, सौरभ डुकरे, हरीश शेलकर, नवीन ढुमणे, गजानन शेळके, आदित्य, प्रशांत राऊत आणि मोठ्या संख्येने ऑटोचालक सहभागी झाले.

## कामगारांच्या हक्कांसाठी रणशिंग; राज्यभर तीव्र आंदोलनाचा इशारा

### आयटकच्या राज्यस्तरीय शिबिराची सांगता; २९ जुलैला दिल्लीत कामगार-शेतकरी संसद

**वर्धा जनमाध्यम :** ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक)च्या वतीने आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबिर व बैठकीची वर्धा येथील बच्छराज धर्मशाळा सभागृहात उत्साहात सांगता झाली. राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग घेत संघटन बळकटीसह आगामी आंदोलनाची दिशा निश्चित केली.

समारोपप्रसंगी आयटकचे राज्य सरचिटणीस कॉ. श्याम काळे यांनी संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार, कंत्राटी कर्मचारी, हमाल, बांधकाम कामगार, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या आदींच्या प्रलंबित प्रश्नांवर राज्यव्यापी जनआंदोलन उभारून लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांसह चार श्रमसंहितांना संघटितपणे विरोध करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शिबिरात आयटकचे राष्ट्रीय सचिव कॉ. सुकुमार दामले, अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले, राष्ट्रीय सचिव कॉ. बबली रावत, सी. जे. जोसेफ, राज्य सचिव कॉ. प्रा. राम बाहेती, कॉ. नामदेव चव्हाण, ?ड. माधुरी क्षीरसागर आणि राजू देसले यांनी कामगार कायदे, सामाजिक सुरक्षा, असंघटित कामगारांचे हक्क, महिला कामगारांचे प्रश्न, संघटन बांधणी आणि भविष्यातील आंदोलनाच्या रणनीतीवर सविस्तर



मार्गदर्शन केले.

बैठकीत अनेक महत्त्वाचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. चार श्रमसंहितांचा पुनर्विचार करणे, कंत्राटी व असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा, किमान वेतन व रोजगाराची हमी देणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, महागाईवर नियंत्रण आणणे, सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण थांबविणे तसेच आशा व अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर निवडणूक कामाची सक्ती न करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी २९ जुलै रोजी दिल्ली येथे होणाऱ्या कामगार-शेतकरी संसदेत केंद्र व राज्य सरकारच्या कामगारविरोधी धोरणांविरुद्ध तीव्र आंदोलनाची घोषणा करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या आंदोलनात महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्णयही शिबिरात घेण्यात आला.

शिबिरात शाहीर सदाशिव निकम, धम्मा खडसे आणि सुष्टी खडसे यांनी श्रमिक चळवळीला प्रेरणा देणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात संघटन विस्तार, कामगार जनजागृती आणि विविध प्रश्नांवर व्यापक आंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच आयटकचे पुढील राज्य अधिवेशन नागपूर येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले असून, पुढील दोन महिन्यांत प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा अधिवेशन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्य कार्यकारिणी बैठकीला कॉ. दिलीप उटाणे, कॉ. शिवकुमार गणवीर, कॉ. सदाशिव निकम, कॉ. रमेश सहस्त्रबुद्धे, मिलिंद रानडे, होस्टलाल राहंगडाले, विजय बचाटे, विनोद झोडगे, देवराव चावले, नयन गायकवाड, मंजू वर्मा यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मनोहर पचारे, वंदना कोळणकर, विजया पावडे, मैना उईके, अलका भानशे, अरुणा नागोसे, गोदावरी राऊत, सुषमा ढोक, राजेश फाले, विनायक नन्नवरे, माला भगत, उज्वला नाखले, मंगला इंगोले, पुष्पा शंभरकर आणि जयमला बिलगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## स्मार्ट मीटरच्या सक्तीविरोधात ८ जुलैला महावितरण कार्यालयावर निवेदन

### हिंगणघाटमध्ये नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**हिंगणघाट जनमाध्यम :** राज्यात सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेला विरोध दर्शवत हिंगणघाटमध्ये ८ जुलै रोजी महावितरण कार्यालयावर निवेदन देण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या नेतृत्वाखाली सकाळी ११ वाजता हा उपक्रम होणार असून, शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संत तुकडोजी महाराज पुतळा चौक येथून पायी जात उपविभागीय अभियंता (महावितरण) कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांना स्मार्ट मीटरच्या सक्तीविरोधात निवेदन



सादर करण्यात येणार आहे.स्मार्ट मीटरमुळे सर्वसामान्य ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच ग्राहकांची संमती न घेता मीटर बसविण्याची सक्ती योग्य नसल्याचे मत अतुल वांदिले यांनी व्यक्त केले. शासनाने स्मार्ट मीटरची सक्ती तातडीने मागे घ्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या आंदोलनाचे आयोजन हिंगणघाट शहरातील नागरिकांच्या वतीने करण्यात आले असून, व्यापारी, शेतकरी, युवक, महिला तसेच विविध सामाजिक आणि व्यापारी संघटनांनी सहभागी होऊन आपल्या भावना शासनापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पार्सल कार्यालयाला कुलूप; एसटीतून खासगी पार्सल'चा धंदा तेजीत

### अधिकृत सेवा बंद, चालक-वाहकांकडून थेट वसुलीच्या चर्चांना उधाण; व्यापारी व नागरिक संतप्त

**वर्धा रवींद्र लाखे :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) पार्सल कार्यालयाची सेवा अचानक बंद झाल्याने व्यापारी, छोटे उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. अधिकृत पार्सल बुकिंगची सुविधा बंद असताना अनेक ठिकाणी एसटी चालक आणि वाहक थेट पैसे घेऊन पार्सल वाहतूक करत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे अधिकृत सेवा बंद करून अनधिकृत मार्गाला खतपाणी घातले जात आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पूर्वी पार्सल कार्यालयातून ठरावीक शुल्क भरून सुरक्षितरीत्या माल पाठविण्याची सुविधा उपलब्ध होती. मात्र कार्यालयाला अचानक कुलूप लागल्याने व्यापाऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. वेळेवर माल पोहोचविण्यासाठी आता अनेकांना थेट चालक किंवा



वाहकांशी संपर्क साधावा लागत असल्याची माहिती पुढे येत आहे. यासाठी पार्सलच्या आकारानुसार मोठी रक्कम आकारली जात असल्याचे बोलले जात असून, या व्यवहाराला कोणतीही अधिकृत पावती किंवा नोंद नसल्याने महसूल नेमका कुठे जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अधिकृत पार्सल सेवा बंद असल्याने काही चालक-वाहकांच्या 'अतिरिक्त कमाई'त वाढ झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, एसटी महामंडळाने पार्सल सेवा बंद करण्यामागील कारण स्पष्ट करावे. जर सेवा बंदच ठेवायची असेल, तर पर्यायी अधिकृत व्यवस्था तातडीने उपलब्ध करून द्यावी. अन्यथा सर्वसामान्य नागरिक आणि व्यापाऱ्यांची आर्थिक पिळवणूक थांबणार नाही. एसटी ही जनतेची जीवनवाहिनी मानली जाते. त्यामुळे पार्सल सेवेत पारदर्शकता राखणे आणि अनधिकृत व्यवहारांवर कठोर कारवाई करणे ही महामंडळाची जबाबदारी आहे. पार्सल कार्यालये तातडीने सुरू करून संबंधित प्रकाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी व्यापारी व नागरिकांकडून होत आहे.

## ॲथलेटिक्स व शुटींग क्रीडा प्रकाराची निवड चाचणी

**वर्धा जनमाध्यम :** मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत जिल्ह्यामध्ये क्रीडा प्रतिभा विकास केंद्रामार्फत शुटींग या क्रीडा प्रकारामधून प्रत्येकी २० खेळाडूंची निवड चाचणी घेण्यात येणार आहे. यासाठी पात्र खेळाडूंनी १० जुलै रोजी आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवड झालेल्या खेळाडूंना उच्च दर्जाचा पुरक आहार आणि गणवेश, अद्ययावत क्रीडा साहित्य, राष्ट्रीय व विदेश स्पर्धेसाठी प्रवास खर्च, तज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि वैद्यकीय विमा या सुविधा मिळणार आहेत. यासाठी पात्र खेळाडूंचे वय ३१ जुलै रोजी २१ वर्षाच्या आत असावे. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. मागील दोन वर्षात शालेय किंवा अधिकृत संघटनेच्या स्पर्धेत सहभाग किंवा पदक प्राप्त असणे आवश्यक आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणा २४ बाय ७ 'अलर्ट मोड'वर ठेवा- मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यात वा-याचा ताशी वेग ५० ते ७० किलोमीटर प्रति तास असण्याची शक्यता आहे. यासोबतच आज दुपारी ३ ते ४.३० वाजे दरम्यान समुद्राला भरती येण्याची शक्यताही आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी २४ बाय ७ अलर्ट मोडवर राहून आपत्कालीन परिस्थिती आल्यास तातडीने मदत कार्य करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राज्यभरात मुसळधार पाउस पडण्याची शक्यता असल्याने आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये , असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत राज्यातील पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई आणि किनारी भागात सोसाट्याच्या वा-यासह पाउस अपेक्षित आहेत. अपेक्षित उच्च भरतीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना अलर्ट मोडवर ठेवण्यात आले आहेत. पुराची परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने 'एसडीआरएफ' आणि 'एनडीआरएफ' ची पथके रवाना करण्यात यावी. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना तातडीने मदत मिळेल, याची काळजी घ्यावी.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून महामार्गावरील मलबा हटविण्यात यावा. पावसाची परिस्थिती लक्षात घेउन संभाव्य दरड कोसळणा-या ठिकाणी पथके सज्ज ठेवावीत. तसेच मुंबई-गोवा महामार्गावर यावेळी अनपेक्षित ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून दरडीचा मलबा तात्काळ हटविण्यात यावा. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अरबी समुद्रावर बनत असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्याच्या ब-याचशा भागात उद्या ढगफुटी सदृश्य पाउस होण्याची दाट शक्यता आहे. हा पाउस ब-यापैकी त्र्यंबकेश्वर व आजूबाजूच्या परिसरात पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून सुमारे ३०० मिलिमीटर पाउस अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा प्रशासनाने सज्ज राहून सखल भागात पाणी साचणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. कुठेही जीवित हानी होणार नाही, याबाबतही दक्ष रहावे. ही परिस्थिती लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकश्वर परिसरात असलेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्यात यावी. बंद होउ शकणारे रस्ते, दरडी कोसळण्याची ठिकाणी अशा सर्वंकष बाबींचा विचार करून पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. पुढील काही दिवस त्र्यंबकश्वर परिसरामध्ये पर्यटकांनी जावू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. सर्व यंत्रणांनी अत्यंत सतर्क राहून अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी तात्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. पुढील ४८ तास शून्य बळी हे उद्दिष्ट ठेवून कमाल दक्षता बाळगावी, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुंबई शहरात एका महिन्याच्या सरासरी इतका पाउस अवघ्या चार दिवसांत नोंदवण्यात आला आहे. विशेषत? भरतीच्या काळात अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर आपत्तीजन्य स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. यंत्रणांच्या प्रयत्नांमुळे पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रित ठेवण्यात यश आले आहे. काल मुंबई शहरात ताशी ५० किलोमीटर वेगाने वारे वाहताना निदर्शनास आले. यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. साधारणपणे संपूर्ण चार महिन्यांच्या मान्सूनमध्ये जितकी झाडे पडतात, त्यापैकी जवळपास ३०० झाडे एकाच दिवशी पडली आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. येत्या तीन दिवसांत, म्हणजे ८ जुलैच्या रात्रीपर्यंत, हवामानाची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे. सर्व जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे. दरम्यान, भूस्खलनाच्या घटनाही समोर आल्या आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होउन मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले आहेत. संबंधित यंत्रणा मार्ग मोकळा करून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम कराव, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे विभागीय आयुक्त यांच्याकडून संबंधित विभागाचा आढावा घेतला. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, बृहन्मबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, प्रधान सचिव (नगरविकास) के. एच. गोविंदराज, प्रधान सचिव (जलसंपदा) एकनाथ डवले,मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सचिव (आरोग्य) ई. रविंद्रन, संचालक श्री. चव्हाण आदी उपस्थित होते




**पावसाच्या परिस्थितीचा मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षातून घेतला आढावा**
**अत्यावश्यक असल्याशिवाय दोन दिवस नागरिकांनी घराबाहेर पडू नये**

**थोडक्यात पावसाची माहिती**

आज ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुंबई उपनगर जिल्ह्यात १५१.२ मिलिमीटर पाउस झाला असून मुंबई शहरामध्ये १०५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. रायगड जिल्ह्यात २३६.६, ठाणे जिल्ह्यात १५८.७ रत्नागिरीमध्ये १५२.३ पावसाची नोंद झाली आहे.

## श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र ट्रस्टचे नवे महासचिव कृष्ण मोहन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**अयोध्याराम मंदिरातील दान या चोरीच्या प्रकरणानंतर वादाच्या भोव-यात सापडलेले श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांची अखेर ट्रस्टधून गच्छंती झाली



आहे. राम मंदिर ट्रस्टच्या महत्त्वाच्या बैठकीत या दोन्ही बड्या पदाधिका-यांचे राजीनामे मंजूर करण्यात आले आहेत. यानंतर आता श्रीराम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र ट्रस्टची हंगामी जबाबदारी कृष्ण मोहन यांच्याकडे देण्यात आली आहे. कृष्ण मोहन हे हरदोई जिल्ह्यातील शहाबाद विधानसभा मतदारसंघातील चंद्रपूर गावचे रहिवासी आहेत. कृष्ण मोहन समाजकार्यात सक्रिय आहेत. ते भारतीय वनसेवेतील माजी अधिकारी आहेत. त्यांनी महाराष्ट्र केडरमध्ये सेवा बजावली आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांची ट्रस्टचे नवीन विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. कामेश्वर चौपाल यांच्या निधनानंतर हे पद रिक्त झाले होते. सेवानिवृत्तीनंतर ते हरदोई जिल्ह्यात समाजकार्यात गुंतले आहेत. राम मंदिर ट्रस्टने त्यांची सदस्य म्हणून एकमताने निवड केली आहे. कृष्ण मोहन यांनी लखनौ विद्यापीठात शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी काही वर्षे अणुउर्जा विभागात काम केले आणि त्यांची भारतीय वनसेवेसाठी निवड झाली, जिथे त्यांनी महाराष्ट्रात सेवा बजावली. २०१२ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर, त्यांनी सक्रीयपणे समाजकार्यात सुरू केले. या मान्यतेमुळे त्यांना ट्रस्टमध्ये स्थान मिळाले. कृष्ण मोहन यांची निवड करून, ट्रस्टने हे स्पष्ट केले आहे की, दलित समाजाचे प्रतिनिधित्व पुढेही सुरू राहील. हंगामी महासचिव पदाची भूमिका स्वीकारताना कृष्ण मोहन म्हणाले की, जे घडले आहे त्यामुळे आम्हाला खूप दुःख झाले आहे. सर्वांना त्रास झाला आहे. रामाच्या भक्तांना त्रास झाला आहे. व्यवस्थापन आणि कामकाजात कुठेतरी त्रुटी होत्या, ज्याचा लोकांनी गैरफायदा घेतला.

## म्हाता-या माणसांनी निवृत्त होउन आश्रमात बसावे-अभिजित दीपके

**मुंबई/प्रतिनिधी :** काक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दीपके हे गेल्या काही दिवसांपासून चांगलेच चर्चेत आहेत. सोशल मीडियावर त्यांनी काक्रोच जनता पार्टी ही चळवळ सुरु केली. त्यानंतर नीट पेपरफुटीविरोधात आवाज उठवला. आता याच अभिजीत दीपकेंना तुम्ही अण्णा हजारेंची भेट घेणार का? या चळवळीचा भाग त्यांना करुन घेणार आहात का? असं विचारलं असता म्हाता-या माणसांनी निवृत्त व्हावं आश्रमात जावं असं म्हणत अण्णा हजारेंवर टीका केली आहे. छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी माध्यमांशी संवाद साधताना अभिजीत दीपके यांना माध्यम प्रतिनिधींनी त्यांना तुम्ही अण्णा हजारे यांची भेट घेणार का? असा थेट प्रश्न विचारला. या प्रश्नावर उत्तर देताना दीपके यांनी आपण अण्णा हजारे किंवा इतर कोणाचीही भेट घेणार नसल्याचं स्पष्ट केलं. आपली भूमिका स्पष्ट करताना अभिजीत दीपके म्हणाले की, ज्यांचे वय ६० ते ७० वर्षांपेक्षा जास्त झाले आहे, अशा लोकांनी आता स्वतःहून सर्व सामाजिक आणि राजकीय चळवळींमधून निवृत्त झाले पाहिजे. हा प्रश्न थेट देशातील तरुण आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आहे. त्यामुळे आम्ही काय करायचं



आणि आमचं भविष्य कसं घडवायचं, हे सर्वस्वी आम्हाला म्हणजेच तरुणांना ठरवू द्या. ज्या म्हाता-या लोकांचं सर्व काही झालं आहे त्यांनी आता निवृत्त होउन आश्रमात विश्रांती घ्यावी. त्यांनी आाचच तरुणांच्या भवितव्याचे निर्णय घेउ नये. अशा शब्दांत अण्णा हजारेंबाबत अभिजीत दीपकेंनी भूमिका मांडली आहे. अभिजीत दीपकेंच्या या विधानामुळे राज्यात नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हं नाकारता येत नाहीत. मागील महिन्यात देशाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका प्रकरणात बेरोजगार तरुणांची तुलना उपरोधाने काक्रोच म्हणजेच झुरळाशी केली होती. सरन्यायाधीशांच्या याच विधानाचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी आणि त्यावर उपरोधात्मक टीका करण्यासाठी सोशल मीडियावर काक्रोच जनता पार्टी नावाचे एक डिजिटल हँडल सुरू करण्यात आलं होतं, या डिजिटल चळवळीला तरुणांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या चळवळीच्या माध्यमातून तरुणांच्या बेरोजगारीच्या मुद्द्याला थेट हात घातल्यामुळे अवघ्या चार दिवसांतच या डिजिटल हँडलचे फालोअर्स देशातील भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांपेक्षाही अधिक झाले. सोशल मीडियावरील या डिजिटल चळवळीला देशभरातील तरुणांचा अभूतपूर्व पाठिंबा मिळाल्याने, आता या चळवळीने प्रत्यक्ष राजकीय आणि सामाजिक आंदोलनाचे रूप घेतले आहे, मात्र अण्णा हजारेंबाबत प्रश्न विचारला असता म्हाता-या माणसांनी आश्रमात गेलं पाहिजे असं परखड मत अभिजीत दीपकेंनी व्यक्त केलं आहे.

## डॉ.राजेंद्र गवई, विलास गजघाटे यांची स्मारक समितीतून हकालपट्टी

**नागपूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीमधील (दीक्षाभूमी) वाद काही थांबताना दिसत नाही. दीक्षाभूमीच्या अध्यक्ष पदावरून भंते सुरेई ससाई यांना काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सचिव

**दीक्षाभूमीवरील वाद थांबेना**

डॉ.राजेंद्र गवई व सदस्य विलास गजघाटे यांनी दिली होती. त्यानंतर आता डॉ. राजेंद्र गवई, विलास गजघाटे यांचीच हकालपट्टी करण्यात आली आहे.

दीक्षाभूमीची बदनामी तसेच समितीविरुद्ध कृत्य केल्याप्रकरणी डॉ. राजेंद्र गवई आणि विलास गजघाटे या दोघांवरही समितीच्या संविधानानुसार कारवाई करत त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले असून त्यांना पदावरून कायमस्वरूपी काढण्यात आले, अशी माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष भंते नागार्जुन सुरेई ससाई यांनी प्रसिद्धी



पत्रकाद्वारे दिली आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच दीक्षाभूमीचे नाव जागतिक पातळीवर पोहोचले आहे. या पवित्र स्थळाचे पावित्र्य राखने प्रत्येकांचे कर्तव्यच नव्हे तर जबाबदारीसुद्धा आहे. समितीचेच सदस्य किंवा पदाधिकारी दीक्षाभूमीची बदनामी करणारे कृत्य करत असतील तर काय, असा प्रश्नही ससाई यांनी उपस्थित केला. अध्यक्ष येतील आणि जातील. अध्यक्षासंदर्भात वाद होतच राहील म्हणून काय दीक्षाभूमीची बदनामी करायची काय? अलिकडे स्मारक समितीच्या माध्यमातून जागतिक किर्तीच्या दीक्षाभूमीची प्रचंड मोठ्या प्रमाणात बदनामी करण्यात आली.यात डॉ. राजेंद्र गवई आणि विलास गजघाटे यांनी पुढाकार घेतल्याचे दिसून आले. या संपूर्ण बाबींचा विचार करत डॉ. राजेंद्र गवई यांना २९ जून तर विलास गजघाटे यांना ३० जून रोजी समितीचे अध्यक्ष या नात्याने कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. नोटीस मिळाल्याच्या तीन दिवसात स्पष्टीकरण अपेक्षित होते. मात्र, त्यांच्याकडून कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे समितीच्या संविधानातील कलम १२ (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या कार्यकारी अधिकाराचा वापर करून राजेंद्र गवई आणि विलास गजघाटे यांना समितीच्या नियामक मंडळाच्या सदस्यपदावरून पत्र जारी केलेल्या दिनांकापासून पदमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**अध्यक्षांचे अधिकार समितीवर बंधनकारक**- अध्यक्षांचे कार्यकारी अधिकार संपूर्ण संस्था/ समितीवर बंधनकारक आहेत. तसेच संविधानातील कलम १३ (१) नुसार पदावरून काढल्यानंतर संबंधित व्यक्तिचे नियामक मंडळाचे सदस्यत्व समाप्त होते. त्यामुळे राजेंद्र गवई आणि विलास गजघाटे यांना ५ जुलै पासून समितीच्या सदस्यत्वावरून काढण्यात आले आहे, असे ससाई यांनी दिलेल्या पत्रकातून स्पष्ट केले आहे.

## मुंबईसह राज्यातील पावसामुळे झालेल्या दुर्घटनांची चौकशी करून कारवाई करावी-विजय वडेट्टीवार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईसह महाराष्ट्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक दुर्दैवी घटना घडल्या असून निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे. मुंबईत मॅनहोलमध्ये पडून, झाड कोसळून तसेच मानखुर्द येथील इमारत कोसळून अनेक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. मुंबईत गेल्या दोन दिवसांत १२ जणांचा जीव गेला आहे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात भूमिका मांडली.विधानसभेचे कामकाज सुरू झाल्यावर विधिमंडळ नेते वडेट्टीवार म्हणाले, या सर्व घटनांमुळे प्रशासनाच्या तयारीवर आणि आपत्ती व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण, झाडांची छाटणी, मॅनहोलची सुरक्षितता, जलनिस्सारण व्यवस्था आणि आपत्कालीन नियोजन प्रभावीपणे झाले असते, तर अनेक नागरिकांचे प्राण वाचले असते. या दुर्घटनांमागील निष्काळजीपणाची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. मुंबई-पुणे मार्गावरील मिसिंग लिंक परिसरात दरड कोसळल्याने द्रुतगती मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. यापूर्वी याच प्रकल्पात खड्ड्यांचा प्रश्न समोर आला होता. आता दरड कोसळल्याने द्रुतगती मार्ग, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि घाट विभागातील रेल्वे वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. हजारो प्रवासी अडकून पडले असून नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे, अस वडेट्टीवार म्हणाले. राज्य सरकारने या संपूर्ण परिस्थितीबाबत तातडीने अधिकृत निवेदन करून नागरिकांना वस्तुस्थिती, उपाययोजना आणि पुढील नियोजनाची माहिती द्यावी. तसेच या सर्व दुर्घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित विभागातील अधिका-यांची व यंत्रणांची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी सभागृहात केली.

## टोल घेणार पूर्ण... पण व्यवस्था मात्र शून्य!-वडेट्टीवार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून नव्याने उभारण्यात आलेल्या मुंबई-पुणे मिसिंग लिंक बोगद्याच्या सुरूवातीला दरड कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली. यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून हजारो प्रवाशांना मोठा मन?स्ताप सहन करावा लागत आहे, अशी टीका विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे हा मिसिंग लिंकचे उद्घाटन होउन अवघे दोन महिने झाले आहेत. अस असताना दरड कोसळते, याचा अर्थ कामाच्या गुणवत्तेवर आणि नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कामाच्या दर्जाकडे दुर्लक्ष करून या प्रकल्पाच्या उद्घाटनाची घाई करण्यात आली का? हा प्रश्न



निर्माण होत आहे.मिसिंग लिंकवर खड्डे पडल्यावर टेस्टिंग सुरू आहे अस सरकारकडून स्पष्टीकरण देण्यात आले होते,आता दरड कोसळली तर कोणते टेस्टिंग सुरू आहे? एकीकडे प्रवाशांकडून नियमित टोल वसूल केला जातो, मात्र दुसरीकडे सुरक्षित प्रवासाची हमी देण्यात सरकार आणि संबंधित यंत्रणा अपयशी ठरत आहेत. टोल फक्त वसुलीसाठी आहे का? नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार?सरकारने या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून सभागृहात स्पष्ट करावे की, नुकत्याच उभारलेल्या प्रकल्पावर दरड कोसळण्यास नेमके कोण जबाबदार आहे? कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही जर पहिल्याच मोठ्या पावसात अशी परिस्थिती निर्माण होत असेल, तर संबंधितांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणारा हा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही.

## यवतमाळ : गुटखा तस्करांवर कारवाई

**यवतमाळ/प्रतिनिधी :** शहरातील नंदुरकर शाळेसमोरील पळसवाडी कॅम्प परिसरातील गुटखा तस्कराच्या घरावर रविवारी (ता. पाच) दुपारच्या सुमारास शहर डीबी पथकाने छापा टाकला. यावेळी गुटखा आणि वाहन असे मिळून ४० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे गुटखा तस्करांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. कुमार ओछाणी असे फरार आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात अलीम सलीम बेग (वय ३३, रा. मिटनापूर) याला पोलिसांनी अटक केली आहे. अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा पदभार तुकाराम मुंढे यांनी स्वीकारल्यानंतर कारवाईचा धडाका सुरू केला. सुरवातीला माझा खर्रा विक्रेत्या पानटपरीचालकांवर कारवाई केली. आता हॉटेल व्यावसायीकांसह गुटखा विक्रेत्यांवर कारवाईचा फार्स आवळण्यात आला आहे. अशाच पद्धतीने शहरातील नंदूरकर शाळेसमोरील पळसवाडी कॅम्प परिसरात कुमार ओछाणी नामक तस्करांकडे लाखो रुपयांचा गुटखा असल्याची गोपनीय माहिती शहर पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी ही कारवाई केली.गुटखा तस्कर कुमार याच्या घरावर छापा टाकला. तेव्हा घरात लाखो रुपयांचा गुटखा आढळून आला. दरम्यान, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिका-यांना बोलावून घटनेचा पंचनामा करण्यात आला असून, संपूर्ण गुटखा पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुटखा तस्कर कुमार ओछाणी याच्यावर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## भारत-इंडोनेशियामधील सांस्कृतिक संबंध अतिशय दृढ - पंतप्रधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या तीन देशांच्या दौ-यावर रवाना होत आहेत. दौ-यावर निघण्यापूर्वी त्यांनी सांगितले की, दौ-याच्या पहिल्या टप्प्यात ते इंडोनेशियाला भेट देतील. या भेटीमुळे भारत आणि इंडोनेशियामधील संबंध अधिक दृढ होतील, अशी त्यांनी आशा व्यक्त केली. भारत आणि इंडोनेशियामध्ये दीर्घकाळापासून घनिष्ठ सांस्कृतिक संबंध असल्याचे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'मी ६ ते ११ जुलैदरम्यान इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या तीन देशांच्या दौ-यावर जात आहे. इंडोनेशिया प्रजासत्ताकाचे राष्ट्राध्यक्ष प्राबोवो सुबियांतो यांच्या निमंत्रणावरून मी ६ ते ८ जुलैदरम्यान इंडोनेशियाला भेट देणार आहे. २०१८ मधील माझ्या पहिल्या इंडोनेशिया दौ-यादरम्यान भारत आणि इंडोनेशियाने आपल्या द्विपक्षीय संबंधांना 'सर्वसमावेशक सामरिक भागीदारी'च्या स्तरावर नेले होते. या स्तरावर संबंध पोहोचल्यानंतरचा हा माझा पहिलाच द्विपक्षीय दौरा असेल. राष्ट्राध्यक्ष प्राबोवो यांच्या भारताच्या राजकीय भेटीनंतर हा दौरा होत आहे. ते २६ जानेवारी २०२५ रोजी आपल्या प्रजासत्ताक दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे होते.'

ते पुढे म्हणाले, 'भारत आणि इंडोनेशियामध्ये घनिष्ठ सांस्कृतिक तसेच लोकांमधील परस्पर संबंध आहेत आणि माझी ही भेट आपल्या बहुआयामी भागीदारीच्या सर्व पैलूंना अधिक बळकटी



देईल. या दौ-यादरम्यान मी इंडोनेशियातील भारतीय समुदायातील नागरिकांशीही भेट घेईन आणि राष्ट्राध्यक्ष प्राबोवो यांच्यासोबत योग्याकार्ता येथील प्रम्बानन मंदिर संकुलाला भेट देईन.'


पंतप्रधान म्हणाले, 'इंडोनेशियानंतर ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्या निमंत्रणावरून मी मेलबर्नला जाणार आहे. माझी ही भेट आपल्या 'सर्वसमावेशक सामरिक भागीदारी'ला अधिक बळकटी देईल. पंतप्रधान अल्बानीज यांच्यासोबतच्या चर्चेदरम्यान संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार व गुंतवणूक, शिक्षण, नागरिकांची ये-जा (मोबिलिटी) तसेच लोकांमधील परस्पर संबंध या क्षेत्रांतील सहकार्य अधिक वृद्धिंगत करण्यावर भर दिला जाईल. मेलबर्नमध्ये मला भारतीय समुदायातील नागरिकांशी संवाद साधण्याची संधी मिळेल. मेलबर्नमध्ये वास्तव्यास असलेला भारतीय समुदाय आपल्या सामरिक भागीदारीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे.'

ते पुढे म्हणाले, 'मेलबर्ननंतर न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांच्या निमंत्रणावरून मी ऑकलंडला जाईन. मार्च २०२५ मध्ये पंतप्रधान लक्सन यांच्या भारत भेटीनंतर आपल्या द्विपक्षीय संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीला ही भेट आणखी गती देईल. पंतप्रधान लक्सन यांच्यासोबत मी आर्थिक, व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रातील संबंध अधिक मजबूत करण्याबाबत चर्चा करणार आहे. भारत आणि न्यूझीलंडने मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी करून द्विपक्षीय व्यापार आणि वाणिज्य संबंध अधिक बळकट करण्याचा संकल्प केला आहे. आपल्या द्विपक्षीय संबंधांमध्ये भारतीय समुदायाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. या दौ-यादरम्यान जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या भारतीय समुदायाच्या मोठ्या समूहाला संबोधित करण्यासाठी मी उत्सुक आहे.'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या निवेदनाच्या शेवटी म्हटले, 'पूर्व आणि दक्षिण हिंद महासागर परिसरातील इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि त्यानंतर न्यूझीलंडचा माझा दौरा भारताच्या 'एक्ट ईस्ट प?लिसी', 'महासागर व्हिजन' आणि मुक्त व खुल्या इंडो-पॅसिफिकबाबतच्या आपल्या दृष्टिकोनाला अधिक बळकटी देईल.'

## डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त पंतप्रधानांकडून अभिवादन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**भारतीय जनसंघाचे संस्थापक आणि राष्ट्रवादी विचारवंत डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांना आदरांजली वाहिली. पंतप्रधान मोदी यांनी डॉ. मुखर्जी यांचे विविध क्षेत्रांतील योगदान अधोरेखित करत ते एक उत्कृष्ट विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञ असल्याचे म्हटले. तर गृहमंत्री शाह यांनी, डॉ. मुखर्जी यांनी राष्ट्र प्रथम हा आदर्श आपल्या जीवनाचे ध्येय मानल्याचे सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिले, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे योगदान अनेक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण राहिले आहे. ते दूरदृष्टी असलेले विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी नवकल्पना आणि भविष्यातील गरजांनुसार शिक्षणव्यवस्था विकसित करण्यावर भर दिला. उद्योगमंत्री म्हणून त्यांनी देशाच्या औद्योगिक आत्मनिर्भरतेचा पाया रचला. त्याचबरोबर पारंपरिक उद्योग आणि त्यावर अवलंबून असलेल्या लोकांची उपजीविका टिकून राहील, याचीही त्यांनी काळजी घेतली.पंतप्रधानांनी पुढे म्हटले की, बंगालमधील दुष्काळाच्या काळात डॉ. मुखर्जी यांनी केलेल्या मानवतावादी कार्यातून संकटग्रस्तांविषयीची त्यांची संवेदनशीलता दिसून येते. भारताच्या एकता आणि अखंडतेप्रती त्यांची अढळ निष्ठा आजही प्रेरणादायी आहे.डॉ. मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या जीवनकार्यावर एक लेखही लिहिला. त्यामध्ये कुलगुरू, केंद्रीय मंत्री, राजकीय नेते अशा विविध भूमिकांतील त्यांच्या कार्याचा आढावा घेत भारताच्या एकात्मतेसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांवर विशेष भर देण्यात आला आहे. २०१९ मध्ये कलम ३७० आणि कलम ३५(अ) हटवण्याचा निर्णय हा त्यांच्या विचारांना दिलेली खरी आदरांजली असल्याचेही त्यांनी नमूद केले.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एक्सवर लिहिले, देशाची



एकता, अखंडता आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रखर पुरस्कर्ते तसेच भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन. त्यांनी राष्ट्र प्रथम हा आदर्श आपल्या जीवनाचे ध्येय मानले. बंगालच्या विभाजनाच्या काळातील त्यांचे दूरदर्शी नेतृत्व आणि जम्मू-काश्मीर भारताचा अविभाज्य भाग राहावा यासाठी त्यांनी दिलेला संघर्ष भारतीय इतिहासात कायम स्मरणात राहील. त्यांच्या तत्त्वनिष्ठ जीवनातून आणि देशाच्या अखंडतेसाठीच्या समर्पणातून युवकांना कायम प्रेरणा मिळत राहील.अमित शाह यांनी यासोबत एक व्हिडिओ संदेशही प्रसिद्ध केला. त्यात ते म्हणाले, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी हे या राष्ट्रातील महान नेत्यांपैकी एक होते. त्यांनी आयुष्यात कधीही प्रसिद्धीसाठी काम केले नाही. मात्र त्यांनी केलेल्या प्रत्येक कार्याचे दूरगामी आणि देशहिताचे परिणाम झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात देशाची फाळणी होत असताना पश्चिम बंगाल भारतात राहावा यासाठी त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष केला. त्यामुळेच आज पश्चिम बंगाल हा भारताचा अविभाज्य भाग आहे.शाह पुढे म्हणाले, आज डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. कलम ३७० रद्द झाले असून त्यांनी स्थापन केलेला भारतीय जनसंघ आज भारतीय जनता पक्षाच्या रूपाने देशभर कार्यरत आहे. गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत भाजपची ताकद वाढली आहे. गेल्या ६० वर्षांत लाखो कार्यकर्त्यांनी त्यांच्या विचारधारेवर चालत देशाच्या प्रगतीसाठी योगदान दिले आहे. त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाला मी मनःपूर्वक वंदन करतो.डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह कोलकाता येथे आयोजित अधिकृत कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाला केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत तसेच पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी उपस्थित राहणार आहेत.दरम्यान, केंद्रीय संस्कृती मंत्रालयाने २०२५ मध्ये डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त देशभर दोन वर्षे चालणा-या विशेष स्मरणोत्सवाची घोषणा केली होती.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# मैत्रीतून नवे करार

**जपानच्या पंतप्रधान सनाए तकाईची आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भारत दौऱ्यावर त्या आलेल्या असताना झालेली भेट आणि त्यांच्यात झालेले आर्थिक सुरक्षा विषयक करार हे उभय देशांतील मैत्री नव्या उंचीवर नेऊन ठेवणारी आहे. भारत आणि जपान यांच्यात सामायिक वाव आहे ती बौद्ध धर्माची आणि दोन्ही देशात ही एक बाब समान पातळीवर आणणारी आहे. त्याचेच नवे रूप या दोन्ही नेत्यांनी दाखवून दिले. जपानचे माजी पंतप्रधान शिंजो आबे यांच्या तकाईची या शिष्या.आणि आबे यांच्या मते मजबूत भारत हा जपानसाठी चांगला आहे आणि मजबूत जपान हा भारतासाठी मैत्रीस योग्य आहे. येथेच मुक्त आणि खुल्या पॅसिफिक कल्पनेने जन्म घेतला. याच कल्पनेच्या अनुसार, सुरक्षा आणि भारत आणि जपान यांनी धुरीणत्व स्वीकारणे या कल्पनेत उभय देशांनी संरक्षण आणि सुरक्षा क्षेत्रात संयुक्त सहकार्य करण्याचे ठरवले आहे. कारण दोन्ही देशांपुढील आव्हाने एकच आहेत. दोन्ही देशांची डावपेचात्मक भागीदारी आणि राजकीय आणि आर्थिक पक्की भागीदारीला भारतातही तितक्याच तीव्र भावनेने प्रतिसाद मिळतो आहे. भारत भेटीदरम्यान, सनाए आणि पंतप्रधान मोदी यांनी संरक्षण, उर्जा सुरक्षा आदी बाबींवर भर दिला तर सनाए तकाईची यांनी दोन्ही देशांसाठी रोड मॅप तयार करण्याचे सांगितले. परस्पर विश्वासावर त्यांनी भर दिला. पण या दोन्ही देशांना सध्या एकच भीती सतावते आहे ती म्हणजे चीनची. चीनने दक्षिण सागरात आपली दादागिरी आणि बुलिंग टॅक्टीजनी जगावर डोळे वटारून पहायला सुरूवात केली आहे, तर जपानलाही त्यांच्या या दादागिरीचा अनुभव येत आहे. त्यामुळे हे दोन्ही देश एकत्र येऊन चीनला टक्कर देतील असा आशावाद यातूनच उभारला आहे. फार मागे न जाताही असे म्हणता येईल की जपानने नेहमीच भारताला साथ दिली आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या काळातील असो किंवा भारताने स्वतंत्र जपानविरूद्ध केलेले सर्व भरपाईचे दावे फेटाळून लावले होते. त्याला सॅनफ्रान्सिस्को ट्रीटी म्हणतात. पण त्यानंतर १९९८ च्या अणुचाचण्या भारताने केल्या आणि त्यावेळी जपानने भारतावर निर्बंध लादले होते. पण तीनच वर्षात हे निर्बंध उठवण्यात आले. भारत आणि जपान हे दोन्ही देश ऐतिहासिक जवळचे संबंध जे प्राचीन काळापासून आहेत. त्यांना नव्या उंचीवर नेऊन ठेवण्याचे काम मोदी आणि सनाए यांनी केले आहे. जपानला कामगार वर्ग आकुंचित पावतो आहे आणि व्यापक सार्वजनिक कर्ज आहे जे सध्या २०० टक्क्यांच्यावर आहे. जीडीपीच्या आणि हरित उर्जेकडे संक्रमण करायचे प्रश्न सध्या सतावत आहेत. पण भारत आणि जपान यांच्यातील संबंध ग्लोबल भागीदारीतून विकसित झालेले आहेत. १९५२ मध्ये भारत आणि जपान यांच्यात राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. पण त्याहीपेक्षा महत्वपूर्ण संबंध तेव्हा होते जेव्हा जपानने भारताला १९९१ च्या आर्थिक उदारीकरण प्रक्रियेत बॅलन्स ऑफ पेमेंट्स स्थितीत भारतावर संकट कोसळले असताना जपाननेच भारताला मदत केली. २०२५-२६ मध्ये भारत आणि जपान यांच्यातील द्विपक्षीय व्यापार २७.४८ अब्ज डॉलर इतका होता, तर भारताची जपानला निर्यात केवळ ६.०४ अब्ज डॉलर इतकीच आहे. आता हे चित्र बदलण्याची शक्यता आहे. सनाए आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील चर्चेनंतर व्यापार वाढेल आणि आयात निर्यातही वाढेल अशी आशा करण्यास जागा आहे. पंतप्रधान मोदी आणि सनाए यांच्या चर्चेनंतर भारत-जपान बोलणी एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता, संरक्षण आणि द्विपक्षीय रोडमॅप यात आगेकूच करण्याची आशा आहे. भारत आणि जपान यांच्यात मजबूत संबंध प्रस्थापित झाले आहेत आणि येत्या दहा वर्षात ते आणखी मजबूत होतील अशी आशा दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली आहे. जपान सध्या भारतात दहा अब्जाची गुंतवणूक करतो. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे भारतातील मुंबई-अहमदाबाद ही बुलेट ट्रेन जपानच्या गुंतवणुकीनेच साकार होत आहे. त्यात काही प्रश्न आहेत ते स्थानिक पातळीवरचे. ते लवकरच संपतील आणि बुलेट ट्रेन लवकरच सेवेत रुजू होईल. पण जपानने केलेली मदत ही संस्मरणीय आहे. पंतप्रधान मोदी यांनी सांगितल्याप्रमाणे नॅव्हल रेडिओ अँटना (युनिफाईड कॉम्प्लेक्स रेडिओ अँटना) हा भारतीय नौदलासाठी हा सर्वात मोठा प्रकल्प असेल. पण दोन्ही देशांसाठी आव्हान आहे ते चीनचे. सेमीकंडक्टर क्षेत्रात आणि क्रिटिकल मिनरल्समध्ये उभय देशांनी सहकार्य व्यापक केले आहे पण चीनचे आव्हान कायम आहे. क्वाड आणि ओपन इंडो पॅसिफिकमध्ये दोन्ही देश स्तंभ आहेत, पण त्यांचे जागतिक पवित्रे अनेकदा एकमेकांच्या विपरित जातात. भारत डावपेचात्मक स्वायत्ततेला महत्व देतो आणि संरक्षण रशियाबरोबरच्या संबंधांना महत्व देतो,तर जपान अमेरिका प्रणित व्यवस्थेला प्राधान्य देतो. जी ७ निर्बंध कडकपणे अंमलात आणतो. भारत प्राधान्याने भारतीय उपसागर आणि दक्षिण आशियांना महत्व देतो. हेच क्षेत्र उभय देशांचे मतभेदांचे आहे. पण यावर मात करून आज सनाए आणि पंतप्रधान मोदी यांनी एकत्र येऊन चीनच्या दादागिरीला लढत देण्याचे ठरवले आहे. हे काही कमी महत्वाचे नाही. भारताचे ॲक्ट ईस्ट धोरण आहे आणि त्यानुसार सनाए तकाईची अगोदर गुवाहाटीला जाणार होत्या. पण त्यांचा दौरा अचानक रद्द झाला आणि त्या सरळ दिल्लीला आल्या. एक बाब निश्चित आहे ती म्हणजे सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार असताना, दहा अब्ज डॉलरची गुंतवणूक असताना आणि १२९ सामंजस्य करार केलेले असतानाही द्विपक्षीय व्यापार अजूनही जपानच्या दिशेने भरपूर झुकलेला आहे. भारत व्यापारी तुटीचा सामना करत आहे. जपानचे नॉन टेरिफ अडथळे, जपानचे धोरण यामुळे उभय देशांतील व्यापारात अडसर येत असतो.भारत आणि जपान यांच्यातील लष्करी सहकार्य वाढत असले तरीही तंत्रज्ञान हस्तांरण आणि संयुक्त उत्पादन हे थंडच आहेत. हायस्पीड ट्रेन जी जपानच्या सहकार्याने भारतात सुरू होणार आहे ती अन्य कारणाने सुरू होण्यास विलंब होत आहे. भारतीय आणि जपानी लोकांमध्ये मजबूत संबंध असले तरीही सर्वात मोठा अडसर हा त्यांच्यात सांस्कृतिक संबंध आणि पर्यटन या बाबतीत दोन्ही देश फार प्रगती करू शकलेले नाहीत. सनाए आणि पंतप्रधान मोदी यांच्या भेटीने या मुद्यांना वेग येईल अशी आशा आहे. शेवटी, सनाए आणि मोदी यांच्या भेटीने भारतासाठी एक चांगली वाव साध्य झाली आहे. ती म्हणजे १० अब्ज डॉलरचे नव्याने द्विपक्षीय करार भारताच्या पदरात पडले आणि बोलण्यांनी प्रमुख तांत्रिक भागीदारी तसेच परस्परांची वाढ आणि प्रादेशिक सप्लाय चेन्सचे अवलंबित्व कमी करण्याचे महत्व दोन्ही देशांनी ओळखले हे काही कमी महत्वाचे नाही. एकूण सनाए आणि मोदी यांची भेट ही एक लँडमार्क भेट होती.**

# सवलत इराणला, संधी भारताला

आखातातील युद्धविरामादरम्यान अमेरिकेने इराणवरील आर्थिक निर्बंध हटवले आहेत. यामुळे जागतिक तेल बाजारामध्ये आता इराणच्या तेलाचा खळखळाट सुरू झाला आहे. भारतासाठी ही नामी संधी आहे. कारण, इराणचे तेल हे गुणवत्तेच्या पातळीवर अधिक सरस आहे. तसेच भौगोलिक दृष्ट्या इराण हा भारतापासून कमी अंतरावर असल्याने वाहतूक खर्चही कमी येतो. इराणने आपल्या तेल निर्यातीच्या बदल्यात कोणत्याही चलनात (करन्सी) पैसे स्वीकारण्यास पूर्णपणे तयारी दर्शवली आहे. अमेरिकन डॉलरवरील आपली निर्भरता संपुष्टात आणणे आणि जागतिक व्यापारात विविध पर्यायांचा वापर करणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. त्यामुळे भारताने या संधीचा लाभ घ्यायला हवा.

मध्यपूर्वेतील संघर्षाचे ढग आता विरत चालले असून ६० दिवसांच्या शस्त्रसंधी कराराच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अमेरिका व इराण यांच्यातील सकारात्मकता दिलासादायक आहे. या करारादरम्यान अमेरिकेने भारताला इराणकडून पुन्हा तेल खरेदी करण्याची सवलत दिली आहे. आपल्या गरजेच्या ८५ टक्के तेलाची आयात करणाऱ्या भारतासाठी ही एक मोठी संधी आहे. इराण हा भारताचा पूर्वीपासूनचा तेलपुरवठादार देश राहिला आहे. भारत-इराण तेल व्यापारात नेहमीच आंतरराष्ट्रीय राजकारण आणि प्रामुख्याने अमेरिकेचे निर्बंध हा सर्वात मोठा अडथळा ठरला. २००५ नंतर जेव्हा इराणच्या अणू कार्यक्रमावरून पाश्चात्त्य देशांनी निर्बंध लादण्यास सुरुवात केली, तेव्हा भारताला इराणला तेलाचे पैसे देणे कठीण झाले. कारण, जागतिक बँकिंग यंत्रणा (स्विफ्ट प्रणाली) इराणसाठी बंद करण्यात आली होती. यावर मार्ग काढण्यासाठी २०१२ मध्ये भारत आणि इराणने 'रुपया-रियाल पेमेंट यंत्रणा' (रुपी-रियाल मेकॅनिझम) सुरू केली. या अंतर्गत भारत इराणकडून खरेदी केलेल्या तेलाचे ४५ टक्के पैसे भारतीय युको बँकेतील इराणच्या खात्यात भारतीय रुपयात जमा करायचा. इराण या रुपयांचा वापर भारतातून अन्नधान्य, औषधे आणि इतर वस्तू आयात करण्यासाठी करत असे.

२०१५ मध्ये बराक ओबामा यांच्या काळात इराण आणि जागतिक महासत्तांमध्ये ऐतिहासिक अणू करार झाला. यामुळे इराणवरील आंतरराष्ट्रीय निर्बंध उठवण्यात आले. या काळात भारत-इराण संबंधांना नवी गती मिळाली. भारताने केवळ तेल आयात वाढवली नाही, तर इराणमधील फारजाद-बी या गॅस क्षेत्रात गुंतवणुकीची तयारी दर्शवली आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या चाबहार बंदराच्या विकासासाठी करार केला. तथापि, २०१८ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अणू करारातून माघार घेतली आणि इराणवर पुन्हा एकदा कडक आर्थिक निर्बंध लादले. भारताला इराणकडून तेल खरेदी करण्यासाठी अमेरिकेने दिलेली तात्पुरती सवलत (सिग्निफिकेंट रिडक्शन एक्झम्प्शन) मे २०१९ मध्ये संपली. अमेरिकेचे कडक निर्बंध आणि जागतिक बँकिंग व्यवस्थेतून बाद होण्याची भीती यांमुळे मे २०१९ नंतर भारताला इराणकडून होणारी तेल आयात पूर्णपणे बंद करावी लागली. यामुळे भारताला आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी इराक, सौदी अरेबिया आणि त्यानंतर रशिया यांसारख्या



**रशियाकडून मिळणारे स्वस्त तेल, मध्य पूर्वेतील इतर पारंपरिक पुरवठादारांशी असलेले करार आणि अमेरिकेचे भविष्यातील परराष्ट्र धोरण या सर्व गोष्टींचा ताळमेळ घालत भारताला आपल्या ऊर्जा सुरक्षेचे धोरण ठरवावे लागणार आहे. ही तात्पुरती सवलत संपल्यानंतर म्हणजेच २१ ऑगस्टनंतर परिस्थिती काय वळण घेते, यावरच भारत-इराण ऊर्जा संबंधांचे भवितव्य अवलंबून असेल.**

पर्यायी देशांवर अवलंबून राहावे लागले.


२०१९ पूर्वी भारत आपल्या गरजेच्या तब्बल १० ते १२ टक्के कच्चे तेल इराणकडून आयात करत होता. सौदी अरेबिया आणि इराकनंतर इराण हा भारताचा तिसरा सर्वात मोठा तेल पुरवठादार देश बनला होता. भारताच्या अनेक सरकारी तेल शुद्धीकरण कंपन्यांची (रिफायनर्स) रचना ही प्रामुख्याने इराणच्या जड आणि सल्फरयुक्त कच्च्या तेलावर (इराणी हेवी क्रूड) प्रक्रिया करण्यासाठीच अनुकूल करण्यात आली होती. आकडेवारीच्या दृष्टीने पाहिल्यास २०१५-१६ या आर्थिक वर्षात भारताने इराणकडून १३.६ दशलक्ष टन तेलाची आयात केली होती. त्यानंतर २०१६-१७ मध्ये भारत-इराण तेल व्यापार सर्वोच्च पातळीवर पोहोचला, जेव्हा भारताने तब्बल २७.१ दशलक्ष टन तेलाची आयात केली. इराण भारताला तेलाच्या किमतीत सवलत, वाहतूक खर्चात सूट आणि ६० दिवसांची उधारी (क्रेडिट पिरियड) यांसारख्या सवलती देत असल्याने हा व्यापार दोन्ही देशांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत होता.

होर्मुझमधील संघर्ष निवळण्याच्या प्रक्रियेदरम्यान ट्रम्प यांनी दिलेल्या सवलतींनंतर इराणची अधिकृत तेल कंपनी नॅशनल इराणी ऑईल कंपनी भारतासह आंतरराष्ट्रीय तेल कंपन्यांशी पुन्हा व्यावसायिक संबंध जोडण्यासाठी प्रयत्न करत आहे. इराणने आपल्या तेल निर्यातीच्या बदल्यात कोणत्याही चलनात (करन्सी) पैसे स्वीकारण्यास पूर्णपणे तयारी दर्शवली आहे. अमेरिकन डॉलरवरील आपली निर्भरता संपुष्टात आणणे आणि जागतिक व्यापारात विविध पर्यायांचा वापर करणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. आखाती देशांमधून भारताचे भौगोलिक अंतर खूपच कमी आहे. त्यामुळे इराणकडून तेल आयात केल्यास वाहतुकीचा वेळ आणि वाहतूक खर्च (फ्रेट कॉस्ट) मोठ्या प्रमाणावर कमी होतो. इराण भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांना पेमेंट करण्यासाठी ६० ते ९० दिवसांची मोठी सवलत देण्यास तयार आहे. याउलट, इतर जागतिक तेल पुरवठादार देश साधारणपणे केवळ ३० दिवसांची मुदत देतात. यामुळे भारतीय कंपन्यांच्या खेळत्या भांडवलावरील ताण कमी होतो. भारताने यापूर्वीच रशियाकडून तेल आयात करताना डॉलरव्यतिरिक्त रुपया, यूएई दिरहाम,चिनी युआन आणि रशियन रुबल यांसारख्या बहुचलनी व्यवहारांचा (मल्टिकरन्सी मॉडेल) यशस्वी वापर केला आहे. इराणनेही कोणत्याही चलनात व्यवहार करण्याची तयारी दर्शवल्यामुळे भारत आपल्या सोयीनुसार 'रुपी-रियाल' किंवा इतर कोणत्याही चलनाद्वारे व्यापार करू शकतो. यामुळे भारताला आंतरराष्ट्रीय बाजारातून डॉलर खरेदी करण्याची गरज भासणार नाही. रुपयावरील दबाव कमी होण्यास याचा फायदा होऊ शकतो.

मात्र, ही सुवर्णसंधी असूनही भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्या (रिफायनर्स) या बाबतीत अत्यंत सावध भूमिका घेत आहेत आणि तूर्तास मोठे पाऊल उचलणे टाळत आहेत. यामागचे कारण म्हणजे, पेमेंटमधील कायदेशीर अडचणी. अमेरिकेने डॉलरमध्ये व्यवहार करण्याची तात्पुरती परवानगी दिली असली, तरी इराणवर असणारे इतर आर्थिक निर्बंध पूर्णपणे उठलेले नाहीत. यामुळे भारतीय बँकांना इराणशी व्यवहार करताना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुसरे मोठे कारण म्हणजे, कंपन्यांच्या अंतर्गत नियमावली (कॉम्प्लायन्स). अमेरिकेने तात्पुरती सवलत दिली असली, तरी भविष्यात पुन्हा निर्बंध लागू झाल्यास भारतीय कंपन्यांना अमेरिकेच्या दुय्यम निर्बंधांचा (सेकंडरी सँक्शन्स) फटका बसू शकतो. त्यामुळे जोपर्यंत पेमेंट यंत्रणा, आवश्यक कागदपत्रे आणि सेटलमेंटच्या प्रक्रियेवर कायदेशीर स्पष्टता येत नाही, तोपर्यंत भारतीय कंपन्यांचे कॉम्प्लायन्स विभाग या खरेदीला हिरवा कंदील दाखवण्यास तयार नाहीत. आंतरराष्ट्रीय घडामोडींमधील अनिश्चितता पाहता भारताला अत्यंत विचारपूर्वक पावले टाकावी लागतील. रशियाकडून मिळणारे स्वस्त तेल, मध्य पूर्वेतील इतर पारंपरिक पुरवठादारांशी असलेले करार आणि अमेरिकेचे भविष्यातील परराष्ट्र धोरण या सर्व गोष्टींचा ताळमेळ घालत भारताला आपल्या ऊर्जा सुरक्षेचे धोरण ठरवावे लागणार आहे. ही तात्पुरती सवलत संपल्यानंतर म्हणजेच २१ ऑगस्टनंतर परिस्थिती काय वळण घेते, यावरच भारत-इराण ऊर्जा संबंधांचे भवितव्य अवलंबून असेल.

**अभिजित कुलकर्णी**

# इथेनॉल महत्त्वाचा मुद्दा



**इथेनॉल प्रकरणी जो काही विरोध होतो आहे, तो मुख्यत्वे गाड्यांची इंजिन खराब होतात-महागड्या दरात इथेनॉलमिश्रित इंधन घ्यावे लागते. बहुतांश गाड्या जुन्या असूनही गडकरींकडून इथेनॉलसक्ती केली जाते अशाप्रकारचा आहे. हे मुद्दे अर्थातच वैध आहेत, परंतु या चर्चेत इथेनॉल धोरणाबाबत एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित राहतो आहे.**

तो मुद्दा असा की भारतासाठी इथेनॉल निर्मिती हीच एक गंभीर समस्या आहे, हा फक्त गाड्या खराब होण्यापुरता विषय नाही. सध्या गडकरी यांनी देशावर लादलेल्या इथेनॉल उत्पादन प्रक्रियेत ऊस किंवा तृणधान्य पिके इथेनॉलसाठी वापरली जात आहेत. म्हणजे शब्दशः आपण अन्नाचे इंधन करत आहोत! सोप्या भाषेत चुलीत लाकडे जाळून भाकरी करण्याऐवजी गडकरींना खुश करण्यासाठी भाकरीच चुलीत जाळत आहोत.

आता गडकरी या इथेनॉल धोरणाचे मार्केटिंग करताना इतके सर्रास खोटे बोलतात की इथेनॉल उत्पादन आपल्या अन्नसुरक्षेसाठी आणि जलसंसाधनासाठी किती धोक्याचा विषय आहे याबाबत फारशी जाणीव लोकांना अद्यापपर्यंत झालेली नाही. गडकरी आणि त्यांची आयटी सेल/भक्त नेहमी अमेरिका/ब्राझीलचे उदाहरण देतात. एकदा या देशांचे क्षेत्रफळ आणि त्यांची लोकसंख्या यांची भारताशी तुलना करून बघा! या देशांकडे असलेले पाण्याचे स्रोत आणि भारताकडे असलेले पाण्याचे स्रोत यांचीही तुलना करून बघा, म्हणजे हा मुद्दा तुमच्या नीट लक्षात येईल.

प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था त्या देशाच्या भूगोलावर बेतलेली असते. आजरोजी भारत हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश आहे. अमेरिका आणि ब्राझील यांच्या लोकसंख्येची बेरीज केली तरी आपण त्यांच्या तिप्पट भरू! मात्र दुसरीकडे आपल्याकडे दोन्ही देशांपेक्षा कमी भूभाग आहे. भारताकडे उपलब्ध असलेली दरडोई गोड्या पाण्याची उपलब्धता हीसुद्धा अमेरिका आणि ब्राझीलपेक्षा बरेच कमी आहे. म्हणजे दरडोई जमीन आणि दरडोई पाणी अशा दोन्ही बाबतीत भारताची अवस्था अमेरिका आणि ब्राझीलपेक्षा बरीच नाजूक आहे.

अशावेळी आपण फक्त गडकरींना इथेनॉलचा छंद जडला आहे म्हणून आपल्या अन्नसुरक्षेशी आणि जलसंसाधनाशी हा खेळ नक्की काय म्हणून करत आहोत? प्रचंड पाणी वापरून अन्नाचे इंधन करणे ही गोष्ट तुम्हाला भारतामध्ये एक दीर्घकालीन धोरण म्हणून सस्टेनेबल वाटते का? आपल्याकडे अमेरिका आणि ब्राझीलच्या तुलनेत जमीन आणि पाणी दोन्ही कमी उपलब्ध आहेत. अशावेळी जास्त प्रमाणात पाणी वापरून तयार होणाऱ्या ऊस आणि धान्यपिकांना आपण असे इथेनॉलस्वरूपात इंधन म्हणून जाळत आहोत हे आपल्याला धोरण म्हणून परवडणारे आहे का?

विशेष म्हणजे ही चिंता भारत सरकारच्या आर्थिक सर्वेक्षणातही मांडली गेली आहे! २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी प्रसिद्ध झालेली इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडियामध्ये इथेनॉलमुळे होत असलेला क्रॉप पॅटर्नमधील लक्षणीय बदल आणि त्यामुळे अन्नसुरक्षेला निर्माण होत असलेला धोका अधोरेखित करण्यात आला होता. तरीही ही गोष्ट गांभीर्याने विचारत घ्यावी असे सरकारला का वाटत नाही? मोदींसाठी कदाचित गडकरींचा इथेनॉलहट्ट सरकारी आर्थिक सर्वेक्षणातील मुद्द्यांपेक्षाही जास्त महत्त्वाचा असावा!!

इथेनॉलच्या प्रत्येक लिटरमागे सध्याच्या धोरणानुसार काही हजार लिटर पाण्याचा वापर होतो. कारण सध्याच्या धोरणानुसार ऊस आणि भात यांसारख्या जास्त पाणी पिणाऱ्या पिकांचा वापर गडकरी त्यांचे लाडके इथेनॉल बनवण्यासाठी करत आहेत! त्याचबरोबर यामध्ये एरवी अन्न निर्माण करण्यासाठी वापरली जाणारी लाखो हेक्टर सुपीक जमीन आपण गाड्यांमध्ये जाळायचे इंधन तयार करण्यासाठी वापरत आहोत. ही गोष्ट अमेरिका ब्राझीलला परवडत असेल, मात्र ती भारताला परवडणारी नाही...

कोणत्याही देशाचे धोरण हे त्या देशाच्या उपलब्ध संसाधनांच्या हिशोबात बनवायचे असते! आपल्याकडे मुबलक सूर्यप्रकाश उपलब्ध आहे, त्यामुळे आपण स्वस्त वीजनिर्मिती मोठ्या प्रमाणात करू शकतो. अशावेळी एक दीर्घकालीन इलेक्ट्रिक गाड्यांचे धोरण राबवायचे सोडून, मोदी सरकार सध्या हे असे अन्न जाळून इथेनॉल का बनवत आहे? हट्टच पुरवायचा असेल तर नितीन गडकरींच्या मुलांना वाटल्यास सरकारी पैशाने इलेक्ट्रिक गाड्यांचे कारखाने काढून द्यावेत, पण देशाच्या अन्नसुरक्षेशी आणि जलसंसाधनाशी चालवलेला हा धोक्याचा खेळ मोदींनी थांबवला पाहिजे! इथेनॉलबाबत अमेरिका आणि ब्राझीलची कॉपी करणे भारत परवडणार नाही!!

**-मकरंद देसाई**

# धरलं तर चावणारा आणि सोडलं तर ज्याला फरक पडत नाही असा चीन !

मागच्या आठवड्यात भारताने वीज निर्मिती/पारेषण क्षेत्रात चार चिनी कंपन्यांच्या गुंतवणुकी साठी नियमात काही बदल केले. चिनी कंपन्या कमी भांडवली खर्चात हे काम करू शकतात म्हणून असेल किंवा काही राजनैतिक हेतू असेल.या क्षेत्रात काम करणाऱ्या भारतात देखील कंपन्या आहेत. या बातमीमुळे नर्व्हस झालेल्या या काही भारतीय कंपन्यांचे शेयर्स ५ ते ९ टक्क्यांनी घसरले.

२००० सालात गलवान टेकड्यांवर झालेल्या रक्तरंजित संघर्षानंतर भारताने चीनमधील येणाऱ्या गुंतवणुकीवर/आयातीवर बरेच निर्बंध घातले होते. त्यासाठी प्रेस नोट ३ नावाने ओळखले जाणारे परिपत्रक जारी केले.पंतप्रधान मोदींनी २०२५ शांघाय कोपरेशनच्या बैठकीच्या निमित्ताने चीनला भेट दिली, क्षी जिनपिंग यांच्याशी भेट झाली आणि संदर्भ वेगाने बदलू लागले आहेत. जे गरजेचे होते.

संदर्भ बदलण्याला अधिक वेग आला ज्यावेळी दीड वर्षांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व देशांविरुद्ध, विशेषतः चीन आणि भारताविरुद्ध आयात युद्ध छेडले.प्रेस नोट तीन मध्ये बदल करण्यात आला. चिनी प्रोफेशनल्सना व्हिसा दिला जाऊ लागला. दोन्ही देशातील डायरेक्ट हवाई वाहतूक सुरु झाली. केंद्र सरकारच्या मुख्य आर्थिक सल्लागारांनी तर चिनी गुंतवणुकीला भारताने प्रोत्साहन देण्याचे महत्व अधोरेखित केले.

चीन बरोबरच्या व्यापाराचे आकडे वाढत आहेत. २०२५ मध्ये १५० बिलियन्स डॉलर्स.पण त्यातील ८०-८५ टक्के वाटा चीनमधून येणाऱ्या आयातीचा आणि फक्त १५-२० टक्के वाटा भारतातून चीनला होणाऱ्या निर्यातीचा आहे. या विषम वाट्यात नजिकच्या काळात नाट्यमय बदल संभवत नाही.सर्वात प्रमुख कारण म्हणजे,जे खरेतर जगातील सर्वच देशांना लागू होते. चीनच्या उत्पादन खर्च/ विक्रीच्या किमतीबरोबर भारतातील फारच कमी उत्पादक क्षेत्रे स्पर्धा करू शकतात. उदा पोलाद.पोलाद वापरणाऱ्या भारतीय कंपन्यांना चीनमधून आयात होणारे, आयात कर भरून देखील स्वस्त असणारे पोलाद हवे असते. राष्ट्रप्रेम म्हणून या कंपन्या भारतात बनणारे महाग पोलाद विकत घेऊ इच्छित नाहीत.

पोलादा शिवाय वीज उपकरणे, विविध प्रकारचे धातू, रसायने, औषध निर्मितीमध्ये लागणारे घटक अशा अनेक वस्तुमालाच्या चीनच्या किमती landed price आंतरराष्ट्रीय बाजारातील त्याच्या इतर स्पर्धक देशांपेक्षा खूप कमी आहेत. त्यामुळे भारतात आणि इतर देशात वरील वस्तूमालाचे देशांतर्गत उत्पादकांची घुसमट होते. स्थूल अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून बघितले तरी हे कळेल की स्वस्त चिनी आयातीमुळे महागाई आटोक्यात ठेवण्यास त्या त्या देशातील केंद्रीय बँकांना आणि शासनाला मदतच होत असते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनसमोर नमते घेतल्याचे एक महत्वाचे कारण हे आहे कमी भांडवली खर्च, कमी महागाई वगैरे झाली ताबतोबीची उद्दिष्टे. पण याचे दीर्घकालीन परिणाम निगेटिव्ह असू शकतात.भारतात चिनी कंपन्यांनी गुंतवणूक करणे; भारतात बराच स्वस्त माल आयात होणे या सगळ्यातुनभारताच्या अर्थव्यस्वस्थेचे चीन वरील अवलंबित्व एका एका इंचाने वाढत आहे.लहान मुलांची खेळणी, आणि अनेक वस्तू, ज्या प्रायः लघु उद्योगात तयार होतात; त्याच्या चीन मधून येणाऱ्या आयातीमुळे एमएसएमई क्षेत्रात खूप धंदे हातघाईला आले. भविष्यात अजून येऊ शकतात. याच क्षेत्रात कोट्यवधी रोजगार/स्वयंरोजगार तयार करण्याची क्षमता आहे.

चीन बरोबरचे आर्थिक व्यापारी संबंध दुधारी नाही अनेक धार असलेली तलवार आहे. कारण चीन काही इतर कोणताही निर्यातदार देश नाही. तो आपला शेजारीच नाही, तर तणावग्रस्त सीमा असणारा, काही युद्धे झालेला शेजारी आहे. त्यामुळे चीन बरोबरच्या आर्थिक व्यापारी संबंधांना परराष्ट्र धोरण, आपली लष्करी सुरक्षितता, जगाचे वेगाने बदलणारे भू-राजनैतिक संबंध असे आयाम आहेत. भविष्यात राहणार आहेत. या शतकात स्वतःच्या राजकीय महत्वाकांक्षा पुऱ्या करण्यामध्ये भारत, विशेषतः तो अमेरिकेच्या कॅम्पमध्ये गेला तर, अडथळा असणार आहे हे चीनला पुरेपूर माहित आहे. स्वतंत्र, सामर्थ्यावर आधारित परराष्ट्रनीती ही भारताची गरज होती, आहे आणि राहील.

आजच्या युगात तर शत्रू राष्ट्रावर डायरेक्ट हल्ला करण्याची गरज नाही. आर्थिक/व्यापारी अस्त्र अधिक प्रभावी ठरतात. आपणच ती चीनच्या भात्यात घालत आहोत का,असा प्रश्न विचारावयस हवा.चीनची सामर्थ्य स्थळे, जी त्याने गेल्या ४० वर्षांत कमवली आहेत, कोणती आहेत? कुशल मनुष्यबळ. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान मध्ये दरवर्षी भारताच्या २० पट जास्त सार्वजनिक गुंतवणूक, सार्वजनिक क्षेत्राचे आणि सार्वजनिक बँकांचे प्रभुत्व,मुख्य म्हणजे सामाजिक सौहार्द इत्यादी.

चीन बरोबरच्या व्यापारातील तूट कमी कशी करायची आहे हा प्रश्न भारतीय कॉर्पोरेटच्या किंवा अर्थतज्ञाच्या बसकी बात नाही आहे.त्याचा संबंध 'इट इज नॉट बिझनेस ऑफ द गव्हर्नमेंट टू बी इन बिझनेस' सारख्या तद्दन पुस्तकी भूमिका बदलण्याशी आहे. कर संकलन वाढवून शिक्षण,आरोग्य, संशोधन क्षेत्रातील गुंतवणुकी वाढवण्याशी, सार्वजनिक क्षेत्र बँकिंग प्रभुत्वस्थानी असण्याशी आहे आणि सामाजिक सौहार्द सुधारण्याशी आहे.

**-संजीव चांदोरकर**

# कुरापती शिक्षकामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात..!

## बंदोबस्त करण्याची मागणी अन्यथा दिंडाळा जिल्हा परिषद शाळेला कुलूप ठोकणार, पत्रकार परिषदेत ईशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ६ :** राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त असलेल्या दिंडाळा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असताना शाळेत परिपाठाच्या वेळेवर हजर न होणे, मुख्याध्यापकांकडे सुट्टीचा अर्ज न देता शाळेत गैरहजर राहणे व असभ्य वर्तणूकीबाबत पालकांकडून आलेल्या तक्रारी वरून विशाखा समितीने केलेल्या कसून चौकशीनुसार शाळेची प्रतिमा मलीन करण्याचा ठपका ठेऊन निलंबित केलेल्या दोन शिक्षकांनी संगनमताने शाळेच्या मुख्याध्यापकांना त्रस्त करण्यासाठी वारंवार माहिती अधिकार पत्रक तसेच तक्रारींचा सपाटा लावल्याने हकनाक उपद्रव देणाऱ्या वरिष्ठांनी बंदोबस्त करावा, अशी मागणी दिंडाळा येथील व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल राठोड यांनी दिंडाळा येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली पत्रकार परिषदेला सरपंच सुनिता कैलास राठोड, उपसरपंच गजानन जाधव शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल राठोड, माजी सरपंच भाऊराव जाधव गुलाब राठोड गोपीचंद जाधव यांच्यासह पालक मंडळी उपस्थित होते.

सन २०२३ मध्ये सहशिक्षक म्हणून रुजू झालेले कुमार देवानंद यांनी शाळेवर रुजू झाल्यापासून परिपाठालाही वेळेवर हजर राहत नव्हते, शाळेतील सहकाऱ्यांसोबत द्वेषभावनेची वर्तणूक, मुख्याध्यापकांना कमी लेखून त्यांचे कडे सुट्टीचा अर्जन देता गैरहजर राहणे, असभ्य वर्तणुकीबाबत पालकांकडून करण्यात आलेली तक्रार, या बाबींचा सारासार विचार करून, शाळेची प्रतिमा मलीन करण्याचा ठपका ठेवून जिल्हा परिषदेच्या विशाखा समितीने निलंबित केलेले कुमारदेवानंद काळे व गजानन गोपेवाड यांच्यावर निलंबनाची कार्यवाही झालेली असतानाही दिंडाळा शाळेत उपद्रव देण्यासाठी सहशिक्षक कुमारदेवानंद काळे व गजानन गोपेवाड यांनी संगनमत करून शाळेच्या मुख्याध्यापकांविरुद्ध कुमार देवानंदने दिनांक २ जानेवारी २३ जानेवारी, २ फेब्रुवारी रोजी तक्रार व माहितीचा अधिकार प्रपत्रनुसार ७ जानेवारी, २७ जानेवारी ६ फेब्रुवारी अशा तर गजानन गोपेवाडने २ फेब्रुवारी रोजी तक्रार व ६ फेब्रुवारी रोजी खोडसाळपणे माहिती अधिकार प्रपत्र टाकून मुख्याध्यापकांना कोणतेही कारण नसताना उपद्रव देणे सुरू ठेवले. गोपेवाड हे मद्यपान करून शाळेत येत होते. माझी पोहच खुप मोठी आहे असे सांगून मुख्याध्यापकावर प्रचंड दडपण आणत होते. शाळेतील विद्यार्थ्यांसोबतही असभ्य वर्तन करीत असल्याच्या तक्रारी होत्या. त्यामुळेच जिल्हा परिषदेच्या विशाखा समितीने कसून चौकशी करून दोघांनाही निलंबित केले त्याचा राग मुख्याध्यापकावर त्या शिक्षकांच्या कुरापती थांबेना काढून निलंबित झाल्यानंतर या शाळेचा संबंध नसताना मुख्याध्यापका विरुद्ध खोट्यानाट्या तक्रारी करून त्यांचे वर दडपण आणण्याचे काम दोन्ही शिक्षक करीत असल्याने शाळेची शैक्षणिक गुणवत्ता ढासळत चालली आहे.

# कत्तलीच्या उंबरठ्या वरून ३४ गोवंशीय बैलांची सुटका..!

## यवतमाळ एलसीबीचा धडाकेबाज छापा, ४३.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ६ :** गोवंशीय जनावरांची आंतरराज्यीय तस्करी रोखत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत कत्तली साठी तेलंगणात नेण्यात येणारे ३४ गोवंशीय बैलांची सुटका केली. या कारवाईत पाच वाहने, जनावरे असा एकूण ४३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणातील काही आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंदे व गोवंशीय तस्करी विरोधात सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार रविवारी पहाटे मुकुटबन पोलीस ठाण्याच्या पथकासह राजूर गोटा येथे प्रवासी निवाऱ्या जवळ सापळा रचण्यात आला. पिक अप वाहनांतून जनावरे उतरवत असताना पोलिसांनी आरोपींना रंगेहात पकडले. कारवाईत चंद्रपूर जिल्ह्यातील पाच आरोपींसह राजूर गोटा येथील एका स्थानिक आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून सुमारे २६ लाख ५० हजार रुपये किमतीची पाच वाहने आणि १६ लाख ६५ हजार रुपये किमतीचे ३४ गोवंशीय बैल जप्त करण्यात आले. जनावरांना अत्यंत क्रूर पद्धतीने दाटीवाटीने, चारा-पाण्याविना बांधून ठेवण्यात आल्याचे पंचनाम्यात निष्पन्न झाले.चौकशीत स्थानिक आरोपीने तेलंगणातील व्यापाऱ्यांच्या सांगण्यावरून मजुरीच्या मोबदल्यात पैनगंगा नदीच्या पात्रातून जनावरे कत्तलीसाठी तेलंगणात पोहोचविण्याचे काम सुरू असल्याची माहिती दिली. या प्रकरणातील फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. जप्त करण्यात आलेल्या सर्व ३४ गोवंशीय बैलांची पशुवैद्यकीय तपासणी करून त्यांना सुरक्षिततेसाठी गुरु गणेश गोरक्षण रासा, ता. वणी येथे हलविण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे आणि मुकुटबन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व मुकुटबन पोलीस पथकाने संयुक्तपणे यशस्वीरीत्या पार पाडली.

# आरंभी येथील निकृष्ट सिमेंट नाला बांधकामाची चौकशी करा

## जी. प. सिंचन विभाग अधिकाऱ्याचे कंत्राकदारासोबत साठेलोटे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. ६ :** दिग्रस तालुक्यातील आरंभी गावा शेजारी लागून सिमेंट नाला बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याचा गंभीर आरोप गावातील काही नागरिक करीत आहे. ठेकेदाराने अंदाजपत्रकापेक्षा कमी सिमेंट व माती मिश्रीत रेती व डस्ट वापरल्याने पावसाळ्यात हा बांध वाहून जाण्याची भीती असल्याने लाखोंचा निधी वाया जाणार आहे.

तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाईची डबक्या आवाजात मागणी होत आहे. जिल्हा परिषद सिंचन विभाग अंतर्गत आरंभी गावाला लागून पाण्याचे टाकी जवळ नाला खोलीकरण सिमेंट नाला बांधकाम लाखो रुपये खर्च करून करण्यात आले. मात्र, बांधकाम झाल्यानंतर १५ दिवसातच सिमेंट कॉंक्रीटला भेगा पडल्या आहेत. लोखंडी सळईऐवजी पातळ तार वापरली आहे. सिमेंट: वाळू: खडीचे प्रमाण १:४:८ ऐवजी १:८:१० इतके कमी ठेवले आहे.

जोरदार पाऊस पडला की संपूर्ण बांध पाण्यात वाहून जाणार अशी येथील बांधकामची परिस्थिती आहे.खोलीकरण सुद्धा थातूर मातुर करून शासकीय तिजोरी लुटण्याचा प्रकार सुरु आहे. ग्रामस्थांचा आरोप आहे की, कामाची गुणवत्ता तपासणीस जागेवर न येता कागदावरच मंजुरी दिली. ठेकेदार हा अधिकाऱ्यांना हाताशी धरून निकृष्ट काम केले असल्याचा आरोप आहे. वरिष्ठ अभियत्याकडून स्वतंत्र अभियंत्यांकडून बांधाची कोअर टेस्ट व लॅब तपासणी करावी.तोपर्यंत बिल अदा करू नये. आतापर्यंत दिलेली रक्कम वसूल करावी. दोषी आढळल्यास निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे व संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी.असा सर्वसामान्य शेतकरी वर्गामधून सुर निघत आहे.

# VJ-A महिला प्रवर्गात कोमल चव्हाण महाराष्ट्रात प्रथम..!

## गोर बंजारा समाजाकडून भव्य गौरव, विद्यार्थिनींसाठी ठरली प्रेरणास्थान


✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ६ :** बंजारा समाजाचा अभिमान ठरलेल्या कोमल तोळाराम चव्हाण यांनी वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक पदाच्या भरती प्रक्रियेत VJ-A (महिला) प्रवर्गातून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल गोर बंजारा उत्सव समितीच्या वतीने यवतमाळ येथील विश्रामगृहात भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

समाजातील गुणवंतांचा गौरव करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी आणि समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. उपस्थितांनी कोमल चव्हाण यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाचे विशेष अभिनंदन केले. यावेळी वक्त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातून पुढे येत स्पर्धा परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक मिळविणे ही मोठी कामगिरी असून, कोमल चव्हाण यांचे यश बंजारा समाजातील विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी आहे. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे त्यांनी उदाहरण घालून दिले आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. महेश चव्हाण होते. यावेळी गोर बंजारा उत्सव समितीचे अध्यक्ष बाळा आडे यांच्यासह रोहित राठोड, पृथ्वीराज चव्हाण, सीए निरंजन राठोड, स्वप्नील राठोड, पुष्पा देवराव राठोड, देवराव राठोड, भारत राठोड, रत्नकला राठोड, दिलीप चव्हाण, हितेश राठोड, गजू राठोड, अमोल चव्हाण आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

## थोडक्यात



### ग्राम विकास आराखडा तयार करण्याचे प्रशिक्षण

**यवतमाळ :** केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेअंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील सन २०१८-१९ ते २०२५-२६ मध्ये ४१ गावांची निवड करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने आज दि.६ जुलै रोजी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मंगला मुन यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम पंचायत मधील सरपंच/सचिव यांची सभा संपन्न झाली.

या सभेमध्ये उपस्थित सरंपच/सचिव व कॅम्पुटर ऑपरेटर यांना प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजनेचे प्रपत्र १ ते ८ व ग्राम विकास आराखडा तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच प्रत्येक गावांचा युजर आयडी व पासवर्ड तयार करण्यात आले असून, त्याची माहिती संबंधित ग्राम विकास अधिकारी यांना अवगत करण्यात आली.

तसेच या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रपत्र १,२,३ अ व ३ ब आणि प्रपत्र ४ भरण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणास सहाय्यक आयुक्त मंगला मून, प्रशांत विष्णू साठे व निवड झालेल्या ४१ गावांचे सरपंच/सचिव व संगणक ऑपरेटर उपस्थित होते.



### संत नामदेव महाराजांची ६७६ वी पुण्यतिथी भक्तिभावात साजरी

**वणी :** येथील संत नामदेव महाराज चौक,जत्रा रोड येथे शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ रोजी श्री संत नामदेव महाराज यांची ६७६ वी पुण्यतिथी भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.या प्रसंगी शिंपी समाज संस्थेच्या वतीने संत नामदेव महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात शिंपी समाज संस्थेचे अध्यक्ष अनिल अक्केवार यांनी संत नामदेव महाराजांच्या सामाजिक, आध्यात्मिक व भक्तीपर कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष संतोष कर्णेवार,पूजा रामगीरवार, दीपक दीकुंडवार,शिवसेना नेते मोरेश्वर उज्वलकर, कुंतलेश्वर तुरविले सर,उमेश वराडे,विजय गटलेवार,नरेश रामगीरवार, विनोद गटलेवार,कैलाश कर्णेवार,बहादे,स्वप्रिल कर्णेवार,अनिकेत अक्केवार, प्रज्योत रामगीरवार,प्रियंका कर्णेवार,वैशाली नमूलवार, वेदिका अक्केवार तसेच शिंपी समाजातील अनेक समाजबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमोलकचंद महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा भावस्पर्शी स्नेहमिलाप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ६ :** अमोलकचंद महाविद्यालयाच्या कला शाखेतील सन २००२ ते २००७ या कालावधीतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा रविवारी (५ जुलै) उत्साह, आपुलकी आणि भावनिक वातावरणात पार पडला. तब्बल दोन दशकांनंतर एकाच छताखाली एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत मैत्रीचे बंध अधिक दृढ केले.

महाविद्यालय परिसरात झालेल्या पहिल्या सत्राची सुरुवात प्रार्थना व राष्ट्रगीताने झाली. दिवंगत शिक्षक व सहाध्यायांना श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर सर्वांनी जुन्या वर्गखोल्यांमध्ये बसून आठवणींना उजाळा दिला. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. काशिनाथ लाहोरे यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी आपला परिचय करून देत विविध क्षेत्रातील वाटचाल मांडली. विद्यार्थ्यांचे यश पाहून डॉ. लाहोरे यांनी त्यांचे कौतुक करत जीवनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. यानंतर हॉटेल एकविरा येथे स्नेहभोजन, खेळ, गाणी, नृत्य, कविता आणि गझल सादरीकरणाने कार्यक्रमाला रंगत आली. रमेश बुरबुरे यांनी सादर केलेल्या वडिलांवरील गझलेने उपस्थितांना भावूक केले. कार्यक्रमाचे संचालन ललित मुंडे, प्रास्ताविक नदीम पटेल आणि आभार मिथुन जाधव यांनी मानले. या स्नेहमिलनाच्या यशस्वी आयोजनासाठी मिथुन जाधव, नदीम पटेल, विक्रांत खडतरे, दिनेश बेले, ललित मुंडे, विवेक कांबळे, दिनेश खडसे आणि रमेश बुरबुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एक पेड माँ के नाम उपक्रमातून जपले जाणार आईची माया..!



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ६ :** वाढते तापमान, घटते हरित क्षेत्र आणि पर्यावरणीय असंतुलनाच्या पार्श्वभूमीवर पुसदमधील माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनने सुरू केलेला 'एक पेड माँ के नाम' उपक्रम समाजासमोर सकारात्मक आदर्श ठरत आहे. केवळ वृक्षारोपण नव्हे, तर आईच्या नावाने लावलेल्या झाडाचे दत्तक संगोपन करण्याचा संदेश देत या मोहिमेची सुरुवात ५ जुलै रोजी करण्यात आली.

कर्मयोगी संत गाडगे बाबा स्मृती स्थळ, जाधव बाग (निंबी) येथे सुप्रसिद्ध सप्तखंजिरी वादक पंकजपाल महाराज यांच्या हस्ते वडाचे रोप लावून अभियानाचा शुभारंभ झाला. "झाड लावण्यापेक्षा ते जगवणे अधिक महत्त्वाचे" असल्याची भूमिका यावेळी संस्थेने मांडली. पुढे माणुसकीची भिंत मदत केंद्रात अन्नदानाची तारीख उपलब्ध नसल्यास अन्नदात्यांना आईच्या नावाने झाड लावण्याचे आवाहन करण्यात येणार असल्याचेही जाहीर करण्यात आले. कार्यक्रमाला दत्तात्रय जाधव, पंजाब ढेकळे, संतोष गावंडे, मधुकर चव्हाण, गणेश सावंत, दिगंबर देशमुख, प्रमोद ठाकूर, प्रा. वसंत खाडे, जयसिंग राठोड यांच्यासह मिशन ग्रीन, वसुंधरा बहुउद्देशीय संस्था, माणुसकीची भिंतचे सदस्य आणि परिसरातील वृक्षप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाचा संकल्प करत या उपक्रमाचे उत्स्फूर्त स्वागत केले.

# 'वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश'



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. ६ :** आदिवासी टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष तथा निसर्गपूजक बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बंडूभाऊ तोडसाम यांच्या वाढदिवसानिमित्त घाटंजी शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढत्या वृक्षतोडीमुळे बिघडणारे पर्यावरणीय संतुलन लक्षात घेऊन वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

विश्रामगृह येथे झालेल्या कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष विजय बैस, माजी उपसभापती रमेश धुर्वे, नंदकिशोर डंभारे, बाळूभाऊ जाधव, विनय जाधव, रत्नाकर गावंडे, अरविंद जाधव, नरेश पेंदोर, श्रीराम मेश्राम, अमोल गेडाम यांच्यासह शेकडो समाजबांधव, मित्रपरिवार व शुभचिंतक उपस्थित होते.

# पश्चिम विदर्भ जनजागर अभियान बैठक संपन्न..

## पुसदमधून मिशन २०२७ जनजागृतीला वेग!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ६ :** "स्वतंत्र विदर्भ राज्य आता नाही तर कधीच नाही" हा निर्धार व्यक्त करत विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या विदर्भ राज्य मिशन २०२७ अंतर्गत पश्चिम विदर्भ जनजागर अभियानाची तालुकास्तरीय बैठक सोमवारी पुसद येथील हॉटेल अनुप्रभा येथे उत्साहात पार पडली. यावेळी विदर्भाच्या विकासातील अनुशेष, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, सिंचनाचा प्रश्न, कुपोषण आणि नैसर्गिक संपत्तीच्या कथित उपेक्षेचा मुद्दा उपस्थित करत स्वतंत्र विदर्भाची मागणी अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीच्या प्रारंभी समितीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा स्वर्गीय रंजनाताई मामर्डे तसेच शिक्षक नेते प्रा. बी. टी. देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर २५ जुलै रोजी सिंदखेड राजा येथे होणाऱ्या "विदर्भ निर्माण जनसंकल्प मेळाव्या"च्या तयारीचा आढावा घेण्यात आला. तसेच ९ ऑगस्ट रोजी नागपूर येथे दीक्षाभूमी ते संविधान चौक दरम्यान प्रस्तावित लाँग मार्चचे नियोजन करण्यात आले. प्रीपेड वीज मीटर सक्तीविरोधात आणि शेतकरी हिताच्या प्रश्नांवर व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. समितीचे अध्यक्ष ॲड. वामनराव चटप यांनी विदर्भाच्या हक्कासाठी जनतेने मोठ्या संख्येने चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले. बैठकीला मुकेश मासुरकर, प्रा. डॉ. पी. आर. राजपूत, डॉ. पद्माताई राजपूत, कृष्णराव भोंगाडे, अविनाश पोळकट, मनीष जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी व विदर्भवादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा ९ जुलैला

**यवतमाळ, दि. ६ :** रोटरी क्लब ऑफ यवतमाळच्या सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ गुरुवार, ९ जुलै रोजी सायंकाळी ७:३० वाजता येथील हॉटेल जसराज पॅलेसमध्ये होणार आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी भावी गव्हर्नर निलेश परतानी राहणार असून, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ राजेश साबळे मार्गदर्शन करणार आहेत. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी ॲड. डॉ. प्रवीण हर्षे, सचिव (प्रकल्प) म्हणून डॉ. आनंद भंडारी, तर सचिव (प्रशासन) म्हणून इंजि. लक्ष्मीकांत लोळगे पदभार स्वीकारतील. यावेळी माजी अध्यक्ष डॉ. आशिष गवरशेट्टीवार व त्यांची टीम नव्या पदाधिकाऱ्यांकडे कार्यभार सुपूर्द करेल. या सोहळ्याचे प्रकल्प अधिकारी म्हणून अभिजीत दाभाडकर आणि शांतनू मुळे जबाबदारी सांभाळत आहेत. कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रोटरी क्लबने केले आहे.

### २० जुलै पूर्वी ई.एफ. फॉर्म भरा..!

**मतदार यादीत नाव कायम ठेवण्यासाठी जन जागृतीला वेग**
**विशेष मतदार यादी पुनरीक्षण (SIR) अभियानांतर्गत सर्व पात्र मतदारांना आवाहन**

**महागाव :** महागाव शहर व परिसरात सुरू असलेल्या विशेष मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) अभियानाला वेग आला असून, सर्व पात्र मतदारांनी दि. २० जुलै २०२६ पूर्वी ई.एफ. (Enumeration Form) भरून संबंधित बीएलओ (BLO) यांच्याकडे जमा करावे, असे आवाहन नगरसेवक तथा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शैलेश कोपरकर यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी सांगितले की, मतदार यादी अद्ययावत व अचूक ठेवण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. या अभियानांतर्गत बीएलओ मार्फत ई.एफ. फॉर्म घरपोच उपलब्ध करून दिले जात असून, नागरिकांनी कोणताही विलंब न करता तो भरून सादर करावा. फॉर्म भरताना पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो (दोन्ही कान स्पष्ट दिसतील असा), आधार क्रमांक, आई-वडिलांच्या मतदार ओळखपत्राचे (EPIC) क्रमांक तसेच मोबाईल क्रमांक तयार ठेवावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. २० जुलै २०२६ ही अंतिम मुदत असल्याने सर्व पात्र मतदारांनी वेळेत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून लोकशाही बळकट करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन शैलेश कोपरकर यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी नागरिकांनी आपल्या परिसरातील बीएलओ अथवा संबंधित निवडणूक कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# अमरावती विभागातील जीएसटी महसूल संकलनात लक्षणीय वाढ

## व्यापारी, उद्योजक, कर सल्लागार व राज्यकर कर्मचाऱ्यांचे योगदान कौतुकास्पद, राज्यकर सहाय्यक आयुक्त पोखरकर यांचे प्रतिपादन

**अमरावती/का.प्र**

अमरावती विभागातील व्यापारी, उद्योजक, कर सल्लागार (टॅक्स प्रॅक्टिशनर्स) तसेच राज्यकर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विभागाच्या जीएसटी महसूल संकलनात उल्लेखनीय वाढ झाली आहे. जीएसटी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात राज्यकर सहाय्यक आयुक्त (प्रशासन) संजय पोखरकर यांनी सर्व संबंधितांचे अभिनंदन करून त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात पोखरकर म्हणाले की, अमरावती विभागात औद्योगिक विकासासाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. नवीन उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत सुशिक्षित युवकांसाठी रोजगारनिर्मितीवर विशेष भर दिला.औद्योगिकीकरणामुळे अमरावती विभागाच्या विकासाला निश्चितच नवी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी या वेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाची सुरुवात जीएसटी कार्यालयाच्या परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली.त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी संविधान अभ्यासक प्रा. अंबादास मोहिते,अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री तसेच कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) विदर्भ प्रांताचे अध्यक्ष विनोद कलंत्री, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातूरकर, सीए अमरावती शाखेचे अध्यक्ष सीए हर्ष शर्मा, राज्यकर उपआयुक्त प्रवीण निनावे आणि राज्यकर सहाय्यक आयुक्त (अपील) सुनील लहाने व्यासपीठावर उपस्थित होते.



प्रास्ताविकात राज्यकर उपआयुक्त प्रवीण निनावे यांनी सांगितले की, १ जुलै २०१७ रोजी जीएसटी लागू झाल्यापासून अमरावती विभागाच्या महसूल संकलनात सातत्याने वाढ होत आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये सुमारे ८०० कोटी रुपये असलेला महसूल आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये वाढून जवळपास १,६०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. ही कामगिरी विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि करदाते यांच्या समन्वित प्रयत्नांचे फलित असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मुख्य वक्ते प्रा. अंबादास मोहिते यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील सायमन आयोगापासून भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीपर्यंतचा इतिहास सविस्तर उलगडला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कुशल नेतृत्वाखाली राज्यघटना कशी तयार झाली, तिची वैशिष्ट्ये आणि कालानुरूप झालेल्या घटनादुरुस्त्यांची माहिती त्यांनी दिली.

तसेच संविधान सभेचे सदस्य आणि शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या योगदानाचाही त्यांनी विशेष उल्लेख केला.

अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष तसेच कॅट विदर्भ प्रांताचे अध्यक्ष विनोद कलंत्री यांनी सांगितले की,१९६० मधील सेल्स टॅक्सपासून व्हॅट आणि त्यानंतरच्या जीएसटीपर्यंत कर व्यवस्थेत मोठे परिवर्तन झाले आहे. सुरुवातीला क्लिष्ट वाटणारी जीएसटी व्यवस्था कालांतराने अधिक सुलभ झाली आहे. या परिवर्तनात लोकप्रतिनिधी, जीएसटी विभाग, कर सल्लागार आणि व्यापारी संघटनांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सहाय्यक आयुक्त संजय पोखरकर यांनी नियमितपणे आयोजित केलेल्या सेवा कक्ष बैठकींमुळे व्यापाऱ्यांच्या अडचणींचे त्वरित निराकरण होत असल्याबद्दल त्यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातूरकर यांनी सांगितले की, अत्यधिक करदरांमुळे करचुकवेगिरीला प्रोत्साहन मिळते.

कररचना संतुलित आणि व्यावहारिक असल्यास शासनाचा महसूल वाढेल तसेच ग्राहकांवरील आर्थिक भारही कमी होईल.राज्यकर सहाय्यक आयुक्त (अपील) सुनील लहाने यांनी राज्यकर विभाग हा सेवाभिमुख विभाग असून व्यापारी व करदात्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विभाग कायम कटिबद्ध असल्याचे सांगितले. जीएसटी लागू झाल्यानंतर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नव्या करप्रणालीचे प्रभावीपणे आत्मसात करून तिच्या यशस्वी अंमलबजावणीत मोलाची भूमिका बजावल्याचे त्यांनी नमूद केले.

अमरावती टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सीए डी. डी. खंडेलवाल यांनी जीएसटी रिटर्न भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी विविध सूचना मांडल्या.

मानवी त्रुटींमुळे होणाऱ्या किरकोळ चुका लक्षात घेऊन करदात्यांना अनावश्यक त्रास दिला जाऊ नये,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन राज्यकर निरीक्षक योगेश अढाऊ यांनी केले. उपस्थित मान्यवर आणि सहभागींचे आभारही त्यांनी मानले.यावेळी व्हीटीपीएचे माजी अध्यक्ष जगदीश शर्मा, सीए संजय लखोटिया, ॲड.आर. एस. लड्डा, सीए आदित्य खंडेलवाल, कॅट महिला विंगच्या अध्यक्षा डॉ.कुंजन वेद, सीए श्रेणिक बोथरा, सीए मेहता यांच्यासह राज्यकर विभागातील अधिकारी, कर्मचारी, व्यापारी व कर सल्लागार उपस्थित होते.

# विद्यापीठातील मुला-मुलींच्या वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मुला-मुलींच्या वसतीगृहामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेण्यास इच्छूक विद्यार्थी-विद्यार्थीनींना ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन विद्यापीठाकडून करण्या त आले आहे. प्रवेश अर्ज व माहितीपुस्तिका विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in - Hostel या संकेतस्थळावर उपलब्ध असून, प्रवेश अर्ज१६ जुलै रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावयाचे आहे.ऑनलाईन प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जाची यादी १८ जुलै रोजी विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in - Hostel या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. ज्या विद्यार्थी - विद्यार्थीनींचे यादीमध्ये नांव नसेल, अशा विद्यार्थी-विद्यार्थीनींनी २१ जुलै रोजी वसतीगृह कार्यालयात संपर्क साधावा. अर्जांची छाननी करुन प्रवेशित विद्यार्थी-विद्यार्थीनांची विभाग, गुणवत्ता व वर्गवारा निहाय यादी २८ जुलै रोजी मुला-मुलींच्या वसतीगृह कार्यालयामध्ये सूचना फलकासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता न केल्यास किंवा ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जामध्ये चुकीची माहिती आढळल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. प्रवेशासाठी https://forms .gle/5VusguQPqrVX67BL7 या लिंकवर, तर विद्यार्थ्यांनी https://forms .gle/uazc8ZNy3L4HnhLZ7 या लिंकवर जावून विहित मुदतीत व वेळेत अर्ज सादर करून प्रवेश अर्ज सादर करावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. असनारे यांनी केले आहे. संशोधक/ पीएच.डी. कोर्सवर्क विद्यार्थी यांनी१ ऑगस्ट ला दुपारी २.वाजतापर्यंत प्रवेश देण्यात येईल. अधिक माहितीसाठी मुलांचे वसतीगृह वार्डन डॉ. राठोड यांचेशी, तर मुलींचे वसतीगृह वार्डन डॉ. बारब्दे यांचेशी संपर्क साधावा.

# दस्तूर नगर-जेवड नगर मार्गावरील धोकादायक नाला ठरतोय अपघाताचे केंद्र

## शालेय व्हॅन थोडक्यात बचावली

**अमरावती/का.प्र.**

दस्तूर नगर, जेवड नगर, आशा कॉलनी आणि पोस्टमन कॉलनीला जोडणाऱ्या मार्गावरील नाल्यावर अद्याप कायमस्वरूपी पूल उभारण्यात आलेला नसल्याने नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने केवळ मुरूम टाकून तात्पुरती व्यवस्था केल्यामुळे या ठिकाणी वारंवार अपघात घडत असून शनिवारी एकाच दिवशी दोन गंभीर घटना घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी या मार्गावरून विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी शालेय व्हॅन थोडक्यात मोठ्या अपघातातून बचावली. रस्ता आणि नाल्यावरील तात्पुरत्या व्यवस्थेमुळे वाहन चालकाला मोठी कसरत करावी लागली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेनंतरही प्रशासनाने तातडीची कोणतीही उपाययोजना केल्याचे दिसून आले नाही. दरम्यान, याच दिवशी रात्री मुगाने भरलेली एक इंट्रा मालवाहू गाडी नाल्याजवळील धोकादायक मार्गावरून जात असताना पलटी झाली. या अपघातात वाहनाचे आणि मालाचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने चालकासह इतर कोणालाही गंभीर दुखापत झाली नसल्याची माहिती आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या नाल्यावर कायमस्वरूपी पूल उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. मात्र, संबंधित यंत्रणांकडून केवळ तात्पुरत्या उपाययोजना करण्यात आल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर बनत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

# जिल्हा कारागृहात तीन बंदींना काठीने मारहाण

## न्यायाधीन बंदीविरुध्द फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा मध्यवर्ती कारागृहात एका न्यायाधीन बंदीने तीन कैद्यांना काठीने मारहाण केली. ही घटना शनिवार, ४ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणात कारागृह प्रशासनाच्या तक्रारीवरून आरोपी न्यायाधीन बंदीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारागृह अधीक्षक किर्ती चिंतामणी यांच्यातर्फे पोलीस हवालदार गणेश भोपळे यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात या घटनेची तक्रार दाखल केली आहे. न्यायाधीन बंदी जमिल खा बिसमील्ला खा, रा. तळेगाव मोहना, चांदूर बाजार, अमरावती, याने आपल्या बॅरेकमध्ये एक लाकडी ओली काठी आणून ठेवली होती.

दरम्यान त्याने बॅरेकमधील इतर तीन कैद्यांना काठीने मारहाण केली. त्यामुळे ते जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच कारागृहातील पोलीसानी तत्काळ बॅरेककडे धाव घेतली. त्यानंतर जखमी कैद्यांवर उपचार करण्यात आले. या घटनेची तक्रार फ्रेजरपूरा पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी न्यायाधीन बंदी जमिल खा बिसमील्ला खा याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला.

# ८० कंत्राटी शिक्षकांना तात्पुरती पदस्थापना

**अमरावती-** धारणी व चिखलदरा या मेळघाट पेसा क्षेत्रातील प्राथमिक शाळांसाठी कंत्राटी शिक्षकांच्या तात्पुरत्या पदस्थापनेची समुपदेशन प्रक्रिया शनिवारी (ता. ४) जिल्हापरिषदेच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात पार पडली.पेसा क्षेत्रातील एकूण ८० कंत्राटी शिक्षकांना यावेळी समुपदेशनाद्वारे तात्पुरती पदस्थापना देण्यात आली. शिक्षण विभागाच्यावतीने आयोजित ही प्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वर्षीच्या मागील पदस्थापनेच्या ठिकाणी पद रिक्त नसणे अथवा संबंधित शाळांमध्ये शिक्षकांची आवश्यकता नसल्याने अशा कंत्राटी शिक्षकांसाठी ही समुपदेशन प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. या प्रक्रियेत एकूण ८१ कंत्राटी शिक्षकांपैकी ८० उमेदवार उपस्थित होते.

सदर समुपदेशन व भरती प्रक्रियेत अधीक्षक नरेंद्र गायकवाड, सहायक प्रशासन अधिकारी संजय मुंद्रे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने, विजय कविटकर, हेमंतकुमार यावले, वरिष्ठ सहायक शरद चहाकार, कनिष्ठ सहायक अनिकेत हुरडे, विश्वनाथ तपासे, परिचर युसूफ शहा, पंचायतसमिती धारणी येथील विस्तार अधिकारी सुनील खडे, चिखलदरा पंचायतसमिती येथील जावेद शेख बिरामतसेच केंद्रप्रमुख प्रशांत उंडे आदींचा सहभाग होता.

# १ ऑगस्टला तुकाराम मुंडे यांचे मार्गदर्शन




**अमरावती/का.प्र.**

कस्तुरबा खादी महिला समिती, अमरावती यांच्या वतीने तसेच पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप यांच्या सहकार्याने 'संवाद तरुणाईशी' या विशेष प्रेरणादायी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमात भा.प्र.से., आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र शासन तुकाराम मुंडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. कार्यक्रम शनिवार १ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता स्वामी विवेकानंद सभागृह, पी. आर. पोटे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, पोटे इस्टेट, कठोरा रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

कस्तुरबा खादी महिला समिती, अमरावती ही उद्योग विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'अमरावती सोलर चरखा क्लस्टर' या पथदर्शी प्रकल्पाची कार्यान्वयन संस्था असून ग्रामीण व आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध सामाजिक उपक्रम संस्था राबवित आहे. याच अनुषंगाने कस्तुरबा खादी महिला समिती तसेच पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती यांच्या वतीने महाविद्यालयीन युवक, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी तसेच चांगला माणूस, जबाबदार नागरिक आणि सकारात्मक व्यक्तिमत्त्व घडवू इच्छिणाऱ्या सर्वांसाठी प्रेरणा, योग्य दिशा व मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने कस्तुरबा खादी महिला समिती, अमरावती यांच्या वतीने तसेच पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती यांच्या सहकार्याने 'संवाद तरुणाईशी' या विशेष प्रेरणादायी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमामध्ये अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांमधून सुमारे ८,००० ते १०,००० महाविद्यालयीन विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, पालक, शिक्षक, विविध क्षेत्रातील व्यावसायिक तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

तुकाराम मुंडे हे त्यांच्या कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी देशभर परिचित आहेत. त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील अनुभव, स्पर्धा परीक्षांची तयारी, नेतृत्वगुण, प्रामाणिकपणा, सार्वजनिक सेवेमधील मूल्ये, वेळेचे व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास आणि राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका याविषयी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या अनुभवातून युवकांना सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि यशस्वी जीवनासाठी आवश्यक प्रेरणा मिळेल. या कार्यक्रमाचे मीडिया पार्टनर म्हणून अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे विशेष सहकार्य मिळत आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी पूर्णपणे निःशुल्क आहे आणि विशेषतः महाविद्यालयीन तरुण, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी, पालक व शिक्षकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. यासाठी जिल्हा मराठी पत्रकार संघ तसेच कस्तुरबा खादी महिला समितीच्या यशोदा नगर बायपास मार्गावरील एमआयडी सी परिसरात असलेल्या कार्यालयातही या कार्यक्रमाचे फॉर्म उपलब्ध असतील. अधिक माहितीसाठी ८१४९४७७ ९०५ या क्रमांकावर संपर्क करू शकता. पत्रकार परिषदेत गौरव येवतकर, रोहन भामकर, क्षिप्रा मानकर, धनश्री येवतकर आदी प्रमुख उपस्थित होते.

# संक्षिप्त

## 'सिनेमा सिनेमा खेळताना' एकदिवसीय निःशुल्क कार्यशाळा

**अमरावती-चित्रपट,** नाटक, वेब सिरीज आणि न्यूज चॅनेल यांसारख्या माध्यमांमध्ये रोजगार, व्यवसाय आणि नोकरीच्या संधी शोधणाऱ्या कलाकारांसह विद्यार्थ्यांना चित्रपट उद्योगाची तांत्रिक ओळख आणि निर्मितीचे पायाभूत प्रशिक्षण देण्यासाठी, अमरावती स्पंदन परिवार बहुउद्देशीय संस्थेद्वारे संचालित बिइंग आर्टिस्ट अकॅडमी ऑफ फिल्म अँड थिएटर आर्टस्, अमरावती येथे 'सिनेमा सिनेमा खेळताना' या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन रविवारी, १२ जुलै २०२६ रोजी करण्यात आले आहे. या निःशुल्क कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी १० जुलै २०२६ पर्यंत नाव नोंदणी करण्याचे आवाहन अकॅडमीच्या संचालिका स्नेहा वासनिक यांनी केले आहे.चित्रपट तसेच माध्यमाच्या रीतसर शिक्षणानंतर शासकीय संस्था, अशासकीय संस्था, सरकारी कार्यालये, खाजगी संस्थामधे करियर च्या संधी, तसेच फेलोशीप्स, स्कॉलरशिप, अर्थ सहाय्य मिळविण्याचे विविध मार्ग आणि चित्रपट उद्द्योजकता जनगृती करण्याच्या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून चित्रपट निर्मितीची प्रक्रीया, निर्माता, कथा लेखन, दिग्दर्शन, अभिनय, छायाचित्रण, प्रकाश योजना, संकलन, ध्वनी, कला दिग्दर्शन, रंगभूषा, वेशभूषा, जाहिरात व प्रसिद्धी, सेन्सॉर सर्टीफिकेशन, वितरण व्यवस्था,आर्थिक गुंतवणुक व मोबदला या सर्व विभागांची कार्य पद्धती तसेच सिनेमा किंवा चित्रपट म्हणजे काय? कला-व्यवसाय-उद्योग-करियर म्हणून या क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा असावा? यावर चर्चात्मक मार्ग दर्शन करण्यात येणार आहे. तसेच निवळक लघुपटांचे प्रदर्शन आणि निरिक्षनात्मक चर्चा प्रश्नोत्तरातुन करण्यात येणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष पंकज धंदर यांनी सांगितले.या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी १० जुलै २०२६ पर्यंत ९३२४३६३६०० किंवा ९५१८३८११३२ या क्रमांकावर संपर्क साधून नाव नोंदणी करावी, असे आवाहन अकॅडमी तर्फे करण्यात येत आहे.



## 'जंगल सफारी' पुस्तकाचे प्रकाशन

**अमरावती-** बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती,मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय मराठी विभाग तसेच बोली संपदा यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य पावसाळी काव्यमहोत्सवाचे आयोजन नुकतेच मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती येथे करण्यात आले होते. याप्रसंगी ॲड डॉ. नीता प्रफुल्ल कचवे लिखित 'जंगल सफारी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा अतिशय उत्साहात संपन्न झाला. या काव्यमहोत्सव तसेच पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष डॉ. स्मिता देशमुख,उदघाटक कांचन उल्हे, स्वागताध्यक्ष डॉ. मंदा नांदुरकरआदि मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती.सोबतच एकूण ५० कविंचा सहभाग असणारा भव्य पावसाळी काव्यमहोत्सव देखील पार पडला.प्रास्ताविक ॲड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे, संचालन प्रसिद्ध कवी अजय अडीकने तर आभार आरती नागपुरे यांनी मानले. प्रकाशन सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून गणेश भाकरे उपस्थिती होते.या संग्रहावर जेष्ठ साहित्यिक तथा रेखाचित्रकार उद्धव शहाणे यांनी अगदी यथोचित असे भाष्य केले.यानिमित्याने प्रत्येकाला रोपटे भेट देऊन वृक्ष लागवडीचा संकल्प जोपासण्यात आला.



## संत गुलाबराव महाराज जयंती

**चांदुरबाजार-** विदर्भातील महान संत, प्रज्ञाचक्षु, ज्ञानेशकन्या, धर्मसमन्वयमहर्षी, मधुराद्वैताचार्य श्री संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकरखेडा(पूर्णा) येथे अभिवादन व जयंती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य शरद नवल, प्रा. गजानन सांगोले,प्रा.आर. आर. देशमुख, प्रा. केशवराव वाटाणे तसेच विद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी महाराजांच्या महान कार्यास, अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि समाजप्रबोधनातील त्यांच्या अमूल्य योगदानास विनम्र अभिवादन करून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला.




## स्वामी विवेकानंद मंडळ युवा मोर्चा तर्फे वृक्षारोपण

**अमरावती-** स्वामी विवेकानंद मंडळ युवा मोर्चा तर्फे वृक्षारोपण कार्यक्रम प्रभाग क्रमांक ११ मध्ये बोधिसत्व सभा मंडप प्रांगणात आयोजित करण्यात आला. हा उपक्रम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ह्यांच्या प्रेरणेतून युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष ऋषिकेश संगीता गजाननराव ठेलकर आणि त्यांचे समस्त पदाधिकाऱ्यांनी हाती घेतला व स्वामी विवेकानंद मंडळ मधे जेवढे काही बाग बगीचे आहेत तिथे प्रत्येक रविवारी ३-५ झाडे लावण्याचे नियोजन आहे.यावेळी मंडळ अध्यक्ष संतोषजी कावरे, डॉ. कंवलजीत पांडे, सुमित खवले, नील बोजे,भूषण पटके,अनुप बचे, चेतन आठवले इद्यादी उपस्थिती होते.



## विद्यार्थ्यांनी साजरा केला कृषीदिन

**तिवसा-** वसंतराव नाईक यांची जयंती व कृषी दिन गुरुदेवनगर ग्रामपंचायन येथे साजरा कण्यात आला .डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा येथील रावे(ग्रामीण कृषी कार्यानुमव) अंतर्गत कार्यरत कृषी विद्यार्थांनी साजरा करणयात आला. या कार्यक्रमात ग्रामपंचायत (सरपंच) वैशाली .वि . धुमोने ( उपसरपंच ), अनिल काळमेघ, मिलींद काळमेघ,'उमा . प्र . अंबलकर व ग्राम पंचायत कर्मचारी तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते . कार्यक्रमात , मृदा परीक्षण, संतुलित खतव्यवस्थापन, पाणी बचत, सेंद्रिय शेती चे महत्व सांगितले. रावे प्रक्षिषणार्थी कार्तिक बोके, ओम ठाकरे,ऋषीकेश जायभाये, अभय धडम, अर्पित माकोडे, हर्षल मानकर, विशाल खवसे रावे च्या विद्यार्थानी कृषी दिनाचे महतव सांगीतले व शेतकऱ्यांशी संवाद साधला. गुरुदेव विद्यामंदिर गुरुकुंज आश्रम येथील क्रीडांगनात वृक्षारोपण केले. त्यावेळी उपस्थित मुख्याध्यापक मनोज कडू , अजीत कट्टे व विद्यार्थी उपस्थित होते.उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अरून डाहाके ,रावे ईन्चार्ज सावन राठी , कृषी विस्तार विषयक शिक्षक मनोज लुगे यांचे मार्गदर्शन लाभले .



# रामचरितमानस सुवर्ण ग्रंथ

**हे** आहेत एस. लक्ष्मी नारायणन, देशाचे माजी गृहसचिव. त्यांनी राम मंदिराला तब्बल दीड क्विंटल वजनाचे सोन्याची पाने असलेले रामचरितमानस दान केले होते. ते गायब झाल्याचा त्यांचा दावा आहे.

सुब्रमण्यम लक्ष्मी नारायणन हे त्यांच्या आई-वडिलांचे एकुलते एक अपत्य आहेत. त्यांच्या आईने सुमारे पंधरा वर्षे वैधव्य सोसलेय. त्यांनी आपले सर्व दागिने सुनेला दिले. त्यांच्या निधनानंतर, त्यांनी ते दागिने प्रभू रामाच्या चरणी अर्पण करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपल्या आईचे दागिने आणि काही इतर पैसे वापरून सोन्याचे रामचरितमानस दान केले. त्यांना त्याची कोणतीही पावती देण्यात आली नाही. मग एके दिवशी त्यांना सांगण्यात आले की त्यांनी दान केलेले रामचरितमानस गायब झाले आहे.

भगवान विष्णूंच्या आरतीतील, 'तुम्हें मेरा प्रसाद, मुझे क्या पसंद आएगा?' या ओळींनी प्रेरित होऊन, १९७० च्या आयएएस तुकडीचे माजी केंद्रीय गृहसचिव एस. लक्ष्मी नारायणन यांनी आपली आयुष्यभराची कमाई रामलल्लाला समर्पित केली. ह्या दानाचे श्रेय सार्वजनिकरित्या घ्यायचे नाही, असे त्यांनी आधी ठरवले होते मात्र नंतर त्या दानाचे महत्व आणि स्वरूप पाहून ही माहिती त्यांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये सार्वजनिक केली.

भगवान रामलल्लांच्या प्रतिष्ठापनेनंतर, ५ कोटी रुपये खर्च करून तब्बल १५१ किलोग्रॅम वजनाचे रामचरितमानस अर्पण करण्याचे वचन दिले होते ते त्यांनी वेळेत पूर्ण केले. प्रभू रामचंद्रांच्या मूर्तीसमोरच हा सुवर्णग्रंथ स्थापित केला गेला. १०९०२ श्लोक असलेल्या या महाकाव्याचे प्रत्येक पान तांब्यापासून तयार केले होते. ही पाने २४ कॅरेट सोन्यात बुडवून त्यावर सोन्याचा मुलामा दिलेल्या अक्षरांनी रामायण कोरले होते. आता हे गायब झाले आहे अशी तक्रार लक्ष्मी नारायणन ह्यांनी नोंदवली आहे.

या महत्त्वाकांक्षी दानासाठी १४० किलोग्रॅम तांबे आणि सात किलोग्रॅम सोने लागले, तसेच सजावटीसाठी चार किलो वजनाचे इतर धातूही (जसे की चांदी) वापरले गेले. या अद्वितीय ग्रंथाच्या निर्मितीसाठी निधी उभारण्याकरिता, नारायणन यांनी आपली सर्व मालमत्ता विकली आणि सगळी बँक खाती रिकामी केली. यातून निर्माण होणारी 'राम चरित मानस' ही रचना भक्तिभावाने रामलल्लांच्या चरणी अर्पण केली. पत्नीसोबत अयोध्या भेटीदरम्यान, नारायणन यांनी हे दान करण्याच्या आपल्या इच्छेबाबत राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांच्याकडे परवानगी मागितली होती. त्यांनी परवानगी दिल्यानंतरच लक्ष्मी नारायण ह्यांनी सुवर्णग्रंथ निर्मितीस प्रारंभ केला होता, हे विशेष आहे!

ते अनेक वेळा अयोध्येला गेले. चंपत राय ह्यांनी त्यांना कधी कधी चार चार तास बसवून ठेवले आणि नंतर थातुर मातुर उत्तरे देऊन वाटे लावले! तासंतास वाट पाहिल्यानंतर ते



चंपत राय यांना भेटले आणि त्यांनी तक्रार केली. चंपत यांनी विचारले, 'मी हे असेच हेलपाटे घालत राहू का?' त्यावर ते म्हणाले, 'तुम्ही म्हणाला होतात की तुम्ही ते गर्भगृहात ठेवाल, मग आता तुम्ही ते का काढून टाकले?'

त्यावर चंपत म्हणाले, 'मी जे सांगेन तेच होईल. पुढे जा, तुम्हाला जे करायचे आहे ते करा.' त्यानंतर एस लक्ष्मी नारायणन यांनी असंख्य पत्रे लिहिली, सर्वतोपरी प्रयत्न केले आणि अनेक अधिकाऱ्यांकडे अपील केले, पण बेपत्ता झालेला रामचरितमानस सुवर्ण ग्रंथ कधीच सापडला नाही.

त्यांच्या कोणत्याही पत्राला उत्तर दिले गेले नाही. त्यांना कसलीही माहिती देण्यात आली नाही. आता त्यांना जाणून घ्यायचे आहे की, त्यांनी दान दिलेले रामचरितमानस कुठे गेलेय. त्यांनी चोरीचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाला (SIT) सुद्धा पत्र लिहिले आहे.

पत्नी सरस्वती नारायणन ह्यांच्यासमवेत ते अयोध्येला आले होते, तेव्हा आपल्या दानामागची भूमिका सांगताना ते भावुक झाले होते. त्यांनी सांगितले होते की, 'आमचे कुटुंब धार्मिक वृत्तीचे आहे. गरोदरपणात, आईने दिल्लीतील बिर्ला मंदिरात, जे लक्ष्मी नारायण मंदिर म्हणूनही ओळखले जाते, तिथे प्रार्थना केली होती की, जर मुलगा झाला, तर ती त्याचे नाव लक्ष्मी नारायण ठेवेल. आईने आपला शब्द पाळला व माझे नाव लक्ष्मी नारायण ठेवण्यात आले! आपल्या जन्मापासूनच देवाने आपल्याला आयुष्यभर भरघोस आशीर्वाद दिला आहे.

मी प्रमुख पदे भूषवली आहेत आणि माझे आयुष्य समृद्ध राहिले आहे. निवृत्तीनंतरही माझे उत्पन्न भरीव आहे. असे असूनही, मी साध्या आवडीनिवडी असलेला आणि मूलभूत गरजांमध्ये समाधानी असलेला माणूस आहे. माझी पेन्शन बऱ्याच अंशी तशीच आहे. देवाने मला जे दिले आहे, ते परत देण्यावर माझा विश्वास आहे. दानधर्माच्या नावाखाली पैसे गोळा करण्यापेक्षा आपले पुस्तक देवाच्या चरणी अर्पण करणे मला अधिक अर्थपूर्ण वाटते!'

चोरीच्या कथित घटनेचे त्यांना आता विलक्षण दुःख वाटते. राम मंदिरात ठाण मांडून बसलेल्या चोरांनी अशा किती जणांच्या श्रद्धेवर डाका घातला असेल याची कल्पना करवत नाही.तरीही काही अंधभक्तांना लक्ष्मी नारायण खोटे बोलत आहेत असे वाटत असेल तर त्यांनी लक्ष्मी नारायण यांच्याविषयीची माहिती घेतली तर लक्षात येईल की, ह्या माणसाचे अख्खे कुटुंब रामभक्त ईश्वरउपासक आहे! आणि ते असे निवृत्त आयएएस अधिकारी आहेत, ज्यांनी आपल्या समग्र कुटुंबाची संपत्ती ह्या दानासाठी वापरली होती!

आरएसएसचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझरच्या वेबपोर्टलवर २२ नोव्हेंबर २०२३ रोजी एस लक्ष्मी नारायण ह्यांनी दान केलेल्या सोनेरी रामचरित मानस विषयीची बातमी वाचून खात्री करून घेऊ शकता! मग खात्री पटेल की, हा माणूस खोटे बोलत नसेल, हा काही चंपत नाही! असो!रामाच्या नावावर केली गेलेली ही लूट पाहून अयोध्येतले प्रभू राम पुन्हा वनवासाला गेले असतील. असो! त्यांच्या नावावर निवडणूक तर लढवून झालीय! आपल्याला काय त्यांचे! सब चंगा सी!

आपल्याला जे दान द्यायचे आहे ते एखाद्या शाळेला, एखाद्या संशोधन केंद्राला, निधीअभावी कोमेजून जाणाऱ्या एखाद्या एनजीओला, अन्न पाणी वारा ऊन ह्या समस्यांचा सामना करणाऱ्या एखाद्या वन्य जीवाला किंवा जीवन मरणाची लढाई लढणाऱ्या परंतु पैशाअभावी उपचार घेऊ शकत नसलेल्या गरजू रुग्णांना हे पैसे दिले तर त्यांच्यात वसलेल्या खऱ्या ईश्वराची सेवा होईल, असे एस. लक्ष्मी नारायणन असोत किंवा आणखी कोणत्याही जातीधर्माच्या अन्य कोणत्याही माणसाला का वाटत नसेल?पुनश्च असो..

**- समीर गायकवाड**



# तिजन बाई गेली...

**छत्तीसगडची प्रसिद्ध लोककला 'पंडवानी' आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवणाऱ्या, दिग्गज लोकगायिका आणि पद्मविभूषण पुरस्कार विजेत्या डॉ. तीजन बाई यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. वयाच्या ७० व्या वर्षी त्यांनी रायपूर इथल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण देशाच्या सांस्कृतिक आणि कला जगतावर शोककळा पसरली आहे.**

**या** सजीव सृष्टीत मनुष्य प्राणी प्रगत आहे. त्याची उत्क्रांती ज्या झपाट्याने झाली तितकी इतर कुठल्याच प्राण्याची झाली नाही. या प्रगतीचे, उत्क्रांतीचे कारण कुणी मनुष्याची बुद्धिमत्ता म्हणून सांगते त्याच वेळी कुणी शास्त्रज्ञ एखादा रिसर्च घेऊन उभा ठाकतो आणि म्हणतो की, माणसाच्या सरासरी बुद्ध्यांकापेक्षा डॉल्फिन आणि व्हेलचा बुद्ध्यांक जास्त आहे. मग कुणी म्हणते माणसाकडे भाषेचे तंत्र आहे त्या वेळीसुद्धा कुणी उभ राहते आणि प्राणी, पक्षी एकमेकांसोबत संवाद साधत असल्याचे पुरावे मांडू पाहते. या अशा वादविवादात कदाचित आपण एक मानवाची खुबी विसरून जातो,जी इतर कुठल्याच प्राण्यात आढळत नाही, ती म्हणजे 'स्टोरी टेलिंग' एखादी गोष्ट कथन करण्याची कला.

एक आटपाट नगर होते किंवा कोणे एके काळी अथवा एकदा काय झाले. या अशा वाक्यांनी सुरुवात झाली की अनोळखी लोकांचेही कान आपल्याकडे आपोआप वळतात. गोष्ट, किस्सा, अनुभव ऐकण्यात प्रत्येकालाच रस असतो. प्राणी स्वतःच्या अनुभवांवरून परिस्थितीचा सामना करतात किंवा निसर्गच त्यांच्यात कालानुरूप अनुकूल बदल घडवून आणतो. माणसाचे जरा वेगळे आहे. तो स्वतःच्या अनुभवांवरून जगण्यात बदल करतोच वर तो इतरांच्या सर्वकालीन अनुभवांना ऐकून त्यावर विचार करून स्वतःच्या आयुष्यात योग्य ते बदल करतो. माणसाच्या उत्क्रांतीची सुरुवातच अनुभव कथनाने स्टोरी टेलिंगने झाली आहे.भीमबेटकासारख्या ठिकाणी अश्मयुगीन मानवाची भित्तिचित्रे सापडली. ती चित्रे नक्कीच काही डॉक्युमेंटेशन व्हावे म्हणून काढली नसावीत. कारण तो माणूस तेवढा प्रगत नक्कीच नव्हता. ती चित्रे कदाचित कुणा समूह सदस्यासमोर,लहान मुलांसमोर शिकारीचा थरार उलगडून सांगणारे चित्र रूपातले कथाकथन असण्याची जास्त शक्यता आहे.

**आपली भारतीय संस्कृती गोष्टीरूपानेच बहरली**

ज्ञानार्जनासाठी केवळ स्वतःचे अनुभव कामी येत नाहीत, त्यासाठी इतरांचे अनुभव ऐकावे लागतात. म्हणूनच पुस्तके आणि देशाटन यांवर जास्त भर दिला जातो. पुस्तकांत लिहून ठेवलेले अनुभव आणि प्रवासात इतरांचे तोंडी अनुभव आपल्याला ऐकायला मिळतात. यातून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी मदत होते. गोष्टींमधून इतरांच्या आयुष्यात घडलेल्या घडामोडी कळतात, त्यातून त्या विशिष्ट परिस्थितीमध्ये काय योग्य काय अयोग्य आचरण आहे हे समजायला मदत होते. म्हणूनच आपली भारतीय संस्कृती गोष्टीरूपानेच बहरत गेलीय. रामायण-महाभारतातील पात्रे किती खरे किती खोटे यावर मतमतांतरे आहेत. या वादात जाण्यापेक्षा त्या महाकाव्यांतून कथन झालेली गोष्ट आपल्या आयुष्यात दीपस्तंभ म्हणून कित्येकदा कामी येते. शिवबा कसा घडला हे सांगतानासुद्धा माता जिजाऊ गोष्टींतून संस्कार करत असे सांगितले जातं. ही गोष्ट सांगण्याची परंपरा आपल्या लोककलाप्रकारांतूनसुद्धा आपल्याला पाहायला मिळते. किंबहुना त्यांनीच गोष्ट जगवलीय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. महाराष्ट्रात पोवाडा, भारूड,कीर्तन, प्रवचन अगदी तमाशासारखे लोककला प्रकारसुद्धा आपापल्या कलाप्रकारानुसार,उद्दिष्टानुसार गोष्टी सांगत आले आहेत.

कर्नाटकात यक्षगान,केरळात कथ्थकली, तमिळनाडूमध्ये कथेय्यम पट्टम, राजस्थानात कावड, छत्तीसगडमधील पंडवानी, आंध्र प्रदेशातील बुर्रा कथा यांसारख्या विविध राज्यांच्या विविध भाषांच्या विविध कलाप्रकारांमधून कथाकथन बहरत राहिले. हे बहरण्या-फुलण्यामागे अनेक कलाकारांनी सगळे आयुष्य त्यासाठी वाहिले. पौराणिक गोष्टीला गाण्यांमध्ये गुंफून, गरज असेल तिथे गाणे थांबवून गोष्ट सांगून किंवा गोष्टीतल्या पात्राने आपले संवादच गाऊन प्रेक्षकांसमोर मांडणे म्हणजे पंडवानीष्ठआता वयाची ६७ वर्षे पूर्ण केलेली तीजन बाई आपल्या ठसकेबाज आवाजात महाभारतातल्या गोष्टी गाऊन सर्वदूर पसरवते. या कलेला 'पंडवानी' असे म्हणतात.

**पंडवानी गातेय म्हणून समाजातून बहिष्कृत**

वयाच्या तेराव्या वर्षी पहिली पंडवानी सादर केलेली तीजन आजपर्यंत थांबलीच नाही. बालविवाह झालेली तीजन पारधी समाजाची असून एक स्त्री असूनही पंडवानी गातेय म्हणून तिला समाजातून बहिष्कृत करण्यात आले. नवऱ्याने टाकून दिले.ती एकटी राहिली,जगण्यासाठी संघर्ष करत राहिली, पण कला काही सोडली नाही. तिने पांडवांच्या गोष्टीला जगवलं, गोष्टीने तिला. तिच्या या योगदानासाठी तिला पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या पद्म पुरस्कारांनी आणि संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित केले गेले.

तीजनबाईंचा जन्म २४ एप्रिल १९५६ रोजी भिलाई जवळच्या 'गनियारी' गावांत झाला. त्या जंगलात राहणाऱ्या 'बनफरा' जमातीच्या. सामाजिकदृष्ट्या अत्यंत अभावग्रस्त,अतिदलित समाजष्ठ चिमणी,जंगली डुक्कर,नीलगाय,साप, गाय,कृमी-कीटक खाणारी. झाडू, सुपं,चटई बनवून, शेतात मजुरी करून गुजराण करणारी ही लोक. अशा कमालीच्या प्रतिकूल वातावरणाचा घट्ट विळखा असतानाही त्यांनी व्यक्तीची भाग्यरेषा लिहून येत नसून ती आपली आपणच लिहायची असते, हे सिद्ध केले.

गावांत पेयजल, वीज, रस्ता, दवाखाना, शाळा अशा मुलभूत सुविधाही नव्हत्या. तीजनने लहानपणी एकदा आजोबा ब्रिजलालचे गायन ऐकले. ते त्यांना फार आवडले. त्यांनी तसे आजोबांना सांगितलंही. आजोबांनी मग त्यांना जे ऐकले ते गायला सांगितले. त्या घाबरल्या. थोडंसे गायल्या. ते ऐकून आजोबांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. आपल्या नातीमध्ये असामान्य प्रतिभा असल्याची जाणीव त्यांना झाली. आजोबा 'पंडवानी'गायचे. पंडवानी म्हणजे महाभारतातल्या पांडवांचे गुणगान करणारी पद्यशैलीची गाथा! त्या दिवसानंतर त्या रोज आजोबांना गाऊन दाखवायच्या. अल्पावधीतच त्या आजोबांसारखे गाऊ लागल्या. त्यांच्या गायनाची चर्चा पंचक्रोशीत होऊ लागली. विलक्षण प्रतिभा आणि समर्पण पाहून लोककलावंत उमेदसिंह यांनी त्यांना अनौपचारिकपणे प्रशिक्षित केले. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी एका शाळेत त्यांनी आपल्या कलेचे पाहिले सादरीकरण केले. त्यांची कला प्रेक्षकांना इतकी आवडली की त्यांना बक्षीसापोटी दहा रुपये मिळाले. बक्षीस मिळाल्याने त्या आनंदाने रडायला लागल्या. या दिवसानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही.

**एक शुद्र स्त्री पंडवानी कसे काय गाऊ शकते?**

एक शुद्र स्त्री पंडवानी कसे काय गाऊ शकते असा आक्षेप सनातनी लोकांनी घ्यायला सुरुवात केली. कारण तोवर ही कला फक्त पुरुषच सादर करू शकत होते. तीजनबाई पहिल्या स्त्री की ज्यांनी ही परंपरा तोडून पंडवानी गायले. त्यांनी पंडवानीचा तोंडवळाच बदलून टाकला. सर्वस्वी नव्या, आगळ्या-वेगळ्या ढंगात रंगमंचावर आणले. हे बघून प्रेक्षक दंग झाले. गायकी तर अशी की पुरुष कलावंतांच्या गायकीला जवळपासही फिरकू दिले नाही. सवर्ण समाजाने मात्र त्यांच्यावर विषारी टीका केली. वडीलांना धमकावले. त्यांची अब्रू लुटण्याचा प्रयत्न केला. कुटुंब आणि गावातल्या लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. शेवटी त्यांना गावातून परागंदा व्हावे लागले.

तीजनबाईंनी पहिल्यांदा आपली कला पेश केली त्यावेळी पंडवानी स्त्री गायिका फक्त बसून गायच्या. रंगमंचाखाली बसून पुरुष गायकांच्या सूरात सूर द्यायच्या. केवळ पुरुष गायकांनीच उभे राहून गायचे असा प्रघात होता. हा प्रघात त्यांनी मोडीत काढला. हा एकप्रकारे पुरुषप्रधान मानसिकतेवर केलेला जोरदार प्रहार होता. त्यांची शैली तूफान लोकप्रिय झाली. लोकं त्यांच्या पंडवानीचा आस्वाद घ्यायला रात्री धावत-पळत यायचे.गावं-खेडी-शहरातल्याच नाही तर दुर्गम-पहाडी-आदिवासी-जंगल परिसरातल्या साऱ्या रसिकांच्या गळातल्या त्या ताईत झाल्या. इतकी अमाप लोकप्रियता त्यांनी मिळवली. त्यांची कीर्ती देशापर्यंतच सीमित न राहता परदेशातही पोहचली. अख्तरीबाई, हिराबाई बडोदेकर, जद्दनबाई (अभिनेत्री नर्गिसची आई), गौहर खान, सुब्बालक्ष्मी, जानकीबाई, गिरिजादेवी आदी दिग्गज कलावंतांसारखी ख्याती त्यांनी मिळवली.

रंगमंचावर सिंहासारखी गर्जना, भारदस्त नि नजरेत भरणारे व्यक्तिमत्व,उंच अंगकाठी,लालभडक साडी,केसांवर चमकता कुंकू, कपाळावर मोठी गोल बिंदी, पानाने रसिले झालेले ओठ, दातांमध्ये लालिमा, हातात तंबोरा असे त्यांचे रूप प्रेक्षकांना विस्मयचकित करून टाकते! तीजनबाई एकट्याने रंगमंचाचा संपूर्ण अवकाश व्यापून टाकतात! लोके प्रचंड भारावतात. दाद आणि बक्षीस म्हणून पैशांची उधळण करतात. श्रेष्ठ भारतीय नाट्यकर्मी हबीब तन्वीर यांनी त्यांना एकदा ऐकले नि त्यांच्या आयुष्याला वेगळी दिशा मिळाली. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी ते देश-विदेशातल्या अनेकांनी त्यांच्या अफलातून प्रतिभेची स्तुती केली.

या कलाकारांनी स्वतःच्या आवडीने,जातीच्या परंपरेने, उपजीविकेसाठी किंवा समाजाला सुधारण्यासाठी गोष्टीला जागते ठेवले. गोष्टी जगल्या नाही तर माणूस 'माणूस' राहणार नाही हे जाणून, न जाणून तिला जागते ठेवले. गोष्टींचा हेतू देव-धर्माचा प्रचार असू देत किंवा सामाजिक-राजकीय परिस्थितीवर उपाय असू देत गोष्टी जगल्या पाहिजेत. गोष्टीला जात नसते, धर्म नसतो. तिच्यात प्रचारकी कावेबाजपणा असण्याची शक्यता असते पण तो 'ह्युमन एरर' तर प्रत्येक ठिकाणी आहेच. जर आपली सद्सद्विवेकबुद्धी जागृत असेल तर आपण राम-सीतेच्या गोष्टीपासून मुल्ला नसिरुद्दीनपर्यंत आणि कृष्ण लीलेपासून अलिफ लैलापर्यंत प्रत्येक गोष्ट तेवढ्याच रुचीने ऐकू शकतो आणि योग्य तो बोध घेऊ शकतो.

राजाश्रयावाचून, लोकाश्रयावाचून भोगवादी संधिसाधू समाजात कित्येक कलाकार आणि कित्येक कलप्रकार नष्ट झाले याचा तोटा आपल्या पिढीला लगेच दृश्य स्वरूपात दिसणार नाही, पण कालांतराने जेव्हा आपली संस्कृती, आपली तत्त्वे, आपली विचारप्रणाली जेव्हा बिनाबुडाचे गाडगे होईल आणि स्वार्थ दिसेल तेव्हा उताराला गडगडून पळू लागेल तेव्हा आपण माणूस म्हणून, समाजरचना म्हणून स्वतःला हरवून बसलेलो असू. असो. हे सर्व गोष्टीवेल्हाळ कथाकथनकार,कथागोई, स्टोरी टेलर्स आजच्या डिजिटल जमान्यातील फिल्म्स, सिरियल्स, वेबसिरीज यांसारख्या माध्यमांचे पूर्वज आहेत,त्यांनी पाया रचलाय म्हणून हा सर्व माध्यमांचा डोलारा उभा आहे. माणसे जन्माला येतात आणि मरून जातात,त्यांच्या जगण्याच्या, संघर्षाच्या, भलेबुरेपणाच्या गोष्टी अजरामर राहायला हव्यात, त्याशिवाय उत्क्रांतीचे चक्र फिरते राहणार नाही. म्हणून गोष्टी जगल्या पाहिजेत. माध्यमे बदलतील,पद्धती बदलतील, गोष्टींची रूपे बदलतील पण गोष्टी जगल्या पाहिजेत.

तिजन बाईंना विनम्र अभिवादन..

**प्रशांत पवार**

# अमित साटमांच्या हास्यवर थयथयाट कितपत योग्य?

**आ**ज सोशल मीडियावर कोणता विषय केव्हा चर्चिला जाईल किंवा कोणाच्या अब्रूचे धिंडवडे काढले जातील याचा आता अंदाज राहिलेला नसून फोन वर अश्लील शिवीगाळ करणारे संभाषण करणे आणि तेच संभाषण सोशल मीडियावर व्हायरल करण्याचा ट्रेंड प्रचंड वाढत आहे.पत्रकार परिषदा मध्ये कंबरे खालच्या अश्लील भाषेचा प्रयोग सुद्धा आज फॅशन होऊन बसला आहे.त्यामुळे सुसंस्कृत महाराष्ट्रात आज जे काही चालले आहे त्याचे चिंतन करण्याची आवश्यकता आहे.



सद्याच्या स्थितीत महाराष्ट्राच्या मिडिया आणि सोशल मीडियावर मुंबईचे संवेदनशील तथा सदैव फील्डवर काम करणाऱ्या आमदार अमित साटम यांच्या नावाने शेलक्या भाषेत शिमगा सुरू झालेला दिसत आहे.आणि तो कितपत योग्य आहे? याचा सुसंस्कृत महाराष्ट्राने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.विधान भवनाच्या प्रवेश द्वारा जवळ आमदार जयंत पाटील आणि आमदार अमित साटम यांच्यामध्ये मुंबई पावसाळी दोन दुर्घटना संबंधी 'काल झाडामुळे,आज मॅनहोल मुळे'अशा आशयाचा संवाद झाला आणि दोघेही वेगळे होत असताना अमित साटम यांच्या चेहऱ्यावर स्मित हास्याचा क्षण कॅमेरा मध्ये टिपला गेला आणि याच क्षणाचा तथा संवादाचा विपर्यास करून विरोधी पक्ष,मिडिया आणि सोशल मीडिया आमदार अमित साटम यांच्यावर तुटून पडला आहे.मुंबई मधील आघाडीच्या वर्तमान पत्रात बातम्या सुद्धा झळकल्या आहेत.संजय राऊत पासून आदित्य ठाकरे, संदीप देशपांडे यांनी तर अशोभनीय आणि शेलक्या भाषेचा प्रयोग करून विखारी टीका टिप्पणी केली आहे.वास्तविक पाहता आमदार अमित साटम यांनी उपरोक्त प्रकरणावर आपल्या संवेदना प्रकट करून स्पष्टीकरण दिले आहे.सामान्य मुंबईकरांचे समाधान सुद्धा झाले आहे.पण मुंबई महानगर पालिका निवडणुकीतील पराजयाचा वचपा काढण्यासाठी त्यांना सामूहिक टार्गेट केले जात आहे.

याचा मागोवा घेतल्यास किंवा विचार केल्यास असे लक्षात येते की चार पाच महिन्यापूर्वी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुका मुंबई भाजपा अध्यक्षा आमदार अमित साटम यांच्या नेतृत्वा खाली झालेल्या असून त्यांनी मुंबई महानगर पालिकेतील ठाकरे शिवसेनेची सत्ता उध्वस्त केली आहे.तसेच शिवसेना उभाठा, मनसे, काँग्रेस आणि महाआघाडीच्या घटका सोबत एकाच वेळी सर्वां सोबत राजकीय संघर्ष करून मुंबई महानगर पालिका निवडणूक जिंकली आहे. निवडणुकीच्या काळात अमित साटम यांनी संपूर्ण मुंबई शहर पिंजून काढणे,निर्भीड वक्तव्य शैली आणि मुंबई विकासाचे व्हिजन यामुळे मुंबई शहराचा प्रभावी आणि आश्वासक चेहरा म्हणून ते समोर आले आहेत.वडिलोपार्जित अभयामुळे नव्हे स्व कष्टाने मोठा होत असेल प्रभाव निर्माण होते तेव्हा आपण त्याची बरोबरी करूच शकत नाही म्हणून त्याची बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

**अशोक राणे**
भ्रम.९४२३६५८३८५

# वंशाची ज्योत : दोन उंबरठ्यांचा उज्ज्वल प्रकाश

**'ज्यो**त कोणाचीही नसते; ती जिथे प्रज्वलित होते, तिथे प्रकाश पसरवत राहते. स्त्रीही तशीच असते. ती ज्या घरात जन्म घेते, त्या घराचे संस्कार जपते आणि ज्या घरात सासरी जाते, त्या घराचा मान वाढवते. म्हणूनच ती एका नव्हे, तर दोन वंशांची ज्योत असते.'समाजात शतकानुशतके एक वाक्य सहज ऐकायला मिळते 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा.' हे वाक्य इतके रुजले की मुलीच्या अस्तित्वालाच अनेकदा दुय्यम स्थान दिले गेले. पण काळाच्या ओघात स्त्रीने आपल्या कर्तृत्वाने हा समज बदलण्यास सुरुवात केली आहे. आज ती केवळ कुटुंब सांभाळणारी गृहिणी नाही, तर संशोधक, शास्त्रज्ञ,प्रशासकीय अधिकारी, उद्योजिका, कलाकार, खेळाडू, शिक्षिका, सैनिक आणि समाजपरिवर्तनाची धुरा वाहणारी सक्षम नागरिक आहे. तिच्या यशाने केवळ तिचे जीवन उजळत नाही, तर दोन कुटुंबांचा सन्मान आणि अभिमानही उजळून निघतो.

मुलगी जन्माला येते तेव्हा ती माहेरच्या संस्कारांच्या कुशीत वाढते. तिच्या आई-वडिलांची स्वप्ने, मूल्ये आणि कष्ट ती आपल्या व्यक्तिमत्त्वात जपते. विवाहानंतर ती एका नव्या कुटुंबाचा भाग बनते.तिच्या यशात तिच्या माहेरचाही अभिमान असतो आणि सासरच्यांचाही सन्मान दडलेला असतो.या प्रवासात तिला मोठमोठ्या सुविधा नको असतात; तिला हवा असतो विश्वास. तिच्या क्षमतेवर ठेवलेला विश्वास, तिच्या निर्णयांचा आदर, तिच्या कष्टांची दखल आणि अपयशाच्या क्षणी आधार देणारा कुटुंबाचा हात. एवढे मिळाले, तर ती अशक्य वाटणाऱ्या उंचीही गाठू शकते.

आज गरज आहे ती विचार बदलण्याची.'मुलगा वंशाचा दिवा' ही संकल्पना मागे ठेवून 'कर्तृत्ववान व्यक्ती ही वंशाची ज्योत' ही नवी विचारधारा स्वीकारण्याची. कारण घराचे नाव उजळवण्यासाठी मुलगा किंवा मुलगी असण्यापेक्षा माणूस म्हणून मोठे होणे अधिक महत्त्वाचे असते.आपल्या मुलींनीही इतरांनी आखून दिलेल्याच चौकटीत जगावं, फक्त घरकामातच कुशल असावं, अभ्यास आणि स्वप्नांना दुय्यम स्थान द्यावे.हा विचार आता बदलण्याची वेळ आली आहे. सुगरण होणं ही तिची गुणवत्ता असू शकते, पण तीच तिची ओळख नसावी. मुलीला घरकामासोबत शिक्षण, करिअर, संशोधन, कला किंवा तिला ज्या क्षेत्रात उंच भरारी घ्यायची आहे, त्या प्रत्येक स्वप्नाला समान संधी मिळाली पाहिजे. कारण तिचं आयुष्य केवळ परंपरा जपण्यासाठी नाही, तर नवे आदर्श घडवण्यासाठीही आहे.

शेवटी एवढेच...स्त्रीला 'वंशाची ज्योत' होण्यासाठी कोणत्याही विशेष अधिकारांची गरज नसते; तिला गरज असते समान संधीची, विश्वासाची आणि प्रेमळ आधाराची. तिच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवला, तिच्या स्वप्नांना बळ दिले, तर ती एका नव्हे तर दोन वंशांचा अभिमान बनते. आणि ज्या कुटुंबात स्त्रीला अशी संधी मिळते, ते कुटुंब खऱ्या अर्थाने प्रगत, सुसंस्कृत आणि उज्ज्वल भविष्याचा दीपस्तंभ ठरतं.

'ती फक्त उंबरठा ओलांडत नाही; ती दोन वंशांच्या आयुष्यात प्रकाशाची नवी पहाट घेऊन येते.'



**- डॉ. अवंतिका मानकर चौधरी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सच

अकोला
जिल्हा विशेष

# अकोल्यात उपवर्गीकरण विरोधी संघर्ष परिषदेत आरक्षण संरक्षणासाठी एकजुटीची गर्जना

**संविधानाने दिलेल्या अनुसूचित जातींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही**

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहर काँग्रेस कमिटी व समाज क्रांती आघाडी, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उपवर्गीकरण विरोधी संघर्ष परिषद' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या संरक्षणासाठी, संविधानिक हक्क अबाधित राखण्यासाठी आणि उपवर्गीकरणाच्या विरोधात जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या परिषदेला विविध सामाजिक, राजकीय आणि विद्यार्थी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महेंद्र गवई, अध्यक्ष, अकोला शहर काँग्रेस कमिटी होते. प्रारंभी भारतीय संविधानाच्या प्रतिमेचे पूजन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून समाज क्रांती आघाडी चे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज शेंडे , डॉ गोपाल उपाध्ये,तसेच आरक्षण उपवर्गीकरण संघर्ष समिती चे सदस्य, विशाल नंदागवळी,प्रितम डोंगरे, अमित वाघुरवाघ आणि अक्षय राऊत सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी हे उपस्थित होते, समाज क्रांती आघाडी चे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज शेंडे यांनी उपवर्गीकरणाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, अनुसूचित जातींना भारतीय संविधानाने दिलेले आरक्षण हे सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन असून त्यात कोणत्याही प्रकारची विभागणी अथवा उपवर्गीकरण करणे हे सामाजिक समतेच्या मूलभूत तत्त्वांवर आघात करणारे आहे. आरक्षण हे संविधानाने दिलेले अधिकार असून त्याचे संरक्षण करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने संघटितपणे लढा उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली समाज क्रांती आघाडी चे दिवंगत नेते स्व.प्रा.मुकुंद खैरे हे कॉंग्रेस पक्षाच्या विचारसरणीला माननारे होते, आम्ही अजहि देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या संविधानाच्या लढाईत त्यांच्याबरोबर आहोत अशी ग्वाही दिली,

अमित वाहुरवाघ व विशाल नंदागवळी यांनीही आपले विचार मांडले. संविधान, सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार आणि मागासवर्गीय समाजाच्या हक्कांबाबत जनजागृती अधिक व्यापक करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून बंडूदादा वानखडे (महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष समाज क्रांती आघाडी), शुभम तिडके (अध्यक्ष, अशोका फाऊंडेशन), संदीप खंडारे (सामाजिक कार्यकर्ते) आणि महेंद्र भोजने (जिल्हाध्यक्ष, फुले आंबेडकरी राष्ट्रीय विद्यार्थी युवक संघटना, अकोला) उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी संविधान आणि सामाजिक न्यायाच्या संरक्षणासाठी सर्वांनी एकत्र येऊन लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याचे आवाहन केले.

या परिषदेचे आयोजन सुनील वानखडे, महानगर अध्यक्ष, काँग्रेस कामगार विभाग, अकोला आणि शिलवंत वानखडे, जिल्हाध्यक्ष, समाज क्रांती आघाडी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजकांनी सर्व उपस्थित मान्यवर, सामाजिक संघटना, कार्यकर्ते आणि नागरिकांचे आभार मानले.

अध्यक्षीय समारोपात महेंद्र गवई यांनी सांगितले की, भारतीय संविधान, सामाजिक न्याय आणि अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या संरक्षणासाठी काँग्रेस पक्ष नेहमीच कटिबद्ध राहिला आहे. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून आरक्षण कमकुवत करण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ दिला जाणार नाही. संविधानाच्या चौकटीत राहून लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारले जाईल आणि समाजातील प्रत्येक घटकापर्यंत या विषयाची माहिती पोहोचविण्यात येईल. कॉंग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांच्या संविधानाच्या लढाईत देशातील सर्व पुरोगामी व दलित चळवळ चालविणाऱ्या संघटनांनी साथ देत देशाच्या लोकशाही चे रक्षण करावे असे आवाहन केले,

परिषदेच्या शेवटी उपस्थितांनी संविधानाच्या संरक्षणासाठी, अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या रक्षणासाठी आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याला अधिक बळकटी देण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# खेट्रीतील जि.प. उर्दू शाळेच्या चार वर्गखोल्या जीर्ण

**खेट्रीतील जि.प. उर्दू शाळेच्या चार वर्गखोल्या जीर्ण**
**दोन वर्षांपासून दुरुस्ती रखडली; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या चार वर्गखोल्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून, गेल्या दोन वर्षांपासून त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. वर्गखोल्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिक धोकादायक बनत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

माहितीनुसार, सुमारे दोन वर्षांपूर्वी शाळेतील तीन वर्गखोल्यांवरील टिनपत्रे तसेच छताचा काही भाग कोसळण्याची घटना घडली होती. त्या वेळी संबंधित विभागाकडून तातडीने दुरुस्तीचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे.



सध्या विद्यार्थी जीर्ण व धोकादायक वर्गखोल्यांमध्ये शिक्षण घेत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शाळा प्रशासन व संबंधित विभागाकडे अनेकदा पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर छत कोसळण्याचा किंवा अन्य दुर्घटना घडण्याचा धोका अधिक वाढल्याने पालकांची चिंता वाढली आहे.

स्थानिक नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या जीविताशी संबंधित या प्रश्नाची शिक्षण विभागाने गांभीर्याने दखल घेऊन वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास भविष्यात एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असा इशाराही पालकांनी दिला आहे.

खेट्रीचे सरपंच जहूर खान यांनी सांगितले की, 'शाळेच्या दोन जीर्ण वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी दीड वर्षांपूर्वीच पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या कामासाठी जिल्हा परिषदेकडून सुमारे ६ लाख ३० हजार रुपयांचा निधी उपलब्ध आहे. मात्र, अद्याप प्रशासकीय मंजुरी मिळालेली नाही. मंजुरी मिळताच दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेतले जाईल.'

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८२७/२०२६ — प्रोसेस नं.८३५८/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ — दिनांक : ०४/०७/२०२६

**अर्जदार :** १. लंकाबाई आनंद उर्फ आनंदराव कातखेडे २. शेषराव आनंद उर्फ आनंदराव कातखेडे ३. केशव आनंद उर्फ आनंदराव कातखेडे ४. महेश आनंद उर्फ आनंदराव कातखेडे रा. चैतन्येश्वर मंदिराजवळ, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आनंद उर्फ आनंदराव हरीभाउ कातखेडे
**पत्ता :-** रा. चैतन्येश्वर मंदिराजवळ, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आनंद उर्फ आनंदराव हरीभाउ कातखेडे यांचे दि. ०६/०८/२०२५ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५११/२०२६ — प्रोसेस नं.४५३०/२०२६
चौ.ता. ३१/०७/२०२६ — दिनांक : ०४/०४/२०२६

**अर्जदार :** १. बेबी सुभाष मोहोड रा. धातोर्डी, ता. जि. अकोला. २. मंगेश सुभाष मोहोड रा. धातोर्डी, ता. जि. अकोला. ३. सुदर्शन सुभाष मोहोड रा. धातोर्डी, ता. जि. अकोला. ४. नागसेन सुभाष मोहोड रा. धातोर्डी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुभाष लखुजी मोहोड
**पत्ता :-** रा. धातोर्डी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुभाष लखुजी मोहोड यांचे दि. ०४/०७/२०२५ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०७/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## Change In Name

I have change
My name from
**Varun kumar madhusudan khete**
( Old Name )
-To-
**Varun madhusudan khete**
( New Name )
Please take Note.
Address : Near Bhawsar panch banglow, shivaji nagar, June shahar, Akola 4440

## Change In Name

I have change
My name from
**Sonal Varunkumar khete**
( Old Name )
-To-
**Sonal Varun khete**
( New Name )
Please take Note.
Address : Near Bhawsar panch banglow, shivaji nagar, June shahar, Akola 444002

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २०९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# हरवलेले ८० हजारांचे सोन्याचे दागिने अवघ्या काही तासांत सापडले

**अकोट शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे महिलेच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद**

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहर पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे प्रवासादरम्यान हरवलेले सुमारे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने संबंधित महिलेला सुखरूप परत मिळाले. पोलिसांच्या या तातडीच्या कारवाईमुळे महिलेने समाधान व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले.



पुष्पा सुनिल तेलगोटे (रा. खानपूरवेस, अकोट) या महिला ४ जून रोजी पुणे ते अकोट असा श्री गणेश ट्रॅव्हल्सने प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान त्यांच्या गळ्यातील सुमारे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र (किंमत ६० हजार रुपये) तसेच २ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे झुमके (किंमत २० हजार रुपये) असे एकूण ८० हजार रुपये किमतीचे दागिने हरवले. याप्रकरणी ५ जून रोजी त्यांनी अकोट शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. तक्रारीची दखल घेत मालमत्ता गहाळ रजिस्टरमध्ये नोंद करण्यात आली. त्यानंतर डीबी पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक निलेश बाराहाते यांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली. पोलिसांनी श्री गणेश ट्रॅव्हल्सचे चालक रोहन गजानन भेंडारकर (रा. गवळीपुरा, अकोट) व वाहक सुभाष अजाबराव दांदळे (रा. खिरपुरी, ता. बाळापूर) यांची चौकशी करून बसची सखोल पाहणी केली. या पाहणीत महिलेचे हरवलेले सोन्याचे दागिने बसमध्येच मिळून आले. त्यानंतर आवश्यक कार्यवाही पूर्ण करून दागिने संबंधित महिलेकडे सुपूर्द करण्यात आले.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, डीबी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक निलेश बाराहाते तसेच पोहेकॉ गणेश सोळंके, नापोकॉ विपुल सोळंके, पोकॉ मोहन दुर्गे आणि पोकॉ अश्विन चौव्हाण यांनी पार पाडली. शहर पोलिसांच्या या तत्पर व संवेदनशील कार्यवाहीचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## Change In Name

I have change of
My Name
Old Name
**TAK KARISHMA GAJENDRA**
New Name
**KARISHMA GAJENDRA TANK**
Address - NEAR SIND HARDWARE DAGDI PUL CHOWK AKOLA 444001 Affidavit No - 65AB 362006

## Change In Name

Old passport no J9283444I Have Change My Name From
**MANISH MAHADEORAO THAKRE**
-TO-
**MANISH MAHADEORAO THAKARE**
My Residential Address is - Mrudhgandh SBI Colony Parijat Nagar At post Shegaon Dist Buldhana 444203

## Change In Name

I Have Change My Name after marriage From
**KIRTI SURESH PANDE**
-TO-
**KALYANI JAYANT JAPE**
MY Residential Address is - Flat no 2/8 Ratanlal plot opp L R T college Akola 444001

## Change In Name

I have Change
My Name Form
**KALIDAS GANPAT SONAR**
TO
**KALIDAS GANPATI SONAR**
My passport Number - X7921339
My residential Address in Pushparaj residency, Yeota road, Malkapur Akola 444001

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे मोहम्मद शकील मोहम्मद जलील रा. नुराणी मस्जिद, गंगु प्लॉट, वाशीम, ता. व जि. वाशीम हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा वाशिम यांचे कडून रु. १५,००,०००/- (पंधरा लाख रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन - वाशीम नगरपालिका हद्दीतील मौजे वाशीम, जुना वार्ड क्र. २२, घोडबाभूळ वार्ड येथील प्लॉट क्र. ६, सर्वे क्र. ९१ / ६ /क, नगरपालिका मालमत्ता क्र. ४१२ (नवीन) व १७१ (जुना) एकूण क्षेत्रफळ १४९.८६ चौ.मिटर ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस - भूखंड क्र. ७; पश्चिमेस – भूखंड क्र. ५; उत्तरेस – रस्ता; दक्षिणेस – हसन खा यांची जागा या प्रकारे आहेत. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हित संबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करिता ही जाहीर नोटीस.

वाशीम, दि. ०६/०७/२०२६.

**ॲड. सा. दा. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

# राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत पातूरच्या अनुराग सरोदेचा प्रथम क्रमांक

■ प्रतिनिधी | पातूर ■

संभाजीनगर येथे ५ जुलै रोजी जी चॅम्प अबॅकसतर्फे आयोजित राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत पातूर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलचा विद्यार्थी अनुराग सतीश सरोदे याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामुळे पातूर शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात आणखी एका मानाच्या कामगिरीची नोंद झाली आहे.

**किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याची राज्यभरात चमक; ट्रॉफी, पदक व प्रशस्तीपत्राने गौरव**



स्पर्धेनंतर संभाजीनगर येथील एम.आय.टी. मंथन हॉलमध्ये आयोजित पुरस्कार वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते अनुरागचा प्रशस्तीपत्र, सुवर्णपदक आणि आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. अबॅकस ही विद्यार्थ्यांच्या गणितीय कौशल्यासोबतच स्मरणशक्ती, एकाग्रता, वेगवान विचारक्षमता आणि मानसिक गणनशक्ती विकसित करणारी स्पर्धा म्हणून ओळखली जाते. अशा राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणे ही निश्चितच उल्लेखनीय बाब मानली जात आहे.

अनुरागने सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळविले. त्याच्या या यशाबद्दल पातूर शहरासह परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध स्तरांतून त्याचे कौतुक करण्यात येत आहे.

या यशाचे श्रेय अनुरागने रामानुजन अबॅकस कोचिंग क्लासेसच्या संचालिका सौ. मिताली काळपांडे, विलास काळपांडे, तसेच आपल्या आई-वडील, बहिण आणि शाळेतील गुरूजनांना दिले. अनुरागच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही अबॅकससारख्या बौद्धिक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९७४/२०२६ — प्रोसेस नं.८०८८/२०२६
चौ.ता. ११/०८/२०२६ — दिनांक : ३०/०६/२०२६

**अर्जदार :** १. नितिन वसंतराव म्हैसने रा. गजानन अपार्टमेंट फ्लॅट नं. २०२, रामेकर चौक जवळ, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोल २. सौ. मेघा अनिल देशमुख रा. प्लॉट नं. ८९/५, माधव नगर, वाघापूर रोड, वार्ड नं. ६, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ. ३. सौ. कांचन अंबादास उमाळे रा. गजानन महाराज मंदिराजवळ, मुकुंद नगर, सुधिर कॉलनी, अकोला, ता. जि. अकोला. ४. कु. दिपा वसंत म्हैसने रा. अश्विनी देव बिल्डिंग, फ्लॅट नं. ७०७, ओजस अपार्टमेंट, बानेर पाषाण, लिंक रोड, एचडीएफसी बँक जवळ, बानेर, ता. जि. पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वसंत यशवंत म्हैसने
**पत्ता :-** रा. गजानन अपार्टमेंट, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वसंत यशवंत म्हैसने यांचे दि. ०७/०५/२०१९ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९६३/२०२६ — प्रोसेस नं.७९६४/२०२६
चौ.ता. १०/०८/२०२६ — दिनांक : २४/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती कमल गोवर्धन अंभोरे २. रवि गोवर्धन अंभोरे दोघेही रा. जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. पुनम रामधन तेलगोटे लग्नाआधीचे नाव पुनम गोवर्धन अंभोरे रा. पुंडा, ता. अकोट, जि. अकोला. ४. सौ. वंदना विजय गायगोळ लग्नाआधीचे नाव वंदना गोवर्धन अंभोरे रा. जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार : निल**
**मयताचा पत्ता :-** मयत : गोवर्धन जामाजी अंभोरे
**पत्ता :-** रा. जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गोवर्धन जामाजी अंभोरे यांचे दि. ०१/०७/२०२५ रोजी राहत्या घरी, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्ज़दार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होड़न आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/ २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९८५/२०२६ — प्रोसेस नं.८२८४/२०२६
चौ.ता. १२/०८/२०२६ — दिनांक : ०२/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती वनीता राजू अवातीरक २. निलेश राजू अवातीरक ३. सौ. मंजुषा रवि नळकांडे रा. हिंगना शेळद, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला. ४. सौ. पूनम नितीन मार्के १, २ व ४ रा. डाबकी रोड, श्रीराम चौक, रेणुका नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजू दिनकरराव अवातिरक
**पत्ता :-** रा. श्रीराम चौक, रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजू दिनकरराव अवातिरक यांचे दि. १६/०१/२०२२ रोजी राहते घरी, रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं.१७२/२०२६ — प्रोसेस नं. /२०२६
चौ.ता. १०/०८/२०२६ — दिनांक : /०७/२०२६

**अर्जदार :** १. सतिष जगतराव वडाळ, वय ५० वर्ष रा. पो. चोहोट्टा बाजार ता. अकोट जि. अकोला २. ज्योतीताई ज्ञानेश्वर धनवाडे लग्नानंतरचे नांव ज्योतीताई जगतराव वडाळ उर्फ ज्योती जगतराव वडाळ वय अ. ४२ वर्षे रा. पो. म्हातोडी ता. जि. अकोला ३. सुवर्णा जगतराव वडाळ, वय अं. ३६ वर्षे ४. आशिष जगतराव वडाळ वय अं. ३४ वर्षे अ.क्र. ३ व ४ रा. चोहोट्टा बाजार ता. अकोट जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार क्र. १ ते ४ हे वर दिलेल्या पत्यावर राहत असून त्यांचे वडिल जगतराव नामदेवराव वडाळ हे दि. ०२.०७.२०१२ रोजी त्यांचे राहते घरी चोहोट्टा बाजार ता. अकोट जि. अकोला येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदारांची आई नामे शिला जगतराव वडाळ मयत जगतराव नामेदवराव वडाळ यांची विधवा पत्नी ही सुध्दा दि. ०३. ०२.२०२५ रोजी तिचे राहते घरी चोहोट्टा बाजार ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाली आहे. मयत जगतराव व शिला वडाळ यांना एकुण २ मुले व २ मुली असे एकुण ४ अपत्य आहेत. पैकी अर्जदार क. १ व ४ मुले असुन अर्जदार क. २ व ३ ह्या मुली आहेत. मयत जगतराव व शिला वडाळ यांचे जीवंत असलेले वारस हे अर्जदार क. २ ते ३ हया मुली ४ हे आहेत. मयत जगतराव व शिल्पा वडाळ यांचे अर्जदार क. १ ते ४ हे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांच्या करीता वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या नांवे येण्याकरीता हा अर्ज अर्जदार सर्वानुमते सहमतीने करीत आहेत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वत: वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०३/०७/२०२६ रोजी गाझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक )
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोट, जि. अकोल

# आमदारांच्या धारेवर मजीप्रा; अखेर आर्विकरांच्या नळात स्वच्छ पाणी

## गढूळ पाणीपुरवठ्यावर संताप व्यक्त होताच प्रशासनाला जाग, नगराध्यक्षा व लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्याला यश

**आर्वी/जनमाध्यम**

आर्वी शहरातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून गढूळ पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत असताना, प्रशासन मात्र हातावर हात धरून बसल्याचे चित्र होते. अखेर आ.सुमित वानखेडे यांनी या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत माजीप्रा अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने आणि सत्ताधारी पदाधिकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर माजीप्रा प्रशासनाला खडबडून जाग आली आणि जलशुद्धीकरण केंद्रातील क्लारिफायरसह संपूर्ण यंत्रणेची स्वच्छता करण्यात आली. त्यामुळे शहरातील नागरिकांना आता स्वच्छ पाणीपुरवठा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



माजीप्रामार्फत शहरात पाणीपुरवठा केला जातो. मात्र अनेक भागांत गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी वाढल्यानंतर २६ जून रोजी नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने, उपाध्यक्ष गौरव जाजू, पाणीपुरवठा सभापती अजय कटकमवार, नगरसेवक लवेश गलोले, उषा सोनटक्के, मनोज आगरकर तसेच माजी सभापती प्रकाश गुल्हाने यांनी जाजूवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी माजीप्राच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरात सुरू असलेल्या रस्ते व नाली बांधकामांदरम्यान पाईपलाईनला गळती होऊन त्यातून माती शिरत असल्यामुळे गढूळ पाणीपुरवठा होत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र ज्या भागात कोणतेही बांधकाम सुरू नाही, त्या भागातही गढूळ पाणी का येत आहे, असा प्रश्न नगराध्यक्षा आणि पदाधिकाऱ्यांनी उपस्थित करत प्रशासनाच्या दाव्यावर बोट ठेवले. तसेच सर्व गळती तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्यानंतरही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने ३ जुलै रोजी नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने आणि सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी जलशुद्धीकरण केंद्रातील क्लारिफायर तातडीने रिकामा करून त्यामध्ये गाळ साचला आहे का, याची तपासणी करून संपूर्ण स्वच्छता करण्याचे आदेश दिले.

दरम्यान, आ.सुमित वानखेडे यांनीही या संपूर्ण प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करत माजीप्रा अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर प्रशासनाने तातडीने क्लारिफायर रिकामा करून तपासणी केली असता तो बराच काळ स्वच्छ करण्यात आलेला नसल्याचे उघड झाले. यानंतर जलशुद्धीकरण केंद्रातील क्लारिफायर तसेच पाणीसाठ्याची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली.

या कारवाईमुळे शहरातील गढूळ पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे निर्माण झाली असून आर्वीकरांना स्वच्छ पाणी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अनेक दिवसांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणारे प्रशासन लोकप्रतिनिधींच्या आक्रमक भूमिकेनंतरच खडबडून जागे झाल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

## विचारांची निष्ठा, समाजसेवेचा वारसा

# शालिग्रामजी डेहेने यांच्या आरोग्यासाठी खा.काळेंच्या सदिच्छा

**वर्धा/जनमाध्यम**

राजकारणात पदे, सत्तेचे मोह आणि पक्षांतराच्या वाऱ्यातही ज्यांनी आयुष्यभर विचारांशी प्रामाणिक राहून समाजसेवेचा दीप तेवत ठेवला, अशा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व कुणबी तिरळी समाजाचे आदरणीय ज्येष्ठ नेते शालिग्रामजी डेहेने यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खा.अमर काळे यांनी नागपूर येथील रुग्णालयात जाऊन त्यांची आस्थेवाईक भेट घेतली. या भेटीत केवळ एका ज्येष्ठ नेत्याची विचारपूस झाली नाही, तर एका प्रदीर्घ वैचारिक प्रवासाला आणि निष्ठावंत समाजकारणाला अभिवादन करण्यात आले.

खा. अमर काळे यांनी डेहेने यांच्या प्रकृतीची सविस्तर माहिती डॉक्टरांकडून घेतली. उपचारांची माहिती जाणून घेत त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करून घेतली. त्यांनी शालिग्रामजी डेहेने यांना धीर देत लवकर पूर्णपणे बरे होण्याच्या सदिच्छा व्यक्त केल्या. शालिग्रामजी डेहेने हे कुणबी तिरळी समाजातील अत्यंत आदरणीय आणि निष्ठावंत व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. समाजाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी संघटन, सामाजिक ऐक्य आणि विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने कार्य केले. समाजहिताला प्राधान्य देत त्यांनी अनेक पिढ्यांना एकत्र आणण्याचे मोलाचे कार्य केले आहे. राजकीय जीवनात त्यांनी काँग्रेस कमिटीचे सचिव म्हणून



महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या. सेवादलातून सुरू झालेला त्यांचा प्रवास आजही पक्षनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि तत्त्वनिष्ठ राजकारणाचे प्रतीक मानला जातो. बदलत्या राजकीय परिस्थितीत अनेकांनी भूमिका बदलल्या, मात्र शालिग्रामजी डेहेने यांनी विचारांशी तडजोड न करता काँग्रेसच्या मूल्यांशी अखंड निष्ठा जपली. वयाच्या ८२ व्या वर्षातही त्यांचा सेवाभाव, वैचारिक बांधिलकी आणि समाजाप्रती असलेली आत्मीयता नव्या पिढीतील कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या दीर्घ सामाजिक व राजकीय योगदानाला सलाम करत खासदार अमर काळे यांनी त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना व्यक्त केली. समाजकारणातील अशी निष्ठावंत माणसे निरोगी राहून पुढील पिढीला मार्गदर्शन करत राहावीत, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.



# तूर उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करा

## मनसावळी येथे कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षणास उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोझरी शेकापूर/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान २०२६ ते २७ अंतर्गत मनसावळी येथील ग्रामपंचायत सभागृहात तूर पिकावरील शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेतली.प्रशिक्षण कार्यक्रमात कृषि विज्ञान केंद्र कुटकी येथील शास्त्रज्ञ डॉ. मगरे यांनी तूर बियाणे प्रक्रिया, तूर लागवड तंत्रज्ञान आणि एकात्मिक पीक व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तूर पिकाचे उत्पादन आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले.

अल्लीपूर मंडळाचे कृषी अधिकारी शुभ्रकांत भगत यांनी कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना, अनुदान आणि शेतकरी कल्याणकारी उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन शेती अधिक उत्पादनक्षम करण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाला अल्लीपूर मंडळाचे उप कृषी अधिकारी विनोद पडवे, सहाय्यक कृषी अधिकारी मोहीन शेख, कृषी सेवक निखिल चितोडे, कृषी सेविका यामिनी घुघुसकर, कृषीसखी तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांनी तूर पिकासंदर्भातील विविध प्रश्न उपस्थित केले. तज्ज्ञांनी त्यांचे सविस्तर निरसन करत आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती दिली. या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन उत्पादनवाढीसाठी प्रयत्न करण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

# वृक्षांतून जपला स्मृतींचा श्वास; विजय राठी यांच्या स्मरणार्थ ७३ वृक्षांचे लोकार्पण

**वर्धा/जनमाध्यम**

स्मृती केवळ आठवणीत जिवंत राहत नाहीत, तर त्या समाजोपयोगी कार्यातूनही चिरंतन होतात, याचा प्रत्यय माहेश्वरी समाज वर्धातर्फे आयोजित वृक्षारोपण उपक्रमातून आला. स्मृतिशेष विजय हरिनारायण राठी यांच्या स्मरणार्थ स्थानिक वैकुंठधाम शांतीधाम परिसरात ७३ वृक्षांची लागवड करून त्यांना हरित अभिवादन करण्यात आले. त्यांच्या ७३ वर्षांच्या जीवनप्रवासाचे प्रतीक म्हणून ७३ वृक्ष लावण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी सेवाग्राम येथील डॉ. एस. पी. कलंत्री यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करताना, वृक्ष हेच जीवन आणि वृक्ष हीच स्मृती आहे, असे सांगितले. स्व. विजय राठी यांनी औषधसेवा आणि शुद्ध पाणी व्यवसायाच्या माध्यमातून समाजाची सेवा केली. त्यांच्या स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी वृक्षारोपणासारखा उपक्रम राबविणे हा खऱ्या अर्थाने प्रेरणादायी उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. कलंत्री यांनी वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व स्पष्ट करताना



ऑक्सिजन निर्मिती, भूजल संवर्धन, पर्यावरण संतुलन आणि भावी पिढ्यांमध्ये पर्यावरणप्रेमाचे संस्कार रुजविण्याच्या दृष्टीने प्रत्येकाने वृक्षारोपणाचा संकल्प करावा, असे आवाहन केले.

यावेळी ज्येष्ठ चार्टर्ड अकाउंटंट जगदीश चांडक यांनी शांतीधाम परिसराच्या देखभालीसाठी अधिक स्वयंसेवक पुढे येण्याची गरज व्यक्त केली. माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सुनीता राठी यांनी, जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत दरवर्षी वृक्षारोपण करून धरतीचे सौंदर्य वाढवत राहिले पाहिजे, असे सांगितले.

माहेश्वरी नवयुवक मंडळाचे अध्यक्ष ऋषभ जाजू यांनीही पर्यावरण संवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली.कार्यक्रमाचे संचालन माहेश्वरी मंडळाचे समन्वयक राजकुमार जाजू यांनी केले. यावेळी रूपा राठी, छाया राठी, संजय राठी, आनंद राठी, अमोल राठी, राहुल राठी, रोहित राठी, नवयुवक मंडळाचे सचिव अमित लड्डू, अमित मुनोत यांच्यासह माहेश्वरी मंडळ, नवयुवक मंडळ आणि महिला मंडळाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.समाजोपयोगी कार्यातून स्मृती जपण्याचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या मनाला स्पर्श करून गेला.

# हितांशी सुपर अबॅकस अकॅडमीचा गौरव, हितांशी येलोरे राष्ट्रीय स्पर्धेत पाचवी

## संचालिका किरण लटारे यांना 'महाराष्ट्र ऑफ द इयर-२०२६' पुरस्कार

**वर्धा/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार आणि स्पर्धात्मक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने सुरू झालेल्या येळीकेळी येथील हितांशी सुपर अबॅकस अकॅडमीने राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एमजीएम विद्यापीठ, संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल अबॅकस ऑलिम्पियाड-२०२६ मध्ये अकॅडमीने उत्कृष्ट कामगिरी करत येळाकेळीसह संपूर्ण परिसराचे नाव उज्ज्वल केले.

स्पर्धेदरम्यान अकॅडमीच्या संचालिका किरण लटारे यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत 'महाराष्ट्र ऑफ द इयर-२०२६' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. ग्रामीण भागात एकल महिला म्हणून अबॅकस अकॅडमीची यशस्वी उभारणी करून विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक विकासाची चळवळ उभी करणाऱ्या त्यांच्या कार्याला या पुरस्कारामुळे मोठी दाद मिळाली आहे. याच कार्यक्रमात अकॅडमीची विद्यार्थिनी व किरण लटारे यांची कन्या हितांशी येलोरे हिला 'प्राऊड ऑफ स्टुडंट' हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच नॅशनल अबॅकस ऑलिम्पियाडच्या लेव्हल-१ गटात तिने उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर पाचवा क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे हितांशी सुपर अबॅकस अकॅडमीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



कार्यक्रमाला एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, प्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. मेघना किर्ती, आयटी उद्योजक विनोद जैन तसेच सुपर अबॅकसचे मॅनेजिंग डायरेक्टर मनीष महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

अल्पावधीतच गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण बौद्धिक विकासावर भर आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनाच्या बळावर हितांशी सुपर अबॅकस अकॅडमीने राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठावर यश मिळवून देण्याचे कार्य करणाऱ्या या अकॅडमीच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, येळीकेळी गावासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

# बस स्थानकातील महिलेची सोन्याची पोत लंपास

**वर्धा-** स्थानिक बस स्थानकावरील गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेच्या पर्समधील सोन्याची पोत लंपास केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.यवतमाळ येथील वनिता चिरडे (५५) या पतीसमवेत बसने जाण्यासाठी वर्धा बस स्थानकावर आल्या होत्या. यवतमाळकडे जाणारी बस फलाटावर लागताच दोघेही बसमध्ये चढत असताना मोठी गर्दी होती.

त्यामुळे त्यांनी दुसऱ्या बसने जाण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी वनिता चिरडे यांनी आपल्या पर्सची पाहणी केली असता ती उघडी असल्याचे दिसून आले. तपासणी केली असता पर्समधील सोन्याची पोत चोरीला गेल्याचे लक्षात आले. घटनेची तक्रार शहर पोलिसांत दाखल करण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याचा शोध सुरू केला आहे.

# अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांचा दणका

**समुद्रपूर**-अवैध रेती वाहतुकीविरोधात समुद्रपूर पोलिसांनी धडक कारवाई करत टिप्परसह सुमारे २० लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.पोलिस गस्तीवर असताना जाम-रेणकापूर मार्गावर रेतीची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार झिनिंग फॅक्टरीजवळ नाकेबंदी करण्यात आली. यावेळी एमएच-४०-वाई-५४५१ क्रमांकाचा टिप्पर अडवून तपासणी केली असता त्यामध्ये रेतीचा साठा आढळून आला. चालक ज्ञानेश्वर खापने (३२, रा. जाम) याच्याकडे रेती वाहतुकीची रॉयल्टी किंवा आवश्यक कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिसांनी टिप्पर व रेती असा एकूण २०.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.

# टीईटी परीक्षेचा मोठा निर्णय आता ऑनलाइनच परीक्षा

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील लाखो शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटी आता ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. २८ जून रोजी होणारी परीक्षा रद्द झाल्यानंतर राज्य परीक्षा परिषदेने हा निर्णय घेतला असून परीक्षा शक्य तितक्या लवकर घेण्याचे निर्देश आयबीपीएस संस्थेला देण्यात आले आहेत. त्यामुळे उमेदवारांच्या प्रतीक्षेला अखेर दिशा मिळाली आहे.

राज्य परीक्षा परिषदेच्या माहितीनुसार यंदाच्या टीईटी परीक्षेसाठी पेपर क्रमांक १ साठी २ लाख ५८ हजार ६१ तर पेपर क्रमांक २ साठी ३ लाख ४२ हजार ६४ असे एकूण ६ लाख १२५ उमेदवारांनी अर्ज केले होते. राज्यभरातील १७२९ परीक्षा केंद्रांवर सकाळ व दुपार अशा दोन सत्रांत परीक्षा होणार होती. मात्र काही कारणांमुळे ही परीक्षा रद्द करण्यात आली.

दरम्यान २०२३ पासून टीईटी ऑनलाइन पद्धतीने घेण्यासाठी राज्य परीक्षा परिषद आयबीपीएसकडे सातत्याने पाठपुरावा करत होती. मात्र गेली तीन वर्षे परीक्षा ऑफलाइनच झाली. आता अखेर ऑनलाइन परीक्षेचा निर्णय प्रत्यक्षात येत असल्याने परीक्षा व्यवस्थापन अधिक सुरक्षित पारदर्शक आणि गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवेत असलेल्या तसेच भविष्यात सेवेत येणाऱ्या शिक्षकांना २०२८ पर्यंत टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात वर्षातून किमान दोन वेळा टीईटी परीक्षा घेण्याचा प्रस्ताव असून पुढील सर्व परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच घेण्याचा शासनाचा मानस आहे.

ऑनलाइन प्रणालीमुळे परीक्षा प्रक्रियेत वेग आणि पारदर्शकता वाढणार असली तरी ग्रामीण भागातील उमेदवारांना तांत्रिक सुविधा आणि सरावाची पुरेशी संधी मिळणार का हा प्रश्नही उपस्थित होत आहे. लाखो उमेदवारांची प्रतीक्षा संपवणारी ही परीक्षा नेमकी कधी होणार याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# शैक्षणिक, संशोधन क्षेत्रातील योगदानाचा गौरव

# डॉ. संदीप काळे यांना राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार

**सेलू/जनमाध्यम**

शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक आणि संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे यशवंत महाविद्यालय, सेलूचे कार्यकारी प्राचार्य तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप भिमराव काळे यांना 'राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सोजाई आदिवासी महिला विकास फाऊंडेशनतर्फे आळंदी येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात विवेकवादी विचारवंत, ज्येष्ठ साहित्यिक तथा ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. शैलेंद्र भणगे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुनिता धर्मराव, कवी सीताराम नरके, ज्येष्ठ संपादक माधवराव यादव, संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत चव्हाण तसेच सचिव ॲड. जयश्री सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. संदीप काळे यांनी शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी अनेक संदर्भग्रंथ, अभ्यासक्रम पूरक पुस्तके व संपादित ग्रंथ प्रकाशित केले असून नामांकित संशोधन पत्रिकांमध्ये शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. सामाजिक आणि समकालीन विषयांवर वृत्तपत्रांमध्ये १५० हून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय चर्चासत्रे, परिषदांचे यशस्वी आयोजन करण्याबरोबरच त्यांच्या नावावर दोन पेटंट आणि एका कॉपीराइटची भारत सरकारकडून नोंद झाली आहे.

यापूर्वीही त्यांच्या कार्याची दखल घेत विविध नामांकित संस्थांनी त्यांना चार आंतरराष्ट्रीय, अठरा राष्ट्रीय आणि नऊ राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविले आहे. ते महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद, विदर्भ राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद, नागपूरचे मागील दहा वर्षांपासून कार्यकारिणी सदस्य असून इंडियन पॉलिटिकल सायन्स असोसिएशन आणि इंडियन असोसिएशन फॉर वुमेन्स स्टडीज, दिल्लीचे आजीव सदस्य आहेत. राज्यशास्त्र विषयाच्या अध्यापनाचा त्यांना अठरा वर्षांचा अनुभव असून गेल्या तीन वर्षांपासून ते यशवंत महाविद्यालय, सेलू येथे कार्यकारी प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत.पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. काळे यांनी हा सन्मान आपल्या कार्याला मिळालेली मोठी प्रेरणा असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारणे हा आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या पुरस्कारामुळे शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात अधिक सृजनशील व रचनात्मक कार्य करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २२०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# पारधी व फासे पारधी बांधवांसाठी 'पारधी पॅकेज' अंतर्गत घरकुल योजना

## -२४ जुलैपर्यंत मोफत अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी अंतर्गत पारधी समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी 'पारधी पॅकेज योजना सन २०२५-२६' जाहीर करण्यात आली असून, या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून विनामूल्य अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या योजनेचा लाभ केवळ अनुसूचित जमातीमधील पारधी व फासे पारधी समाजातील घटकांनाच घेता येणार आहे. या विशेष पॅकेजअंतर्गत प्रामुख्याने शहरी तसेच ग्रामीण भागातील पारधी समाजाच्या गरजू लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे, यासाठी घरकुल बांधकामाकरिता विशेष अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी अमरावती जिल्ह्यातील विविध तालुक्यांच्या भौगोलिक रचनेनुसार अर्ज वाटप आणि स्वीकृती केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

धारणी, चिखलदरा, अंजनगाव सुर्जी व अचलपूर तालुक्यातील लाभार्थ्यांनी धारणी येथील प्रकल्प अधिकारी कार्यालयात संपर्क साधायचा आहे. तसेच नांदगाव खंडेश्वर, भातकुली, अमरावती, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व दर्यापूर तालुक्यातील नागरिकांनी अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती यांच्या कार्यालयात आणि मोर्शी, वरुड, तिवसा व चांदूर बाजार तालुक्यातील लाभार्थ्यांनी धारणी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या मोर्शी येथील उप कार्यालयात आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. या योजनेचे अर्ज पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २४ जुलै २०२६ ही राहणार आहे.

योजनेच्या पारदर्शकतेसाठी प्राप्त सर्व अर्जांची प्रथम संगणकीय यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर सर्व कागदपत्रांची तपासणी करून पात्र व अपात्र उमेदवारांची स्वतंत्र यादी जाहीर केली जाईल व अंतिम निवड 'ईश्वर चिठ्ठी' (लकी ड्रॉ) पद्धतीने होईल.

लाभार्थी निवडताना समाजातील सर्वात गरजू घटकांचा विचार केला जाणार असून यामध्ये दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) लाभार्थी, दिव्यांग व्यक्ती आणि विधवा महिलांना प्रामुख्याने प्रथम प्राधान्य दिले जाईल. या योजनेच्या अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी संबंधित कार्यालयातील विकास शाखेशी किंवा ०७२२६-२२४२१७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी कळविले आहे.

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **श्री विशाल बाबाराव पुंड तसेच इतर लोकांनी** खालील मालमत्तेसंबंधी विदयमान १० वे सह दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती येथे विशेष दिवाणी दावा क्रमांक १२१/२०२५ प्रतिवादी **श्री रमेश तनीराम गुप्ता आणि श्री सतीश मोतीरामजी गुप्ता व इतर** यांचे विरुध्द घोषणे करिता तसेच मनाई हुकुमा करता दावा दाखल केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे ः-

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे-रेवसा, प्रगणे-नांदगाव पेठ, तालुका व जिल्हा अमरावती येथील शेत गट नंबर १९५ या गट नंबर पैकी सर्वे नंबर ७२/२-अ, ७२/४ आणि ७२/४/३/१ एकूण क्षेत्रफळ १ हेक्टर ३० आर पैकी ० हेक्टर ८२ आर शेती व त्यानंतर शेत अकृषक होऊन यामध्ये एकूण ३० प्लॉट टाकण्यात आलेले आहेत या ३० पैकी १३ प्लॉट आमच्या पक्षकारांनी विकत घेतलेले असून त्यांच्या मालकीत व ताब्यात आहे. तसेच इतर प्लॉट इतर खरेदीदारांच्या ताब्यात व मालकीत आहे. या लेआउट पैकी १३ प्लॉट हा दाव्याचा विषय आहे. ज्या शेतावर हे प्लॉट पडलेले आहेत त्या शेताच्या चर्तुःसिमा खालीलप्रमाणे ः-

पूर्वेस - भीमराव ओमेकर यांचे शेत
पश्चिमेस - रेवसा ते अमरावती रोड
उत्तरेस - मधुकरराव पारिसे यांचे शेत
दक्षिणेस - विलास भोंडेकर यांचे शेत

याला यानंतर सदर **शेती** असे संबोधले आहे.

विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अमरावती यांनी दिनांक ११/०८/२०२५ रोजी या दाव्यामध्ये तात्पुरता मनाई हुकमाचा आदेश केलेला आहे. या तात्पुरता मनाई हुकुमाच्या आदेश विरुध्द प्रतिवादी रमेश आणि सतीश यांनी विदयमान जिल्हा न्यायालय अमरावती येथे दिवाणी अपिल क्रमांक ४०/२०२५ दाखल केला होता. सदर अपिल हे जिल्हा न्यायालय, अमरावती यांनी दिनांक १५/०६/२०२६ रोजी खारीज केलेले आहे. या अपीलामध्ये विद्यमान जिल्हा न्यायाधिश, अमरावती यांनी विद्यमान सह दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती न्यायालयाने दिलेला मनाई हुकुमाचा दिनांक ११/०८/२०२५ रोजीचा निकाल कायम ठेवलेला आहे व प्रतिवादी रमेश आणि सतीश यांना या मालमत्ता मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचा त्रयस्त व्यक्तीचा हक्क व अधिकार कोणत्याही कागदपत्राव्दारे करण्यास मनाई केलेली असून विद्यमान न्यायालय यांनी वादी विशाल व इतर यांचा ताबा असल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे या सदर मालमत्तेसंबंधी प्रतिवादी रमेश गुप्ता तसेच सतिश गुप्ता यांना कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्यास मनाई केलेली आहे. करिता सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, प्रतिवादी रमेश व सतीश यांच्यासोबत कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्रीचा तसेच कर्ज गहाण व बक्षीस पत्राचा किंवा इतर कोणत्याही प्रकारे मालमत्तेवर बोजा होईल असा व्यवहार करु नये. असा कोणताही व्यवहार झाल्यास तो कोर्टाचा अपमान (Contempt of Court) समजण्यात येईल व सदर्हू व्यवहार हा Lis pendence च्या आधीन राहील. रमेश व सतीश गुप्ता यांनी केलेला कोणताही व्यवहार आमच्या पक्षकारास बंधनकारक राहणार नाही.

तरी सर्वानी नोंद घ्यावी.

**दिनांक ०६/०७/२०२६**
**अमरावती**

**सही /-**
**ॲड.दीपक मा.आंबलकर**
**मो.- ७०२०३८८८१**

---

**DNYANMATA HIGH SCHOOL, AMRAVATI**
(Managed by Amravati Roman Catholic Diocesan Trust)
Amravati Camp, (PO) Amravati. Pin-444602
Office : 0721-2663263 **Board Index No.02.01.016**
Email : dhsamravati@gmail.com Pay Unit Code No.37
**UDISE Code : 07071505506**

## DNYANMATA HIGH SCHOOL, AMRAVATI

**Run by**
**Amravati Roman Catholic Diocesan Trust**

## पाहिजे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इयत्ता ५ वी सर्व विषय करीता | शैक्षणिक पात्रता **H.S.C. D.Ed. (Science)** | **TET/ CTET** | **Medium English** | **Post 01** |
| इयत्ता ५ वी सर्व विषय करीता | शैक्षणिक पात्रता **H.S.C.D.Ed.** | **TET/ CTET** | **Medium English** | **Post 01** |
| इयत्ता ६ ते ८ वी इंग्रजी व भूगोल करीता | शैक्षणिक पात्रता **B.A. B.Ed.** | **TET/ CTET** | **Medium English** | **Post 01** |

**टीप - १)** संस्था धार्मिक अल्पसंख्यांक व १०० टक्के अनुदानित असल्यामुळे शासनाच्या नियमाच्या अधीन राहून पद भरण्यात येईल. २) वरील पदाची नियुक्ती मा.शिक्षणाधिकारी माध्यमिक, जि.प.अमरावती यांचे मान्यतेची अट राहील. ३) वयोमर्यादा, वेतनश्रेणी/मानधन शासन नियमानुसार शासनाने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे राहील. ४) वरील उमेदवारास इंग्रजी लिहीता व बोलता येणे आवश्यक आहे. तसेच संगणक **MS-CIT** परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ५) इच्छुक उमेदवाराने स्वहस्ताक्षरात अर्ज, बायोडाटा, कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रत व पासपोर्ट साईज फोटो दि.२२ जुलै २०२६ ला शाळेच्या कार्यालयात सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत स्वखर्चाने सादर करावे.

**Head Master**
**Dnyanmata High School**
**Amravati Camp**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०७५/२०२६
**शारदा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२७.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Sharda Bandurao Sathwane, Age 43 Yrs. Occu.: Household
2. Aditya Bandu Sathawane, Age 21 Yrs. Occu.: Labour
3. Sumit Bandubhau Sathwane, Age 20 Yrs. Occu.: Education
All R/o At Post Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बंडुभाऊ नारायणराव साठवणे** हे दिनांक 18.10.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शारदा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शारदा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २९९
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.११८७/२०२६**
**श्री मोहम्मद इलीयाज अधिक एक विरुध्द निरंक**
**पुढील ता.०४.०८.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
1. **Mohammad Ilyas Mohammad Ismail**
Age 64 Yrs. Occu.: labour,
R/o. Near Gani Bhai Rangari, Karkhana, Ansar Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati- 444601
2. **Mumtaj Abdul Shaoor**
Age 63 Yrs. Occu.: Household
R/o. No. D6/11A.P. Arsau Street, Nehru Nagar, Erukkacherry, Kondungaiypur, Chennai, (T.N.)-60018

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रजिया बानो मोहम्मद इस्माईल** हया **दि.२६.०५.२०११** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **मोहम्मद इलीयाज अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मोहम्मद इलीयाज अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**नमुना ९**
**(नियम १४ व २४ पहा )**
**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ यांच्या कलम १५० (२) अन्वये सुचना**
**ज्याअर्थी तालुका ः- अमरावती** **गाव ः- अकोली भाग २**
**गावंच्या फेरफाराच्या नोंदवहीत खालील विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे.**

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक किंवा तारीख | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भुमापन व उपविभाग क्रमांक |
|---|---|---|
| ३८२५७ | नोंदीचा प्रकार ः- खरेदी<br>माहिती मिळालेचा दिनांक ः- ०१/०७/२०२६<br>फेरफाराचा दिनांक ः-०१/०७/२०२६<br>लिहून देणार ः-<br>प्रमोद फकीरचंदजी अग्रवाल, रा.अकोली भाग २(खाता क्रमांक २२४३) यांचे गट/सर्वे क्रमांक५९/१/ब/१७ बी<br>बिगरशेती क्षेत्र १.४०७० आर चौ.मी.पैकी बिगरशेती क्षेत्र १.४०७० आर चौ.मी. हे त्यांनी<br>लिहून घेणार ः<br>पंजाब जयराम खंडारे,(खाता क्रमांक ६४५०) गट/सर्वे क्रमांक ५९/१/ब/१७ बी बिगरशेती क्षेत्र १.४०७० आर चौ.मी.यांनी दुय्यम निबंधक अमरावती-२ जिल्हा अमरावती यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक ७८९ दिनांक २३/०२/२०१२ प्रमाणे रक्कम रुपये १०५४५० घेऊन खरेदी दिली. सबब खरेदी घेणा-याचे नांव गाव नमुना नं. ७/१२ वर दाखल केले. | ५९/१/ब/१७/बी |

आणि ज्याअर्थी, तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन/फेरफाराच्या नोदवहीवरुन मला वाटते, आणि ज्यार्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तीक कारण आहे.
त्याता आती मी, कविता रमेश भोंबे
ज्या ठिकाणी वरील उपरोक्त जमीन आहे त्या गावचा ग्राम महसुल अधिकारी याव्दारे उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सुचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हांस फर्मावित आहे. ग्राम महसुल अधिकारी अकोली भाग २ यांच्याकडे उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास, उक्त नोंदीस तुमची संमती आहे, असे गुहीत धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण-अकोली भाग २
दिनांक - ०१/०७/२०२६

**ग्राम महसुल अधिकारी**
**अकोली भाग-२, साझा क्र. ०६**
**ता.जि.अमरावती**
**दि.०१/०७/२०२६**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११८२/२०२६
**श्री.सुनिल अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.०४.०८.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
1. Sunil S/o Vasantrao Wathodkar, Aadhar No.671561036101
Age 55 Yrs. Occu.: Agriculturist
R/o Near Oswal Bhavan, Jahrdan Peth, Amravati.
2. Manisha W/o Shripad Saraf, Aadhar No.640393205927
Age 62 Yrs. Occu.: Household
R/o Saraf Colony, Nashik-Pune Road, At Po.Sangamner, Tq.Sangamner, Dist.Ahmadnagar-422605
3. Vrunda W/o Vijay Uapasni, Aadhar No.763185736314
Age 58 Yrs. Occu.: Household
4. Gauri W/o Nilesh Phade, Aadhar No.858550979419
Age 50 Yrs. Occu.: Household
R/o Plot No.48, Peth Road, Shivaji Nagar, Nashik-422004

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **वसंत पुरुषोत्तम वाठोडकर** हे दिनांक 01.03.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **रजनी वसंत वाठोडकर,** ही १३.०७.२०२२ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली आहे. अर्जदार **सुनिल अधिक पाच विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिल अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक **०२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**महाराष्ट्र शासन**
**धर्मादाय सह आयुक्त कार्यालय**
**अमरावती विभाग, अमरावती**

**पत्ता- म्हाडा भवन, दुसरा माळा, तात्या टोपे नगर, मालटेकडीजवळ अमरावती-४४४६०२**
जा.क्र.धसआ/अधि/३६४८/२०२६ दिनांक ११.०६.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्ज क.०२४/कलम ३६(१)(क)/२०२६**
**शाह अंजुमन सोशल वेलफेअर एज्युकेशन सोसायटी, अकोट,**
**ता.अकोट, जि.अकोला**
**रजि.नं.एफ-६१०२/अकोला**

वरील अर्जदाराने वरील नमुद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे केलेली आहे.

**मौजा लोणी, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती या परिक्षेत्रातील सर्व्हे नं.२६/३, भूमापन क.४६ एकुण क्षेत्रफळ ०.४७ हेक्टर जमीन.** त्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - सरकारी रस्ता, पश्चिमेस - रामहरी गोदे यांचे शेत, उत्तरेस - नाला (व नंतर विलास कुरळकर यांचे शेत), दक्षिणेस - संजय नारायणराव बोबडे यांचे शेत

त्याअर्थी या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदरहु मालमत्तेवरील विक्रीबाबत कोणालाही काही आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकीलामार्फत खालील सही करणार यांचेसमोर दिलेल्या पत्त्यावर दाखल करावे. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ११.०६.२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी व धर्मादाय सह आयुक्तांच्या शिक्क्यानिशी ही नोटीस दिली.

शिक्का

**प्र.अधीक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**

---

## वि.आर.आर.खामतकर, ५ वे न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०५)

### गैरअर्जदारास नोटीस

**डी.व्ही.प्र.८७/२०२४**
**वैशाली वि राजेश**
**ने.ता.२०.०७.२०२६**

**बनाम - गैरअर्जदार राजेश देविदास इंगळे रा.व्दारा गायकवाड मॅडम पंढरपुर, ता.जि.पंढरपुर** ज्याअर्थी तुमच्या विरुध्द अर्जदार **वैशाली राजेश इंगळे C/o हिंमतराव पळसपगार R/o विद्या कॉलनी, फारेस्ट कॉटर्स, कॅम्प, अमरावती** यांनी कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंधक अधिनियम नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअथी, तुम्ही स्वतः **दिनांक २०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात हजर राहून आपले उत्तर न चुकता सादर करावे.

शिक्का

आदेशानुसार,
सही/-
लिपिक
(कोर्ट नं.०५), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१२४१/२०२६
**विमल व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.११.०८.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
1. Vimal Krushnrao Deve, Age 70 Yrs. Occu.: Household
R/o. Ward No. 4, Shirala, Tq. & Dist. Amravati
2. Pramodrao Krushnrao Deve, Age 40 Yrs. Occu.: Labour
R/o. Ward no. 4, Shirala, Tq. & Dist. Amravati
3. Pushapabai Sureshrao Shirbhate,
Age --- Yrs. Occu.: Household
R/o. Jabreshor Chouk Walgaon, Tq. & Dist. Amravati
4. Kalpana Vaibhavrao Shingane, Age 42 Yrs. Occu.: Household
R/o. Ward No.3, Lahan Walgaon,
Yavatmal, Tq. & Dist. Yavatmal

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कृष्णराव पुंजाजी देवे** हे दिनांक ०४.०९.२०२२ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **विमल व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विमल व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२५७/२०२६
**माया व १४**.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Maya Vasant Wase, Aged 47 Yrs.Occu.: Household
R/o Juni Vasti, Warud, Wardha

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः**
1. Ranjana Anil Kawade, Age 53 Yrs. Occu.: Household
2. Dikshant Anil Kawade, Age 29 Yrs. Occu.: Service
3. Gitanshu Anil Kawade, Age 24 Yrs. Occu.: Service
No.1 to 3 R/o Prashant Nagar, Near Hanuman Mandir, Amravati.
4. Drushti Ashok Khonde, Age 27 Yrs. Occu.: Service
R/o Bldg.No.13, Flat No.22, Kanchana Building K.C.Road, Near Lilawati Hospital Bandra Reclamation Bandra West-400050

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दुर्गाशंकर बाजीराव कवाडे** हे दिनांक 27.10.2017 रोजी Amravati येथे मयत झाले. अर्जदार **माया विरुध्द रंजना व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **माया विरुध्द रंजना व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक **०२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२४६/२०२६
**कल्पना व दोन -वि- निरंक**
पुढील ता.०७.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
१. श्रीमती कल्पना गजानन देशमुख, वय ५१ वर्षे व्यवसाय - मजुरी
२. अनुप गजानन देशमुख, वय ३३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. संकेत गजानन देशमुख, वय २८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व रा.दीपक नगर, रहाटगांव प्लॉट, पो.शिवाजी नगर, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गजानन नामदेवराव देशमुख** हे दिनांक 28.04.2026रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **श्रीमती कल्पना गजानन देशमुख अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती कल्पना गजानन देशमुख अधिक दोन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**नोटीस देणार - सरफराज सलाहोद्दीन काझी अजीजोद्दीन**
Sarfaraz Salahuddin Quazi Azizuddin
**वय ६५ वर्षे, धंदा - वैद्यकीय**
**जामा मस्जिद जवळ यासीनपुरा, दर्यापूर,**
**ता.दर्यापूर, जि.अमरावती-४४४८०३**

**तर्फे - ॲड.डी.बी.अग्रवाल**
**मुर्तिजापूर रोड, गणेशपूर**
**ता.दर्यापूर, जि.अमरावती**

**मी खालील** सही करणार जाहीर नोटीस देतो की,

१. आमचे उपरोक्त पक्षकार हे डॉक्टर असून त्यांचे नांव **सरफराज सलाहोद्दीन काझी अजीजोद्दीन** Sarfaraz Salahuddin Quazi Azizuddin असे आहे. हे नांव त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, शाळेचे टी.सी.वर नमुद आहे. परंतु महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांनी पाठविलेल्या प्रमाणपत्रात **काझी सरफराज सलाहोद्दीन अजीजोद्दीन,** Quazi Sarfaraz Salahuddin Azizuddin असे दर्शविण्यात आले आहे. त्यांचे प्रोटोकॉल नुसार अडनांव हे समोर घ्यावे लागते. म्हणून **सरफराज सलाहोद्दीन काझी अजीजोद्दीन** Sarfaraz Salahuddin Azizuddin चे जागी काझी सरफराज सलाहोद्दीन अजीजोद्दीन Quazi Sarfaraz Salahuddin Azizuddin असे दर्शविण्यात आले आहे. ही दोन्ही नांवे एकाच व्यक्तिची असून बोर्डाच्या नियमानुसार काझी अडनांव समोर दर्शविले आहे. या नावाबाबत कोणाला काही आक्षेप असल्यास खालील पत्त्यावर कळवावे.

करीता जाहीर नोटीस दिली आहे.

(ॲड.डी.बी.अग्रवाल, गणेशपुर)
मो.७५८८०८५२०१

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१२०६/२०२६**
**श्रीमती रंजना अधिक तीन विरुध्द निरंक**
**पुढील ता.०४.०८.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार ः**
1. **Smt. Ranjana Anil Kavatkar,** Age 53 Yrs. Occu.: Household
R/o. Near Nilesh Medical, Bhaji Bazar, Amravati
2. **Gaurav Anil Kavatkar,** Age 27 Yrs. Occu.: Private Job
R/o. Brahman Wadi, Bhaji Bazar, Amravati
3. **Piyush Anil Kavatkar,** Age 24 Yrs. Occu.: Labour
Both R/o Parvati Nagar No.2, Near Mahatma fule College, Amravati, Tq. & Dist. Amravati
4. **Smt. Sumitra Namdevrao Kavatkar,**
Age 80 Yrs. Occu.: Household
R/o W/o. Namdevrao Kavatkar, Wathoda Bk. Amravati Dabhada, Maharashtra- 444709

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अनिल नामदेवराव कवटकार** हे दि.१८.१२.२०१८ रोजी अमरावती , ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार रंजना अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती रंजना अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२३.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, नामे **सौ.निता ओंकारराव कवाने, रा.कठोरा बु.अमरावती** यांनी ईक्वीटास स्मॉल फायनांन्स बॅकेकडून रुपये ३०,००,०००/- (अक्षरी रुपये तीस लाख फक्त) लोन घेतलेले आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन ः-**

प्लॉट नं.६ब **(Plot No. 51/2/6/ब)** याचे एकुण क्षेत्रफळ १७५५.९२ चौ.फुट, मौजे- कठोरा बु, ता.जि. अमरावती

पुर्वेस - ९ मीटर अरुंद रोड
पश्चिम - प्लॉट नं. ६ अ
उत्तर - दुसरे लेआउट सर्वे नं. ५१/१, ५१/१/अ
दक्षिण - खाली प्लॉट व रोड

सदर्हू वरील वर्णनाचा व चर्तुसिमेवरील सदर मिळकत संबंधी, इतर कोणाचाही कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोझा, गहाण व इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्या संबंधी नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०३ (तीन) दिवसाच्या आंत व लवकरात लवकर लेखी हस्तक्षेप/आक्षेप कागदपत्रांसह नोंदवावा अन्यथा त्या संबंधी कुठलीही हरकत नसल्याचे गृहित धरण्यात येईल. त्यानंतर कोणाचा कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी, करिता ही जाहीर नोटीस

दिनांक ०६/०७/२०२६
अमरावती

**आपली**
**निता ओ.कवाने**

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती,
अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 20/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **शिव मंदिर आनंद नगर मोर्शी रोड प्रल्हादपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.सुनील नारायण वानखडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत** - **निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - गाव प्रल्हादपूर ग्रामपंचायत शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील मालमत्ता क.२४०८ अ.नं.२४०८ वार्ड नं.२ यावर आरसीसी पध्दतीने बांधलेली पक्की ईमारत जागेची २० X १५ = ३०० चौ.फुट बांधकाम एकुण क्षेत्रफळ २७१३६ चौ.फुट (२४९४.०५ चौ.मी.)

**स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत रु.५,१५,०१०.५१/- (पाच लाख पंधरा हजार दहा रुपये)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२९.०६.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२४२/२०२६
**श्रीमती पुष्पा आधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.०६.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Smt.Pushpa Gulabrao Masodkar, Aged about 62 Yrs.Occu.: Household
2. Snehal Kamlesh Mahajan, Aged about 38 Yrs.Occu.: Housewife
3. Shilpa Avinash Chandanshe, Aged about 36 Yrs.Occu.: Housewife
4. Smt.Manjulabai Pandurangji Masodkar,
Aged about 90 Yrs.Occu.: Housewife
All 1 to 4 R/o Near Pratiksha Mess, Godavari Market Road, Gadge Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati
5. Anjali Gulabrao Masodkar, Aged about 33 Yrs.Occu.: Housewife
R/o Flat No.B-1803, Supreme Estia, Pan Card Club Road, Baner, Dist.Pune

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Gulab Pandurangji Masodkar हे दिनांक 05.11.2025 रोजी Pune येथे मयत झाले. अर्जदार Smt.Pushpa Gulabrao Masodkar + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Pushpa Gulabrao Masodkar + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२२०/२०२६
**शुभांगी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०६.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
१. शुभांगी आशिष शेळके, वय ३९ वर्षे व्यवसाय - घरकाम
२. अंश आशिष शेळके, वय १४ वर्षे, व्यवसाय - निरंक
३. अंशिका आशिष शेळके, वय ०७ वर्षे, व्यवसाय - निरंक
४. शांता अशोक शेळके, वय ६२ वर्षे, व्यवसाय - निरंक
सर्व रा.राजुरा, पो.वडगांव माहुरे, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **आशिष अशोकराव शेळके** हे दिनांक 19.10.2021रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शुभांगी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शुभांगी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## संक्षिप्त



### कृषी कार्यालयात संत श्री गुलाबराव महाराज जयंती साजरी

**चांदूरबाजार**-महाराष्ट्र शासनाने प्रज्ञा चक्षु संती श्री.गुलाबराव महाराज यांची जयंती, शासकीय व प्रशासकीय स्तरावर साजरी करण्याचा निर्णय घेतला.त्या अनुषंगाने स्थानिक तालुका कृषी कार्यालयात, संत श्री गुलाबराव महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. श्री महाराजांची महाराजांची जयंती कृषी विभागात साजरी होणे.याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.कारण श्री महाराजांनी त्या काळात शेतीचे महत्व व शेतकऱ्यांसाठी शेती मार्गदर्शन आपल्या संत साहित्यातून केले आहे. संत श्री गुलाबराव महाराजांच्या या कृषी विषयक साहित्याचा अभ्यास करून, कृषी विभागाने अभ्यास करून श्री महाराजांचे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोचवणे गरजेचे आहे.कारण शेतीतील विज्ञान व तंत्रज्ञानाला, शेती विषयक संत विचारांचा अध्यात्मिक आधार मिळाला तर कृषी क्षेत्रात क्रांती घडून येऊ शकते.म्हणूनच कृषी कार्यालयात संत श्री गुलाबराव महाराज यांची, जयंती साजरी होण्यास विशेष महत्त्व आहे.तसेच संत श्री गुलाबराव महाराज यांची जयंती शासनस्तरावर साजरी करण्याच्या, शासनाच्या या निर्णयाला तालुक्य प्रचंड प्रतिसाद मिळाला.तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये, शाळा व महाविद्यालये इत्यादी ठिकाणी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

### अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

**परतवाडा**-येथील खरपी रोडवरील कैकाडीपुरा चौकात पोलिसांनी कारवाई करत अवैधरित्या रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर व ट्रॉली जप्त केली. कारवाईतट्रक्टरची ट्रॉली ची पाहनी केली असता ट्रॅक्टरमध्ये निळ्या रंगाचा मुंडा फार्मटक ४५ कंपनीचा एमएच २७ एलल ६८५१ क्रमांकाचा ट्रक्टर आणि त्यास विनाकमांकाची निळ्या रंगाची हायड्रोलीक टॉली जोडलेली ट्रक्टर सह ट्रॉली कि. अंदांजे ५,००,००० रु.आणि सदर टॉलीमध्ये अदांजे ०१ ब्रास रेती कि.अ.७,००० रू. एकुन ५.०७ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून चालकासह संबंधितांविरुद्ध कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

# जिल्ह्यात पेरणीला वेग, आतापर्यंत ३ लाख ४३ हजार हेक्टरवर पेरणी

## कापसाला पहिली पसंती, सोयाबीन दुसऱ्या क्रमांकावर

**अमरावती/का.प्र.**

जून महिन्यात अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे रखडलेली खरीप हंगामातील पेरणी आता गेल्या काही दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे वेगाने सुरू झाली आहे. आर्द्र नक्षत्रातील पावसाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून अमरावती जिल्ह्यात आतापर्यंत एकूण खरीप क्षेत्रापैकी सुमारे ५० टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. यंदाही शेतकऱ्यांचा सर्वाधिक कल कापूस लागवडीकडेच असल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.जिल्ह्यात सासरी ६ लाख ८२ हजार ९२ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड केली जाते. त्यापैकी आतापर्यंत ३ लाख ४३ हजार ४० हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. गेल्या तीन दिवसात जिल्ह्यात २३.१ मिमी पावसाची नोंद झाल्याने उर्वरित भागातही पेरणीला आणखी गती मिळण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

**धामणगाव तालुक्यात सर्वाधिक**

तालुकानिहाय पेरणीचा विचार केला असता धामणगाव रेल्वे तालुक्यात सर्वाधिक ६५ टक्के पेरणीसह आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ दर्यापूरमध्ये ६१ टक्के, अंजनगाव सुर्जीत ५२ टक्के, तर अमरावती आणि तिवसा तालुक्यात प्रत्येकी ५१ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. कापूस पेरणीत दर्यापूर तालुका आघाडीवर असून तेथे ३५ हजार हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड करण्यात आली आहे. याशिवाय धामणगाव रेल्वे येथे २४ हजार १० हेक्टर, मोर्शी येथे १३ हजार ४८ हेक्टर, तर अंजनगाव सुर्जी येथे १२ हजार ४३० हेक्टर क्षेत्रावर कापसाची पेरणी पूर्ण झाली आहे.



जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने पाऊस सुरू असला तरी आतापर्यंत जीवित किंवा वित्तहानीची कोणतीही मोठी घटना घडलेली नाही. काही ठिकाणी पाणी साचणे आणि किरकोळ अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी प्रशासनाच्या सतर्कतेमुळे परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले आहे. सध्याच्या पावसामुळे खरीप पेरणीला वेळ मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. तसेच धरण, तलाव आणि जलाशयातील पाणीसाठ्यात वाढ होत असल्याने आगामी काळात सिंचनाची परिस्थितीही सुधारण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने नागरिकांना मुसळधार पावसाच्या काळात नदी-नाले, ओढे आणि पाणी साचलेल्या भागांपासून दूर राहण्याचे आवाहन केले असून हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचेही आवाहन केले आहे. सध्या जिल्ह्यात कोणत्याही मोठ्या नैसर्गिक आपत्तीची किंवा व्यापक नुकसानीची अधिकृत नोंद झालेली नाही.

**आतापर्यंतची खरीप पेरणी (हेक्टरमध्ये)**

एकूण खरीप क्षेत्र : ६,८२,९९२
पेरणी पूर्ण : ३,४३,४० हेक्टर
(५० टक्के)

**पिकानुसार पेरणी**

कापूस : १,४९,६३९ हेक्टर
तूर : ४३,९९५ हेक्टर
मात : १,९३५ हेक्टर
मूग : १५४ हेक्टर
सोयाबीन : १,३०,६६७ हेक्टर
मका : १९,०७९ हेक्टर
ज्वारी : ६७९ हेक्टर
उडीद : ५१ हेक्टर

## विदर्भ देवस्थान समिती बैठक घेण्याकरीता अमरावती देवस्थान कोर कमिटीची ठरली पुढील दिशा

# बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद; शहरातील ६० पेक्षा अधिक विश्वस्तांची उपस्थिती

**अमरावती/का.प्र.**

मंदिर संस्कृतीचे जतन व संवर्धन, मंदिर व्यवस्थापन अधिक सक्षम करणे तसेच मंदिरांशी संबंधित विविध प्रश्नांवर सामूहिक भूमिका निश्चित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली अमरावती जिल्हा देवस्थान कोर कमिटी बैठक येथील श्रीकृष्ण मंदिरमाता खिडकी, बुधवारा येथे उत्साहात व सकारात्मक वातावरणात झाली.



बैठकीला अमरावती शहरातील व विविध भागांतील मंदिरांचे विश्वस्त,पदाधिकारी, सेवेकरी आणि मंदिर व्यवस्थापनाशी संबंधित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिर क्षेत्रासमोरील विविध आव्हाने, मंदिरांचे सुयोग्य व्यवस्थापन, धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी समन्वय, मंदिरांची नोंदणी व प्रशासकीय बाबींसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी मंदिर संस्कृतीचे संरक्षण ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. बदलत्या सामाजिक परिस्थितीत मंदिरे केवळ धार्मिक श्रद्धेची केंद्रे न राहता सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय मूल्यांचे संवर्धन करणारी केंद्रे म्हणून विकसित व्हावीत, यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचा निर्धार करण्यात आला. धर्मादाय आयुक्त कार्यालयासोबत नियमित संवाद ठेवून मंदिरांच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करावेत, अशी भूमिका देखील बैठकीत मांडण्यात आली. मंदिर व्यवस्थापनात पारदर्शकता, शिस्त आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी अशा प्रकारच्या बैठका नियमितपणे आयोजित करून मंदिर क्षेत्राशी संबंधित प्रश्नांवर चर्चा व मार्गदर्शन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थितांनी मंदिर संस्कृतीच्या रक्षणासाठी आणि मंदिर संघटनांना अधिक सक्षम करण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा संकल्प केला.या बैठकीला प्रामुख्याने मंदिर संघटक, निलेश टवलारे, श्री महारुद्र मारुती संस्थान जहागीरपुर चे अध्यक्ष ओमप्रकाश परतानी, चंद्रभागेश्वर देवस्थान चांदुर रेल्वेचे अध्यक्ष कैलाश गिरोळकर, पिंगळादेवी संस्थानचे सचिव तसेच मंदिर संघटक आशिष मारुडकर, श्री नागेश्वर महादेव संस्थान धामंत्री चे अध्यक्ष व मंदिर संघटक कैलाश कुमार पनपालिया व विश्वस्त मोहन इंगळे रवींद्र भोयर, सोपान करडे मुकेश पवार, मार्डी येथील मारुती मंदिराचे विनोद वानखडे, कोंडेश्वर मंदिराचे रामकृष्ण लांडोरे, गरुडेश्वर मंदिर आष्टीचे अरुण गिरी रेखा गिरी, अन आनादिशक्ती देवी मंदिर अमरावती चे सचिव रामेश्वर पुरी, समर्थ रघुनाथ महाराज मंदिराचे धनराजजी वेलणकर, गौरक्षण संस्था अमरावतीचे दिनेश पनपालिया, व्यंकटेश बालाजी मंदिर हितेश काकडा, मिरा दातार देवस्थान बडनेराचे वसंत काळे, प्रवीण श्रीरामवार, जगद्गुरु राजेश्वर माऊली रुक्मिणी विदर्भ पीठ श्रीकृष्ण माहोरे, श्रीकृष्ण मंदिर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष सुभाषराव पावडे, अवधूत बुवा संस्थान सावंगा विठोबाचे सचिव अशोक सोनवाल, मंदिर संघटक रोहन ढोमणे, दत्त मंदिर उमरापूरचे अध्यक्ष अनंतराव तेलखडे, अंबा रुक्मिणी समिती कौंडणपूरचे प्रमुख अक्षय पुंडेकर तसेच इतर काही मंदिरांचे विश्वस्त व पदाधिकारी तसेच प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे उपस्थितांनी कौतुक केले. शेवटी मंदिर संघटक नागेश्वर महादेव संस्थान धामंत्री चे अध्यक्ष कैलाश कुमार पनपालिया व्यवस्थेचे तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार मानून बैठकीचा समारोप करण्यात आला.

## स्वराध्या एंटरटेनमेंट ग्रुप ऑफतर्फे वि.दा.पवार सन्मानित

**अमरावती**-वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण दानाचें पवित्र कार्य तथा पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाचे कार्य करणारे प्रभात एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वि.दा. पवार यांना विदर्भात नामांकित असलेल्या स्वराध्या एंटरटेनमेंट ग्रुप ऑफ अमरावतीच्या वतीने डॉ. गोविंद कासट यांच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात स्वीकृत नगरसेवक भोजराज काळे, फोटोग्राफर असोसिएशनचे गजानन अंबाडकर, मनीष जगताप, रघुवीरचे संचालक चंद्रकांत पोपट, साई कोचिंग क्लासचे दीलीप हटवार,यांच्या उपस्थितीत होते. याप्रसंगी संजय सरवटकर तसेच स्वराध्या पुरस्काराने गौरविण्यात आलेले राजेंद्र वाघमारे, दिलीप डहाके, गणेश बिजवे,जयश्री देशमुख यासह मोठ्या संख्येने शहरातील संगीतप्रेमी नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनकर तायडे यांनी केले.संचालन मंगेश ठाकरे यांनी आभार स्वामींनी तायडे यांनी मानले.यावेळी अखिल भारतीय रेडिओ श्रोता संघाचे संस्थापक सचिव संजय वाघुळे, अध्यक्ष एल. के. व्ही. पवार, कयूम शाह, उमेश सेवक,माळी समाज बचत गटाचे अध्यक्ष डॉ. अशोक उमप,सचिव संतोष वu-हेकर,उपाध्यक्ष प्रकाश कुरळकर,सुरेश अडगोकर,प्रा. शरद व-हेकर, प्रभात एज्युकेशन सोसायटीचे नरेंद्र पाटणे,सुरेश धामणकर, गजानन माहुलकर, अशोक पांडे, एड. जी.एस. तांबटकर, शेखर माळोदे,राजेंद्र अंबाडकर, नितीन पंध्ये,विजय हरणे, तसेच अभ्यंकर असोसिएशनचे पियुष अभ्यंकर च्या वतीने वि.दा. पवार यांचे अभिनंदन करण्यात आले.



## ‘अमोलकचंद’चे माझ्यावर ऋण’- प्रा.डॉ. विश्वरुपे

### सेवापूर्तीनिमित्त निवृत्तांचा सन्मान



**यवतमाळ**-अमोलकचंद महाविद्यालयात माझ्या एकूण ३६ वर्षांपैकी २२ वर्षे सेवा झाली. या महाविद्यालयाच्या संचालक मंडळाने, प्राचार्य व सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मला आपुलकी दिली. गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व इतर विद्यापीठात मी विविध मंडळांवर,पीएच.डी.गाईड म्हणून तसेच महाविद्यालयातील इंग्रजी वाङमयाचा प्राध्यापक म्हणून कार्य केले. त्यासाठी मी महाविद्यालयाचा ऋणी आहे, असे उद्गार इंग्रजीचे प्रा.डॉ. विवेक विश्वरुपे यांनी काढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सी.ए. प्रकाश चोपडा होते.

प्रोफेसर विश्वरुपे, वरिष्ठ लिपिक उमेश राठोड, लघुलेखक सुनील धूत आणि वरीष्ठ शिपाई राजकुमार डिक्कर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी आयोजित केलेला हा कार्यक्रम नेटका झाला. याप्रसंगी वाणिज्य व लेखाचे तज्ञ अर्धवेळ शिक्षक उमेश राठोड यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाध्यक्ष सी.ए. चोपडा, प्राचार्य डॉ. प्रविण जोशी यांनी भाषणातून सर्व सत्कारमूर्तींना शुभेच्छा दिल्या. संचालन प्रा. डॉ. प्रविण जाधव यांनी केले. आभार डॉ. कमलेश तुमसरे यांनी मानले. सहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# निभा डहाके यांना राज्यस्तरीय ‘कृषी सेवारत्न पुरस्कार’

**अमरावती/का.प्र.**

कृषी विभागातील तंत्र अधिकारी निभा आशीष डहाके यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय व नाविन्यपूर्ण कार्याबद्दल ‘पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार - २०२३’ या प्रतिष्ठीत राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमास राज्यपाल जिष्णु देव वर्मा तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते तसेच राज्याचे कृषिमंत्री, फलोत्पादन मंत्री, कृषी सचिव, कृषी आयुक्त व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

निभा डहाके यांनी श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती येथून कृषी शिक्षण पूर्ण केले असून त्या मूळच्या अमरावती जिल्ह्यातील आहेत. कृषी विभागातील २१ वर्षे प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी कृषी विस्तार, फलोत्पादन, शेतकरी सक्षमीकरण आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार यामध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे.

सन २००९-१० मध्ये नाशिक जिल्ह्यात ‘क्रापसॅप’ प्रकल्पाचे उपविभाग स्तरावरील उत्कृष्ट संनियंत्रण केले.



आकाशवाणीवरून द्राक्ष, डाळिंब व्यवस्थापन तसेच शेतीतील महिलांचे योगदान या विषयांवर मार्गदर्शन केले. कृषि आयुक्तालय स्तरावरुन ‘शेतशिवार’ या मालिकेचे ७२ भाग प्रसारित करून कृषी प्रसाराचे कार्य केले.

याशिवाय कृषि आयुक्तालय कार्यालयात असतांना अत्यंत महत्वाकांक्षी योजना केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री सुक्ष्म सिंचन योजनेअंतर्गत ई-ठिबक पोर्टल, महाडीबीटी पोर्टलवरील विविध महत्वपुर्ण बाबींचा समावेश, ‘एक शेतकरी एक अर्ज’, विक्रीप्श्चात सेवांसाठी कंपनी तपशील पोर्टल, महाराष्ट्र शासनाच्या SNA प्रणालीद्वारे प्रभावी अंमलबजावणी, ‘चर्चा करू शेतीची, कास धरू विकासाची’ या उपक्रमांमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. महाडीबीटी पोर्टलद्वारे योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावरुन विशेष योगदान देण्यात आले असुन कृषी पर्यवेक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले तसेच सूक्ष्म सिंचन उत्पादक कंपन्यांच्या गुणवत्ता नियंत्रण व तपासणीबाबत राज्यस्तरीय प्रशिक्षण यशस्वीपणे देण्यात आले.

या उल्लेखनीय यशाबद्दल अमरावती महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. संजयजी तिरथकर यांनी निभा डहाके यांचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले. तसेच श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ. समीर लांडे, महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारीवृंद, अमरावती जिल्ह्यातील नागरिक, कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी बांधव यांनी त्यांच्या या राज्यस्तरीय यशाबद्दल अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराज जयंती उत्साहात



**अमरावती/का.प्र.**

भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय,येथे प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर हे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराज यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा, अद्वितीय स्मरणशक्तीचा, अध्यात्म, तत्त्वज्ञान, वेद, उपनिषदे, भक्ती आणि सामाजिक प्रबोधन क्षेत्रातील कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. दृष्टी नसतानाही त्यांनी आपल्या ज्ञानसाधनेच्या बळावर अनेक ग्रंथांची निर्मिती करून भारतीय तत्त्वज्ञानाला समृद्ध केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच चारित्र्य, नैतिक मूल्ये, सामाजिक उत्तरदायित्व आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासावी, असे त्यांनी प्रतिपादन केले. यावेळी उपस्थित प्राध्यापकांनीही संत श्री गुलाबराव महाराज यांच्या जीवनकार्याविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना संत श्री गुलाबराव महाराज यांच्या महान जीवनकार्याचा परिचय झाला तसेच ज्ञान, संस्कार, अध्यात्म आणि सामाजिक मूल्यांचा वारसा जपण्याची प्रेरणा मिळाली. संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

## गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षकांचा मोर्चा

# ९ जुलै रोजी जिल्ह्यातील ‘शाळा बंद’ राहणार

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटने कडून ९जुलैला शाळा बंद आंदोलनाची हाक दिली आहे.हे आंदोलन अमरावती जिल्हात यशस्वी करण्या करीता नियोजन सभेचे आयोजन रविवार ५जुलैला जीवन प्राधिकरण विश्राम गृह,मालटेकडी अमरावती येथे करण्यात आले होते. या सभेमध्ये महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

यामध्ये ९ जुलै ला अमरावती जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळा बंद राहतील ज्या दृष्टीने सर्व संघटना प्रयत्न करावे. प्राथमिक शिक्षकांचा मोर्चा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक,इर्विन ते जिल्हाधिकारी कार्यालय सकाळी अकरा वाजता काढण्यात येईल. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर जिल्हाधिकारी अमरावती यांना निवेदन सादर करण्यात येईल.या नियोजन सभेला संघटना पदाधिकारी उपस्थित होते.किरण पाटील,गजानन चौधरी,सुभाष सहारे अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ,अजयानंद पवार,शैलेंद्र दहातोंडे,मनिष काळे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती,सुरेंद्र मेटे राजकुमार खर्चान महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ,राजेश गाडे कास्ट्राईब शिक्षक संघटना,सुनील केने,गजानन मोरे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद,अनील कोल्हे राजाभाऊ राजनकर महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना,वसीम फरहत अखिल भारतीय प्राथमिक उर्दू शिक्षक संघ,प्रभाकर झोड संदीप देशमुख डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद,मंगेश खेरडे,सतीश डोंगरे शिक्षक भारती प्राथमिक,रामेश्वर स्वर्गीय प्राथमिक शिक्षक महामंडळ राजेंद्र दीक्षित महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, योगेश पखाले महानगरपालिका शिक्षक संघटना प्रतिनिधी, रितेश जगताप, चंद्रशेखर डोंगरे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना,सत्येंदू अभ्यंकर चेतवा कर्मचारी संघटना, राजिक हुसेन अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटना व जिल्हातील सर्व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



राज्यातील कार्यरत प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित व ज्वलंत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना, शिक्षक समन्वय समिती, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महाराष्ट्र TET/CTET उत्तीर्ण सिनिअर शिक्षक कृती समिती, खासगी शाळा शिक्षक संघटना तसेच इतर समविचारी शिक्षक संघटनांनी संयुक्तपणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले आहे. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यामुळे गुरुवार,९ जुलै रोजी राज्यव्यापी ‘शाळा बंद’ आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील, असा स्पष्ट इशारा शिक्षक संघटनांनी दिला आहे.अमरावती जिल्हातील सर्व शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहन शिक्षक संघटनांनी केले आहे.

# ट्रान्सपोर्ट नगर मिनी कंपोस्ट डेपोला एमआयएमचा विरोध

## कोणार्क कंपनीच्या विरोधात आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक ट्रान्सपोर्ट नगर येथील मिनी कंपोस्ट डिपो हटवून तेथे विद्युत सबस्टेशन बनविण्याच्या मागणीसाठी एमआयएम पक्षाच्या पदाधिकारी आणि नगरसेवकांनी आज सोमवार ६ जुलै रोजी तीव्र आंदोलन केले. एमआयएमचे शहराध्यक्ष हाजी इरफान खान आणि मनपा गटनेते अब्दुल हमीद यांच्या नेतृत्वात हे आंदोलन झाले. ट्रान्सपोर्ट नगर परिसरातील कंपोस्ट डेपोला विरोध करत या पूर्वीही एमआयएमने आंदोलन केले होते. त्यावेळी मनपा प्रशासनाकडून लेखी आश्वासन घेतले होते की डेपो ट्रान्सपोर्ट नगरमधून हटवला जाईल. पण तरीही डेपो हटवला गेला नाही. उलट कोणार्क कंपनीच्या गाड्या उभ्या करण्यासाठी तिथे जेसीबी मशीनने मोठे मोठे खड्डे खोदण्यात आले. त्यामुळे सोमवारी एमआयएमच्या नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी कंपोस्ट डेपो हटवण्यासाठी धरणे आंदोलन केले आणि मनपा प्रशासनाविरुद्ध घोषणाबाजी केली. 'मिनी कंपोस्ट डेपो ☞(पान २ वर)

### महापौर आंदोलन स्थळी-

एमआयएम पदाधिकाऱ्यांनी सोमवारी सकाळी ट्रान्सपोर्ट नगर परिसरात आंदोलन सुरू केले होते. यामुळे एकच खळबळ उडाली होती. आंदोलक कोणाचेही काही ऐकायला तयार नव्हते. अशात महापौर श्रीचंद तेजवानी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलनकर्त्यांना लवकरात लवकर कंपोस्ट डेपो हटविण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर हे आंदोलन रद्द झाले.

# 'मिसिंग लिंक'च्या दुरावस्थेवरून यशोमती ठाकूर आक्रमक

## ४० टक्के टक्केवारीचे सरकार म्हणत देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प येथे स्लॅब कोसळून मुंबई-पुणे वाहतूक ठप्प झाली आहे. दोन महिन्यापूर्वी उद्घाटन झालेल्या या मिसिंग लिंकवर खड्डे देखील पडले आहेत. या प्रकल्पाच्या दर्जावरून आणि प्रवाशांच्या झालेल्या गैरसोयी वरून काँग्रेसच्या नेत्या, माजी महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारवर अत्यंत गंभीर आरोप करत कडक शब्दांत टीका केली आहे.

प्रकल्पाच्या दुरवस्थेवर संताप व्यक्त करताना यशोमती ठाकूर म्हणाल्या की, 'मिसिंग लिंकची काय हालत झाली आहे, हे आज संपूर्ण देश आणि महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी बघत आहे. देवेंद्र फडणवीस स्वतःला 'इन्फ्रा मॅन' म्हणून घेतात, पण हा 'इन्फ्रा मॅन' नेमकं काय करतोय, हेच कोणाला समजेनासे झाले आहे.



उद्घाटनानंतर लगेचच पडलेल्या खड्ड्यांवरून जेव्हा प्रश्न विचारले जातात, तेव्हा 'ही केवळ एक टेस्ट होती' असे बेजबाबदार वक्तव्य मुख्यमंत्री फडणवीस करतात. तर दुसरीकडे शासकीय अधिकारी हे खड्डे किरकोळ असल्याचे सांगून आपली जबाबदारी झटकत आहेत.

मिसिंग लिंकच्या उद्घाटनावेळी तिथे बळी दिला गेल्याची चर्चाही मध्यंतरी कानावर आली. इन्फ्रास्ट्रक्चरच्या नावाखाली फक्त मोठ्या घोषणा करायच्या, अवाढव्य आकडे दाखवायचे आणि शेवटी मात्र कामाचा बोजवारा उडवून गोंधळ घालायचा, हेच या सरकारचे काम आहे, असे देखील यशोमती ठाकूर यांनी म्हटले आहे.

'क्रेडिट तुमचे, मग टक्केवारीची जबाबदारी कोणाची?'

महायुती सरकारच्या कारभारावर बोट ठेवत पुढे आरोप करण्यात आला की, 'इन्फ्रास्ट्रक्चरच्या मोठ्या मोठ्या गप्पा मारून ☞(पान २ वर)

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात आरोपीला १० वर्षांची सक्तमजुरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी अमोल (ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती) नामक तरुणाला दोषी ठरवत १० वर्षांची सक्तमजुरी व १० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. जिल्हा व सत्र न्यायाधीश वाय. ए. गोस्वामी यांनी सोमवारी (दि. ६) हा निकाल दिला.



मंगरूळ दस्तगीर पोलिस ठाण्यात २०१६ मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार, पीडिता घटनेच्या वेळी अल्पवयीन होती. नातेवाईकांच्या लग्नानिमित्त ती पिंपळखुटा येथे आली असताना आरोपीने तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप होता. या प्रकरणाची माहिती पुढे उघडकीस आल्यानंतर आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या कलम ३७६(२)(एफ) तसेच पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पीएसआय राजेंद्र होटे यांनी केला. तपासादरम्यान संकलित करण्यात आलेल्या पुराव्यांच्या आधारे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. सोनाली क्षीरसागर यांनी १५ साक्षीदार तपासून न्यायालयासमोर पुरावे सादर केले. पुरावे व युक्तिवाद विचारात घेत न्यायालयाने आरोपीला भारतीय दंड विधानाच्या कलम ३७६(२)(एफ) अंतर्गत दोषी ठरविले. न्यायालयाने आरोपीस १० ☞(पान २ वर)

# अमरावतींतील रेल्वे स्थानकांबाबत बुकलेटमधील चुकीच्या माहितीवर खासदार वानखडे संतापले

## प्रवाशांच्या सुविधांचा आढावा,अधिकाऱ्यांवर ओढले ताशेरे

**नांदेड/प्रतिनिधीः-:** नांदेड येथे आज आयोजित दक्षिण मध्य रेल्वेच्या खासदारांच्या बैठकीस खासदार बळवंत वानखडे उपस्थित होते. या बैठकीत दक्षिण मध्य रेल्वेच्या विविध विकासकामांचा तसेच प्रवाशांच्या सुविधांचा आढावा घेण्यात आला.

बैठकीदरम्यान अमरावती लोकसभा मतदारसंघातील रेल्वे स्थानकांबाबत रेल्वे प्रशासनाने तयार केलेल्या अधिकृत बुकलेटमध्ये चुकीची माहिती नमूद करण्यात आल्याचा मुद्दा खासदार बळवंत वानखडे यांनी ठळकपणे उपस्थित केला. प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या काही रेल्वे स्थानकांची माहिती बुकलेटमध्ये चुकीच्या पद्धतीने सादर करण्यात आल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढण्यात आले.



खासदार बळवंत वानखडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत जाब विचारत, अशा प्रकारच्या तथ्यात्मक चुका स्वीकारार्ह नसल्याचे स्पष्ट केले.

अधिकृत दस्तऐवज तयार करताना अचूक माहितीची पडताळणी करणे ही रेल्वे प्रशासनाची ☞(पान २ वर)

# परतवाडा आगाराच्या व्यवस्थापकपदी आशा वासनिक यांची नियुक्ती



**परतवाडा/प्रतिनिधीः-:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या परतवाडा आगाराच्या नवीन आगार व्यवस्थापकपदी आशा वासनिक यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. मोर्शी आगारातून बदली होऊन परतवाडा येथे रुजू झालेल्या वासनिक यांचे अचलपूर-परतवाडा परिसरातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमींनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानिमित्ताने वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. पदभार स्वीकारल्यानंतर आयोजित स्वागत भेटीत ☞(पान २ वर)

# डिकी फोडून भरदिवसा ३ लाखांची रोकड लंपास

## -बँकेपासूनच पाळत ठेवल्याचा संशय

**पुसद/प्रतिनिधीः-** पुसद शहरात भरदिवसा दुचाकीच्या डिकीतून तब्बल तीन लाख रुपयांची रोकड लंपास झाल्याची धक्कादायक घटना रविवारी घडली. शहरातील वर्दळीच्या परिसरात, पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर ही चोरी झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, चोरट्यांचे धाडस आणि पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.वसंतनगर येथील पूजा प्रतीक जगताप (वय २६) यांनी मुलाच्या उपचारासाठी पुसद येथील युनियन बँकेतील मुदतठेव (एफडी) मोडून दुपारी सुमारे १२ वाजता तीन लाख रुपये काढले. ही रोकड तसेच मोबाईल, बँकेचे धनादेश, आधार कार्ड, पॅन कार्ड व पासबुक असलेली बॅग त्यांनी त्यांच्या दुचाकीच्या डिकीत ठेवली. त्यानंतर मुलाच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल घेण्यासाठी त्या डॉ. पाठक यांच्या लॅबमध्ये गेल्या. ☞(पान २ वर)



# धारणी-चिखलदरा येथील शासकीय विश्रामगृहांची व्यवस्था प्रश्नचिन्हाखाली

## -कंत्राटी पद्धतीनंतर सेवांचा दर्जा घसरल्याची चर्चा -विभागीय कर्मचाऱ्यांच्या पुनर्नियुक्तीची मागणी

**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा हे पर्यटन तसेच प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे तालुके मानले जातात. या दोन्ही ठिकाणच्या शासकीय विश्रामगृहांमध्ये दररोज विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच शासकीय कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची वर्दळ असते. मात्र गेल्या सुमारे दोन वर्षांपासून विश्रामगृहांच्या व्यवस्थेत झालेल्या बदलानंतर येथील सुविधा, देखभाल आणि सेवांच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या दोन वर्षांपासून धारणी व चिखलदरा येथील बहुतांश शासकीय विश्रामगृहांचा कारभार कंत्राटी पद्धतीने चालविला जात आहे. यापूर्वी प्रत्येक विश्रामगृहात सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियमित कर्मचारी कार्यरत होते. स्वच्छता, खोल्यांची देखभाल, परिसराची निगा, पाहुण्यांची व्यवस्था, अधिकाऱ्यांचे स्वागत तसेच इतर दैनंदिन कामांची जबाबदारी हे कर्मचारी पार पाडत होते. त्यामुळे विश्रामगृहांमध्ये शिस्त, स्वच्छता आणि सेवेचा दर्जा कायम राहत होता.

सध्या मात्र कंत्राटी व्यवस्थेमध्ये मोजक्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून संपूर्ण विश्रामगृहाचा कारभार सांभाळला जात असल्याची माहिती आहे. उपलब्ध मनुष्यबळ अत्यल्प असल्याने स्वच्छता, देखभाल, पाहुण्यांची व्यवस्था आणि इतर सेवा पूर्वीप्रमाणे दर्जेदार पद्धतीने देणे कठीण होत असल्याची ☞(पान २ वर)

# पात्रीकर कॉलनीतील नागरिकांना दिलासा

## पावसाळ्याचे पाणी साचत होते रस्त्यावर

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** शहरातील पात्रिकर कॉलनी परिसरात राहणाऱ्या नागरिकांना मागील अनेक वर्षापासून पावसाळ्याचे पाणी रस्त्यावर साचत असल्याने ये जा करत असताना अनेक अडचणीसह त्रास सहन करावा लागत होता,यावर्षी मात्र नगरपालिका प्रशासन सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरसेवक पप्पू भालेराव यांच्या प्रयत्नाने पावसाचे पाणी नाल्यात वळवल्याने या परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.



शहरातील एसटी डेपो च्या मागच्या साईडला असलेल्या टेकडी वरून येणाऱ्या पावसाळ्याचे पाण्याला वाट (दिशा)नसल्याने हे पाणी पात्रीकर कॉलनी परिसरात घुसत होते, त्यामुळे पात्रीकर कॉलनी परिसरातील रस्ते जलमय होत होते. त्यामुळे या परिसरात राहणाऱ्या लोकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. यावर्षी ☞(पान २ वर)

# परतवाडा शहर काँग्रेसमध्ये नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती



## -संघटन बळकटीसाठी नवी जबाबदारी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहर काँग्रेस कमिटीमध्ये विविध पदांवर नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, या नियुक्त्यांचे कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात आले. जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

नियुक्तीनुसार मो. मुजीब उर्फ गुड्डू, विरेंद्र वासनिक आणि गोलू सिद्धार्थ जामानिक यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. सफीया हमीद खान, शे. शाहरुख, शे. अनवर चौधरी आणि शे. शहजाद शे. सलीम यांची सरचिटणीसपदी निवड करण्यात आली. जावेद शे., रशीद फिरोजी, शकुंतलाबाई वजाळे आणि मो. ओसाफ ☞(पान २ वर)

# सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांच्या तडजोडीसाठी विशेष लोकअदालत

## -२१ ते २३ ऑगस्ट दरम्यान 'समाधान समारोह'

**अमरावती/प्रतिनिधीः-:** न्यायप्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवून 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयामार्फत 'समाधान समारोह' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा समारोप येत्या २१ ते २३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित विशेष लोकअदालतीने होणार आहे. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा संमती-आधारित प्रक्रियेद्वारे, सलोख्याने व जलद गतीने निपटारा करणे हा या विशेष लोकअदालतीचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून पक्षकारांना दीर्घकालीन न्यायप्रक्रियेतून मोठा दिलासा मिळणार असून, परस्पर सहमतीने वाद मिटविण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

जिल्ह्यातील सर्व वकील, पक्षकार तसेच संबंधित हितधारकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून वादांचे प्रभावी निराकरण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय सहारे ☞(पान २ वर)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर

## २ लाखांपर्यंत कर्जमाफी तर नियमित कर्जदारांना ५०हजारांचे प्रोत्साहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' लागू केली असून, या अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ दिला जाणार आहे. या योजनेनुसार ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत अल्पमुदतीचे पीक कर्ज घेतले आहे आणि ज्यांचे हे कर्ज ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असून ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नाही, अशा शेतकऱ्यांच्या सर्व कर्ज खात्यांवरील एकत्रित थकबाकीची मुद्दल व व्याजासह २ लाख रुपयांपर्यंतची रक्कम पूर्णपणे माफ केली जाईल. यामध्ये जमीन धारणेचे क्षेत्र विचारात घेतले जाणार नाही. तसेच, ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'एकवेळ समझोता' योजना आणली असून, शेतकऱ्याने २ लाखांवरील अतिरिक्त रक्कम बँकेत जमा केल्यानंतर त्यांना २ लाख रुपयांच्या कर्जमुक्तीचा लाभ मिळेल. ही अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

तसेच, पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांचा सन्मान करण्यासाठी शासनाने ५० हजार रुपयांपर्यंतच्या प्रोत्साहनपर लाभाची तरतूद केली आहे. सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत कर्जाची उचल करून विहित वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना हा लाभ मिळेल; मात्र अशा शेतकऱ्यांनी २०२५-२६ व २०२६-२७ या वर्षांत ☞(पान २ वर)

# आपल्या कार्यक्षेत्रात नंबर वन बनण्याचा प्रयत्न करा

## सुविख्यात दंततज्ञ डॉ. संदेश मयेकर यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

### -डॉ. संदेश मयेकर यांचा सत्कार सोहळा, -शिव परिवार, दंत महाविद्यालय व आयडीएचे संयुक्तिक आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** आयुष्यात केवळ संसारी जीवनात चांगले असणे म्हणजेच आपल्या आयुष्याचा माईलस्टोन असू शकत नाही. आपल्या प्रोफेशनविषयी उत्साही राहून जिकरीने काम करणे देखील गरजेचे आहे. तुम्हाला कोणत्याही क्षेत्रात काम करायचे असेल तर त्या क्षेत्रात केवळ तज्ञ बनून चालणार नाही तर तुम्हाला त्या क्षेत्रात नंबर वन बनण्याचा प्रयत्न करावा लागेल तरच तुम्ही यशस्वी होऊ शकता असा सल्ला सुविख्यात दंततज्ञ डॉ. संदेश मयेकर यांनी दंतविज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांना दिला.



हॉटेल ग्रँड मैफिल येथे शिव परिवार, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे दंत महाविद्यालय आणि आयडीए अमरावतीच्या वतीने आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त दंततज्ञ डॉ. संदेश मयेकर यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद काळमेघ होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अमरावती शहराचे महापौर श्रीचंद तेजवानी, स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानचे सचिव हेमंत काळमेघ, डॉ. राजेश शर्मा, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी दंत महाविद्यालय ☞(पान २ वर)

# पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रियेसाठी अचूक आकडेवारी महत्त्वपूर्ण- विभागीय आयुक्त नयना गुंडे

## -राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ८१ व्या फेरीच्या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन

**अमरावती/प्रतिनिधीः-** आजच्या काळात सुप्रशासन हे पूर्णपणे पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रियेवर अवलंबून आहे. कृषी, ग्रामीण विकास, वित्तीय समावेशन, आरोग्य, शिक्षण किंवा पायाभूत सुविधा अशा कोणत्याही क्षेत्रातील प्रभावी धोरणे ही केवळ अचूक आणि वेळेवर उपलब्ध होणाऱ्या आकडेवारीवरच आधारित असतात. विश्वासार्ह सांख्यिकीमुळेच शासनाला प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेऊन प्राधान्यक्रम निश्चित करणे, संसाधनांचे परिणामकारक नियोजन करणे आणि विकास योजनांच्या परिणामांचे मूल्यांकन करणे शक्य होते, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी आज येथे केले.



अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयातर्फे डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी येथे आयोजित राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ८१ व्या ☞(पान २ वर)